मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

जुलै / ऑ./ सप्टें.
२००१



मूल्य २५/- रु.

अनुक्रमणिका

विनम्र श्रद्धांजली

विजय भास्कर रेड्डी, शिवाजी गणेशन्, पद्माकर गोवईकर, फुलनदेवी, तिरपुडे, व्यंकटेश माडगूळकर, शं.ना. अंधुटकर, शरद तळवलकर, श्रीपाद गंगाधर कावळे, व.दि.कुळकर्णी, माधवराव शिंदे, ना.य.डोळे या साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील गेल्या जुलै ते सप्टेंबर या कालावधीतील दिवंगत मान्यवरांना विदर्भ साहित्य संघाची विनम्र श्रद्धांजली.

विनम्र श्रद्धांजली

विजय भास्कर रेड्डी, शिवाजी गणेशन्, पद्माकर गोवईकर, फुलनदेवी, तिरपुडे, व्यंकटेश माडगूळकर, शं.ना. अंधुटकर, शरद तळवलकर, श्रीपाद गंगाधर कावळे, व.दि.कुळकर्णी, माधवराव शिंदे, ना.य.डोळे या साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील गेल्या जुलै ते सप्टेंबर या कालावधीतील दिवंगत मान्यवरांना विदर्भ साहित्य संघाची विनम्र श्रद्धांजली.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर २००१ वर्ष

अंक - ५३; ४ ते ६

मूल्य : पंचवीस रुपये

संपादक : डॉ. सुलभा हेर्लेकर

कार्यकारी संपादक : केशव जोशी

पत्रव्यवहाराचा पत्ता :
संपादक, 'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक
सीताबर्डी, नागपूर - १२
दूरध्वनी : ५२३९२९

प्रकाशक :
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ
नागपूर - १२
मुखपृष्ठ : केशव जोशी
अक्षर जुळवणी :
श्री अक्षर टाईप सेटर्स, नागपूर
मांडणी / मुद्रक
स्पार्क असोसिएटस्, नागपूर.

अनुक्रमणिका

संपादकीय

मराठी वाङ्मयीन नियत कालिकांच्या विश्वात 'युगवाणी' हे आजवर अव्याहतपणे सातत्याने प्रकाशित होणारे मराठी वाङ्मयीन नियतकालिक आहे. पहिला एप्रिल, मे, जून चा एक अंक आपल्या हाती पडला आहेच. हा दुसरा अंक वाचकांच्या हाती देतांना म्हणूनच समाधान आहे. कलावंताप्रमाणेच अंक प्रकाशित करणाऱ्यांनाही एका संघर्षातून जावे लागते. प्रत्येक वेळेला संघर्षाचे स्वरूप वेगळे असले तरी त्याला संघर्षाची भोगजाणीव असते म्हणूनच नियतकालिके का बंद पडतात, किंवा अनियमित होतात याचा समाजापुढे विचारच नसतो. त्याला हवं असतं उत्तम दर्जाचं लेखन! आणि हे वाटणंही तितकच अपरिहार्य, जितका तापलेल्या जमिनीला पाऊस! वाचकांसाठी 'युगवाणी' आनंददायी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

समीक्षा, एकांकिका, कथा, कविता, संशोधन या सर्वच वाङ्मयीन प्रकारांना युगवाणीत स्थान आहे. या अंकातही समीक्षापर अभ्यासपूर्ण लेख, दीर्घकविता, एकांकिका, आत्मचरित्रपर साधक-बाधक लेख, कथा इत्यादी साहित्यावर लक्ष केंद्रित केले आहे. चांगल्या कलावंताच्या चांगल्या साहित्याची युगवाणीला आस्था आहे. अभिव्यक्तीच्या बदलत्या स्वरूपाची, स्त्रीवादाची, स्त्रीच्या आत्मसन्मानाची एकूणच मानसिक स्वातंत्र्याची युगवाणीला आस आहे. विळख्यातून सुटू पाहणाऱ्या सर्वच लिखाणाचे युगवाणीत स्वागत आहे.

कलावंताच्या आकलनाविषयी किंवा एकूणच जीवनातील संघर्षाविषयी वाचकांना कुतूहल वाटत आलेले आहे. अशा लिखाणाचे 'युगवाणी'ला अप्रूप आहे आणि भोवतालच्या वातावरणाचे पडसाद, ह्याचे समाजमनावर पडलेले प्रतिबिंब, अस्थिर जीवन, या सर्वातून घडत असलेला 'माणूस,' साहित्यातून त्याचे घडणारे वास्तव दर्शन ह्याचीच खरं म्हणजे युगवाणीला गरज आहे आणि मला विश्वास वाटतो की युगवाणीचे वाचक, लेखक, कलावंत, ही सारी एकाच कुटुंब व्यवस्थेशी बांधील आहेत. 'युगवाणी'ला त्यांचाच आधार आहे. त्यांच्या सहकार्यानेच 'युगवाणी'चे वाङ्मयीन बळ वाढेल याची मला पूर्ण खात्री आहे.

- सुलभा हेर्लेकर

अनुक्रमणिका

आत्मचरित्र आणि कथनमीमांसा

मिलिंद स. मालशे

आत्मचरित्र हे एक कथन असते. त्यामुळे आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचा विचार करताना कथनमीमांसा (narratology) या आधुनिक समीक्षेतील एका महत्त्वाच्या क्षेत्रातील काही तत्त्वांची व संकल्पनांची मदत आपल्याला निस्संशय होईल. तेव्हा कथनमीमांसेच्या आधारे या साहित्यप्रकाराच्या स्वरूपाचा विचार येथे करायचा आहे. मराठीमधील आत्मचरित्रांचा हा परामर्श नव्हे. मराठीमधील आत्मचरित्रांचीच उदाहरणे घ्यायची असली तरी ती अगदी निवडक आणि तीही केवळ तत्त्वांच्या व संकल्पनांच्या स्पष्टीकरणासाठी येतील. प्रथम आपण आत्मचरित्राच्या संदर्भचौकटीचा विचार करू, त्यानंतर त्यातील 'मी' चे स्वरूप तपासू आणि अखेरीस या साहित्यप्रकाराच्या करारशर्ती, त्याचा घाट व त्याची शैली यांचा विचार करू.

१. आत्मचरित्राची संदर्भचौकट

कोणतेही पुस्तक लिहिले आणि वाचले जाते ते विशिष्ट चौकटीच्या संदर्भात. साहित्यप्रकाराच्या संदर्भचौकटीची नोंद दोन पातळ्यांवर घ्यावी लागते एक म्हणजे

अनुक्रमणिका

लेखनाला असलेली वास्तव जगाची बाह्य चौकट, तर दुसरी लेखनप्रक्रियेची चौकट.

आत्मचरित्र या साहित्यप्रकारामध्ये वास्तव जगामधील एक खरीखुरी व्यक्ती लेखक/लेखिका बनते आणि स्वतःविषयी कथन करू लागते. लक्ष्मीबाई टिळक या वास्तव जगातील एक व्यक्ती, लेखिका झाल्या आणि त्यांनी 'स्मृतिचित्रे' हे आपल्या आठवणींचे पुस्तक लिहिले. वास्तव जगातील ही स्त्री शिक्षण न घेतलेली होती. त्यांचे पती नारायण वामन टिळक हे मराठीमधील एक महत्त्वाचे कवी होते. शिवाय त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून खिस्ती धर्म स्वीकारला होता, व त्यामुळे हिंदू समाजाच्या दृष्टीने ते एक वादग्रस्त व्यक्तिमत्त्व होते. 'माझे चरित्र लिहायचे झाले तर ते घडले तसे लिहा,' असे सांगणाऱ्या आपल्या पतीची इच्छा पूर्ण करण्यासाठी लक्ष्मीबाईंनी हे लेखन केले. ही सर्व माहिती आपल्याला बाह्य चौकटीमध्ये उपलब्ध आहे. 'नाच ग घुमा'च्या लेखिका माधवी देसाई याही वास्तव जगातील व्यक्ती आहेत आणि त्यांचे दुसरे पती रणजीत देसाई यांची गणनाही मराठीतील ख्यातनाम लेखकांमध्ये होते. 'आहे मनोहर तरी' लिहिणाऱ्या सुनीता देशपांडे या पु.ल. देशपांडे यांच्या पत्नी आहेत. या दोन्ही लेखिकांनी वेगवेगळ्या कारणांसाठी आत्मपर लेखन करण्याचे ठरविले व त्या लेखिका झाल्या. वास्तव जगात न्हावी या जातीत जन्म घेतलेले आणि लोकनाट्यांतून आणि सिनेमांमधूनही विनोदी नट म्हणून ओळखले जाणारे राम नगरकर लेखक बनले आणि 'रामनगरी' हे आत्मकथन त्यांनी आपल्यापुढे ठेवले. वास्तव जगात दलित समाजात दगडू मारुती पवार म्हणून जन्म घेतलेल्या दया पवार यांनी 'बलुतं' या पुस्तकाचे लेखन करून आपल्या जीवनाची कहाणी आपल्याला सांगितली आहे. 'झोंबी' मध्ये आपल्या बाळपणाची कथा सांगणारे आनंद यादव ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे अध्वर्यू आहेत आणि कथा, कादंबरी, कविता व समीक्षा या सर्व प्रकारात लेखन केलेले प्रतिथयश लेखक आहेत.

वास्तव जगातील व्यक्ती म्हणून आपल्याला या लेखकांविषयी माहिती असते वा तशी माहिती आपण मिळवू शकतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या मानसिक, सामाजिक सांस्कृतिक पैलूंचे विश्लेषण करू शकतो; त्याच्या आधारे त्यांचे 'नैतिक' मूल्यमापन करू शकतो. त्यासाठी नैतिक मूल्यांची चौकट आपण वापरू. ही चौकट काही प्रमाणावर संस्कृतिसापेक्ष व भाषागत असेल, पण पूर्णतः तशी नसेल. सार्वत्रिक मानवी मूल्यांना विशिष्ट संस्कृती व विशिष्ट भाषा या चौकटीत व्यक्त केलेले असेल. सामाजिक मूल्यांच्या संदर्भात विशिष्ट भूमिकेमधून, उदाहरणार्थ स्त्रीवादी भूमिकेमधून, लक्ष्मीबाईंच्या, माधवीबाईंच्या किंवा सुनीताबाईंच्या वर्तनाचे व त्यामागील मूल्यव्यवस्थेचे विश्लेषण व मूल्यमापन करता येईल. या प्रकारच्या मूल्यमापनात स्मृतिचित्रे, रामनगरी, बलुतं, झोंबी, नाच ग घुमा, आहे मनोहर तरी... ही पुस्तके संदर्भसामग्री म्हणून, documents

म्हणून, वापरता येऊ शकतील.

परंतु या तऱ्हेचे विश्लेषण व मूल्यमापन हे साहित्यसमीक्षेच्या दृष्टीने असमाधानकारक ठरेल. कारण एक संहिता म्हणून, text म्हणून, या पुस्तकांची वैशिष्ट्ये लक्षात न घेताच या संहिता म्हणजे वास्तव जीवनाची अगदी पारदर्शक अशी प्रतिमा किंवा अगदी हुबेहूब असे प्रतिबिंब मानून हे मूल्यमापन होण्याचा दाट संभव आहे. समीक्षेच्या दृष्टीने ही सरधोपट भूमिका भाबडेपणाची ठरेल. वास्तव जगाच्या चौकटीच्या बाह्य संदर्भचौकटीबरोबरच लेखनांतर्गत प्रक्रियांचा वेधही घेतल्याखेरीज या पुस्तकांचे आणि त्याचबरोबर त्यांच्या लेखकांचे मूल्यमापन योग्य प्रकारे होऊ शकणार नाही. चरित्र आणि आत्मचरित्र या लेखनप्रकारांचा सबंध इतिहासलेखनाशी असतो, हे खरे. परंतु ललित साहित्यकृती म्हणूनही त्यांचे वाचन करता येते व ते करीत असताना व्यक्ती, घटना आणि परिसर यांना कथनांतर्गत घटक मानून वाचन केलेले असते. आत्मचरित्राच्या कथनांतर्गत लेखन-चौकटीचे स्वरूप आता आपण पाहू.

भाषा आणि साहित्य या चिन्हव्यवस्थांच्या साहाय्याने साहित्य-संहिता निर्माण होत असते. लेखक आणि वाचक यांना बांधणारी एक करारव्यवस्था येथे असते या करारव्यवस्थेला आधारभूत असणाऱ्या काही लेखन-खेळी (moves वा strategies) किंवा वाचिक कृत्ये (speech acts) उपलब्ध असतात. त्यांची नोंद घेणे प्रथम आवश्यक आहेः

वर्णन (description) - (तथ्यांची/घटनांची) नोंद करणे
कथन (narration) - गोष्ट सांगणे
विवेचन (thematization) - मुद्दा मांडणे
भावाविष्करण (expression) - भावनांना वाट मोकळी करून देणे
संवादन (dialogue) पात्रांमधील संवाद श्रोत्यांना ऐकविणे.

या मूलभूत वाचिक कृत्यांमधून निवड होऊन संहिता सिद्ध होत असते. या वाचिक कृत्यांना दोन प्रकारे दिशा देता येते. एक दिशा तथ्यलक्ष्यी असते. प्रत्यक्ष अनुभवाला येणाऱ्या तथ्यांची नोंद चोखपणे करणे, हे येथे सर्वात महत्त्वाचे असते. इतिहास-लेखनामध्ये ही दिशा महत्त्वाची ठरते. दुसरी दिशा कल्पनालक्ष्यी असते. काल्पनिक विश्वाची निर्मिती करून आनुभविक तथ्यांपलीकडे असणाऱ्या एका अधिक व्यापक वास्तवाचा वेध घेणे हे उद्दिष्ट येथे ठेवलेले असते. संहितेच्या विशिष्ट स्वरूपामुळे हे शक्य होते. संहितेमधील वेगवेगळे घटक हे अंतर्गत संरचनेकडे वाचकाचे लक्ष वेधत राहतात. त्यामुळे या दिशेला संहितालक्ष्यी म्हणणेही योग्य ठरेल. ललित साहित्यामध्ये अंतर्भाव होणाऱ्या संहितांमध्ये ही दिशा महत्त्वाची ठरते.

काही वेळा या दोहोंचा संकर होऊ शकतो. प्रामुख्याने आत्मचरित्रात्मक लेखनात तो होतो. येथे काल्पनिक विश्व निर्माण केलेले नसते; त्यामुळे सत्यासत्यतेविषयीचे प्रश्न नेहमीच्या व्यवहारात जसे उभे राहतात तसे ते चरित्रपर व आत्मचरित्रपर लेखनाच्या संदर्भातही उभे राहू शकतात. उदाहरणार्थ, या प्रकारचे प्रश्न 'आहे मनोहर तरी...' या पुस्तकाच्या संदर्भात उभे केले गेलेले आहेत. सदानंद दानाईत यांनी तर audited accounts सारख्या पूर्णपणे वर्णनपर नोंदीच्या स्वरूपाचे 'पुरावे' या संदर्भात देऊन अप्रामाणिकपणाचा आरोप लेखिकेवर केलेला होता. मात्र 'आहे मनोहर तरी...' मधल्या दोन-तीन वाक्यांच्या संदर्भातच तो होता व त्यामुळे त्याचे स्वरूप अगदी किरकोळ होते. 'नाच ग घुमा'च्या संदर्भात म. वा. धोंड यांनीही काही समाजशास्त्रीय प्रश्न उपस्थित केलेल होते. माधवी देसाई यांनी त्यावर प्रतिक्रियाही नोंदविलेली आहे : 'जातीकुळाच्या तळाशी जाऊन बराच गाळ वर आणणाऱ्या या लेखाने मी दुखी झाले. मी काही दडवलं नव्हतं; मग एवढ्या उघड्या 'सत्या'ची गरज होती का ?' (मनोगत - तिसरे). परंतु हे प्रश्न उभे न करताही काल्पनिक पातळीवर व्यापक मानवी जीवनाच्या दृष्टीने प्रातिनिधिक अशा वास्तवाचा वेध या लेखनाने किती घेतलेला आहे, याचाही विचार महत्त्वाचा ठरतो. रा.भा. पाटणकरांनी या दुसऱ्या प्रकारची भूमिका घेऊन 'आहे मनोहर तरी' या पुस्तकाचा विचार केलेला आहे.

आत्मचरित्रात्मक लेखनामध्ये ऐतिहासिकता (म्हणजे तथ्यलक्षित्व) आणि संहितालक्षित्व यांचा संकर होतो, ही गोष्ट गंगाधर गाडगीळांनी स्मृतिचित्रांविषयीच्या आपल्या विवेचनात टिपलेली आहे :

प्रत्येक आत्मचरित्र हा एक इतिहास असतो आणि त्यात लेखक व तत्कालीन परिस्थिती याविषयी जशी जाणीवपूर्वक माहिती दिलेली असते तशी अजाणताही दिलेली असते. ... आत्मचरित्राच्या द्वारे आणखीही काही करता येण्यासारखे असते. ते म्हणजे आपल्या साऱ्या स्मृतिरूप अनुभवांना सजीव करून त्यांची स्पंदणारी प्रतीती घेणे, त्यांचा आकार जाणिवेत उमटविणे, त्यांच्याकडे एका वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थेने पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे आणि अशा प्रकारे त्यांना अजर आणि अमर करणे. (गाडगीळ, १९६२ : ६७-६८)

'माझे चरित्र लिहायचे झाले तर ते घडले तसे लिहा,' असे सांगणाऱ्या आपल्या पतीची इच्छा पूर्ण करण्यासाठी लक्ष्मीबाईंनी लेखन केले. हे खरे असले तरी टिळकांचे चरित्र म्हणून त्याचे कथन त्रयस्थ कथनकाराच्या भूमिकेतून न करता आत्मपर लेखनाचे स्वरूप त्यांनी त्याला दिले. त्यांचे पती टिळक हे त्यातील केंद्रवर्ती व्यक्तिमत्त्व असले तरी कथनकाराची भूमिका निभावणारी 'मी' सुद्धा त्यात अत्यंत महत्त्वाची आहे. तेव्हा

अनुक्रमणिका

आत्मचरित्राच्या संदर्भात बाह्य चौकट आणि लेखनांतर्गत चौकट यांच्यात काही प्रमाणात संघर्ष असू शकतो हे आपण येथे लक्षात घेतले पाहिजे. लेखक/लेखिकेचा बाह्य हेतू आणि प्रत्यक्ष आत्मचरित्राचे स्वरूप यांच्यातील तफावतीमुळे हा संघर्ष निर्माण होऊ शकतो.

'नाच ग घुमा' आणि 'आहे मनोहर तरी...' यांच्या बाबतीत मात्र बाह्य चौकट आणि लेखनांतर्गत चौकट यांच्यात असा संघर्ष होत नाही. बाहय चौकटीचा विचार केल्यास येथे पतीचे चरित्र लिहिण्याचा हेतू अर्थातच नव्हता. एकीला स्वतःच्या 'घुमण्याचा' शोध घ्यायचा होता तर दुसरीला आपल्या आयुष्याच्या मनोहरतेमागे दडलेली उदासीनता शोधायची होती. तेव्हा स्वतःच्याच व्यक्तिमत्त्वाचा, चरित्राचा शोध या लेखिकांना घ्यायचा होता आणि 'मी'नेच कथन करून तो घेतलेला आहे.

बलुतं या पुस्तकाच्या शीर्षक-पृष्ठावरच काल्पनिकतेपासून वाचकाला दूर नेणारा, त्याला तथ्यलक्ष्यित्वाकडे खेचणारा मजकूर आहे : 'या पुस्तकातील प्रसंग, घटना व पात्रे कुणाला काल्पनिक वाटल्यास तो केवळ योगायोगच समजावा.' पुस्तकातील आत्मकथन सुरू होण्याआधी एक वेगळी क्लृप्ती वापरलेली आहे. येथे दया पवार आणि दगडू मारुती पवार यांच्यात 'तो' व 'मी' असा भेद करून कथनाची एक वेगळी चौकट उभी केलेली आहे. पुस्तकाच्या आत्मकथनात्मक मजकुराचा प्रारंभ या चौकटीचे अस्तित्व जाणवून देवूनच होतोः 'तो एकटा असला, म्हणजे त्याची आणि माझी हमखास भेट होते. मला कळू लागल्यापासून मी त्याला ओळखतो.' (पृ.१) शेक्सपिअरच्या 'नाटकात नाटक' या क्लृप्तीसारखीच 'कथनात कथन' अशी ही क्लृप्ती आहे. कथन करणारा आवाज 'तो' या पात्राचा आवाज आहे. हा आवाज थेट वाचकाशी बोलत नाही, तर 'मी' या दुसऱ्या एका कथनांतर्गत पात्राला उद्देशून कथन करतो आहे. मात्र पुस्तकाचा प्रारंभ आणि अखेर सोडले तर ही चौकट फारशा ठळकपणे जाणवत नाही. 'तर काय सांगत होतो?' (पृ. १४, १८९) यासारखी कथनात्म लकब क्वचित येते आणि 'आता आम्ही कसे राहात असू याची तू कल्पना तरी करू शकतोस का ?' (पृ. १८९) यासारखे 'मी' या पात्राला उद्देशून म्हटलेले वाक्यही क्वचितच येते.

२. आत्मचरित्रात्मक लेखनाचे स्वरूप

लेखकाने/लेखिकेने स्वतःविषयी लिहिणे, या प्रक्रियेतून आत्मचरित्रात्मक लेखनसंहिता निर्माण होत असते. आत्मचरित्रात्मक लेखनाची कथा फार मोठी आहेः त्या त्या वेळी केलेल्या, म्हणजे घटना घडल्यानंतर लगेच केलेल्या, नोंदी (उदा. रोजनिशीतील वा दैनंदिनीतील नोंदी, पत्रव्यवहारातील नोंदी इ.); स्मृतीवर आधारून केलेली कथने वा आठवणी; धार्मिक नियमांना अनुसरून दिलेले कबुलीजबाब किंवा

अनुक्रमणिका

पापनिवेदने (confession); स्वतःच्या जीवनाचा समग्र, चरित्रात्मक आलेख म्हणजे आत्मचरित्र; चरित्रावर/आत्मचरित्रावर आधारून काल्पनिक साहित्य (कादंबरी, नाटक इ.).

आपले लेखन एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकारामध्ये पडते की नाही याविषयी स्वतः लेखक/लेखिका मत मांडू शकते. माधवी देसाई यांना आपलं आत्मकथन ही 'गेल्या चाळीस वर्षांतील भारतीय स्त्रीजीवनाची गाथा' आहे असे वाटते. (नाच ग घुमाः मनोगत). "आपण नेमके 'कोण' आहोत, ते समजलं आहे. आपलं-परकं समजलं आहे" अशीही वाक्ये 'दुसऱ्या मनोगता' मध्ये येतात, आणि या आत्मकथानामधून हे 'स्वतः कोण आहोत हे समजणं' वाचकापर्यंत पोहोचवायचा प्रयत्न आपण केलेला 'एक प्रामाणिक प्रयत्न' आहे असे लेखिकेला वाटते. आत्मचरित्रात्मक लेखन तथ्यांच्या दृष्टीने प्रामाणिक आहे की नाही याचा निर्णय मात्र इतिहासकारांवर वा तथ्यलक्षित्वावर भर देणाऱ्या समीक्षकांवर सोपविलेला बरा.

सुनीता देशपांडे यांनी 'आहे मनोहर तरी' या पुस्तकाच्या प्रारंभीच, 'हे आत्मचरित्र नाही' (पृ. १) असे म्हटले आहे. त्यांचे लेखन हे आत्मपर लेखन तर निश्चित आहेः स्वतःला विषय बनवून केलेले प्रथम पुरुषी निवेदन किंवा कथन तर येथे निश्चित आहे. ('पुरुष' ही संज्ञा येथे व्याकरणातील तांत्रिक संज्ञा आहे. कोणाचा आक्षेप असेल तर हे कथन 'प्रथम पुरुषी' आहे असे म्हणण्याऐवजी 'प्रथम व्यक्तित्ववाची' - first person - आहे, असे म्हटले तरी चालेल.) तेव्हा सुनीताबाईंनी नकार दिलेला आहे तो बहुधा 'चरित्र' या कल्पनेला असावा : स्वतःचे पद्धतशीरपणे वा सलगपणे आणि समग्रपणे लिहिलेले हे चरित्र वा इतिहास नाही, वस्तुनिष्ठ नोंदीवर आधारून हे लेखन केलेले नाही; ते प्रामुख्याने 'स्व'ला भिडलेल्या घटनांविषयी व व्यक्तीविषयी आहे, असे काहीतरी त्यांना अभिप्रेत असावे. लेखिकेच्याच शब्दात सांगायचे तर 'आठवणींच्या प्रदेशातली ही स्वैर भटकंती. ...दिशाहीन.' (पृ.१)

परंतु याला दुसरीही बाजू आहे आणि ती पुढच्याच वाक्यात प्रकट होते : 'पण स्वतःच्याच जीवनसूत्राशी अदृश्य संबंध ठेवत केलेली.' (पृ.१) तेव्हा 'स्वैर' आणि 'दिशाहीन' लेखन आहे, 'कोणतीही योजना न आखता', 'तुकड्यातुकड्यांनी केलेले हे लिखाण' आहे, असा दावा केलेला असला (पृ. १) तरी कोणत्यातरी सूत्राचा - जीवनसूत्राचा - त्याला आधार आहे, व त्यातून या लेखनाला काही कलात्मक अशी सलगता, एकात्मता प्राप्त होणार आहे असाही विश्वास येथे आहे. या पुस्तकात आपली जीवनगाथा लेखिकेने सलगपणे सांगितलेली नसली वा कालक्रमिक पद्धतीने आपला जीवनपट उलगडून दाखविलेला नसला तरी त्यात आई-वडील व भावंडे, बाळपणातल्या

आठवणी, भैयाची मैत्री, प्रेम आणि लग्न, नवरा व सासरची माणसे, कौटुंबिक जीवन व त्यातील कलह, सामाजिक-सांस्कृतिक जीवनतील कर्तबगारी, हे सर्व घटक समाविष्ट झालेले असल्याने याला आत्मचरित्र म्हणायला काहीच हरकत नाही.

या बाबतीमध्ये एका विरोधाभासाचा उल्लेख करायला हवा. हे लेखन म्हणजे एक 'स्वैर भटकंती' आहे, ते 'तुकड्या तुकड्यांनी' व 'कोणतीही योजना न आखता' केलेले आहे, असे प्रारंभी म्हटलेले असले तरी लेखिकेच्या 'पिंडा'चा वा स्वभावाचा तो भाग आहे, असे म्हणता येईल का ? आहे मनोहर तरीमध्ये अनेक ठिकाणी त्यांच्या स्वभावाविषयी एक अगदी वेगळे चित्र त्यांनी स्वतः काढलेले दिसते. अगदी कांदा सारखा चिरणे आणि मसाला नीट वाटणे या रोजच्या व्यवहारातील कृतीपासून ते शिक्षणक्षेत्रातील विधायक कार्यापर्यंत त्यांनी जे काही केले त्यात त्यांचा स्वभाव अगदी वेगळा दिसतो. आव्हान स्वीकारून, अत्यंत तपशीलवार योजना आखून त्या योजनांची अतिशय शिस्तशीरपणे कार्यवाही करणे, या प्रक्रियेला त्यांच्या जीवनामध्ये परमोच्च मूल्याचे स्थान आहे.

ही खरे म्हणजे विसंगती नसून येथे एक प्रकारचा विरोधाभास आहे, असे म्हटले पाहिजे. वर आपण वास्तव जीवनाचा संदर्भ आणि लेखनप्रक्रियेचा संदर्भ असे दोन संदर्भ वेगळे काढलेले आहेत, त्यांचा येथें उपयोग होईल. वास्तव जीवनातील लेखिका आणि लेखिकेची लेखनांतर्गत भूमिका यांच्यात गल्लत करण्याचे कारण नाही. 'स्वैर भटकंती' वगैरे विषयींची विधाने या लेखन-चौकटीमधल्या भाषिक खेळी म्हणायला हव्यात. हे आत्मपर लेखन वाचताना वाचकाने कोणती भूमिका घ्यावी, याविषयी काही सूचन या खेळीमधून होते आहे. अर्थात लेखिका म्हणून सुनीताबाईंचे मूल्यमापन करताना ही 'स्वैर भटकंती' विषयीची विधाने बाजूला ठेवावी लागतील. स्वतःच्या शक्ती, लेखनकौशल्ये, मूल्ये, सर्व काही पणाला लावूनच हे लेखन सुनीताबाईंनी केलेले आहे, असे आपण मानले पाहिजे, व त्या आधारानेच या लेखनाचे मूल्यमापन केले पाहिजे.

आत्मचरित्राचा किंवा आत्मचरित्रपर लेखनाचा भाषिक अंगाने थोडा अधिक विचार येथे करू. आत्मचरित्र म्हणजे स्वतःचे चरित्र. येथे दोन मुद्दे ध्यानात ठेवायला हवेत: एक म्हणजे, आत्मचरित्र हे चरित्र असते, व म्हणून येथे कथनात्म करार हा मूलभूत असतो. म्हणजे कथनकार/कथक ही भूमिका यात अतिशय महत्त्वाची ठरते. दुसरे म्हणजे आत्मचरित्रामध्ये लेखक आणि कथनकार यांना एका 'मी' ने बांधलेले असते. त्याचप्रमाणे कथनकार आणि कथनविषय वा नायक/नायिका यांनाही एकाच 'मी' ने बांधलेले असते. यात 'मी'ने 'मी' विषयी गोष्ट सांगितलेली असते आणि या संहितेंतर्गत 'मी'चा वास्तव जगातल्या लेखक/लेखिका 'मी'शी संबंध असतो.

अनुक्रमणिका

भाषिक वापराच्या दृष्टीने विचार करता 'मी', 'तू' यांसारख्या शब्दांचा नेमका अर्थ काय? हे शब्द नेमका कोणत्या व्यक्तींचा निर्देश करतात? हे प्रश्न प्रथम उपस्थित करायला हवेत. या शब्दांनी बोलणाऱ्याचा वा ऐकणाऱ्यांचा निर्देश होतो, ही गोष्ट उघड आहे. परंतु प्रत्यक्ष भाषिक व्यापारात प्रत्यक्ष बोलल्याखेरीज बोलणारा हा बोलणारा ठरतच नाही. शिवाय या व्यापारात कायम एकच व्यक्ती बोलेल असे नव्हे; बहुतेक वेळा बोलणारा व ऐकणारा ही कार्ये त्याच व्यक्तीकडून आलटून-पालटून घडत असतात. तेव्हा, 'मी', 'तू' (किंवा 'येथे', 'तेथे' हे दर्शक शब्द) यांचे अर्थ हे बोलण्याच्या प्रत्यक्ष क्रियेवर अवलंबून असतात. त्यांना 'चलपदे' (shifters वा floaters) म्हणता येईल. विशिष्ट क्षणापुरते ते विशिष्ट व्यक्तींचा निर्देश करतात, परंतु कोणत्याच एका व्यक्तीचा निर्देश त्यांच्या साहाय्याने कायम करता येणार नाही. ज्ञाता म्हणजे 'मी' असे म्हटले तर हा ज्ञाता भाषिक व्यवहाराबाहेर कोठेही अस्तित्वात नसतो, तर तो भाषिक व्यवहारामधून निर्माण होत असतो. क्रियापदांच्या आख्यातरूपामधून होणाऱ्या कालनिर्देशनाच्या बाबतीतही हेच म्हणता येते. वर्तमानकाळी रूपातून निश्चित कोणत्याही कालखंडाचा निर्देश होतो असे म्हणता येत नाही; प्रत्यक्ष बोलण्याचा क्षण हा वर्तमानकाळ होय, आणि तो तर सतत बदलत असतो. तेव्हा 'आत्म' (self), आणि 'पर' (other) या ज्ञातृसंबद्ध संकल्पना प्रत्यक्ष भाषिक व्यापारावर अवलंबून असतात; एका अर्थाने भाषाच ज्ञातृगततेला घडवते असे म्हणता येईल.

परंतु आत्मपर कथनसंहितेतील 'मी'चा विचार याही पुढे न्यायला पाहिजे. आत्मचरित्रातील 'मी'पण दुहेरी असते. 'आहे मनोहर तरी'चा आत्मचरित्रात्मक संहिता म्हणून विचार करताना आपल्याला त्यातील 'मी'चे दुहेरीपण पुढीलप्रमाणे टिपता येईल : एक म्हणजे सांगणारी 'मी', जी कथन करण्याच्या क्षणी भूतकाळात डोकावून पाहते आहे; दुसरी, भूतकाळातील 'मी', जिच्याविषयी कथन होते आहे. उदाहरणार्थ, 'आहे मनोहर तरी' मधले स्वतःच्या मनःस्थितीबद्दलचे पुढील वाक्य पहा -

'एकटी असले की आताशा कोण कधी समोर येऊन ठाकेल सांगता येत नाही.' (पृ. १) म्हणजे 'पूर्वी' असं होत नसे; भूतकाळातील 'मी' वेगळी होती.

किंवा

'आज पहावे तिथे सगळी स्वच्छ निराशाच दिसते.' (पृ. ३) अर्थातच 'काल'च्या म्हणजे भूतकाळातल्या 'मी'ला काही वेगळं दिसत होतं.

या दोन वाक्यांमध्ये कालवाचक शब्दांमुळे कथन करतानाच्या क्षणाची मी आणि आठवणीतली मी यात भेद आहे ही गोष्ट तर स्पष्टच आहे. काही वेळा हा भेद अगदी उघडपणे नोंदविलेला दिसतो : 'आज या टेबलापाशी बसून अलिप्त मनाने मी या आठवणी

अनुक्रमणिका

लिहितेय - पण त्या वेळी ... मी तनमनाने इतकी गुंतले होते की ....' (पृ. १४६)

'मी'च्या या विभाजनामुळे किंवा द्विभाजनामुळे आत्मचरित्राला, किंवा आत्मचरित्रात्मक लेखनाला इतर लेखनापेक्षा वेगळी परिमाणे लाभत असतात; त्याच्या करारशर्ती वेगळ्या असतात.

आत्मचरित्रात्मक संहितेमध्ये कथन करणारी व्यक्ती आणि जी कथनाचा विषय झालेली आहे अशी व्यक्ती, या दोहोंना 'मी'ने बांधलेले असते. या 'मी' ची ओळख पटणे ही आत्मचरित्राची एक करारशर्त म्हणता येईल. ही ओळख संहितेमधून पटेल अशी वाचकाची अपेक्षा असते. कथनाच्या क्षणाची 'मी' आणि भूतकाळातील 'मी' यांच्यातील साम्यभेदाचे नाते ही ओळख पटण्यातूनच निश्चित होत जाते. 'आहे मनोहर तरी'मध्ये ही ओळख सुनीताबाईनी अनेक ठिकाणी स्पष्टपणे पटवून दिलेली आहे :

"कोकणातल्या एका लहानश्या गावातली, सर्वसामान्य घरातली मी. साहित्य, संगीत, नाट्य वगैरेच्या वातावरणात रंगलेल्या घरात, त्याच क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या माणसाबरोबर आयुष्यभर गुंतून राहिलेली. राजकारणात अजिबात रस नसलेली. अगदी कोणत्याही प्रकारच्या राजकारणात.

"अशा माझ्या आयुष्याच्या मार्गात तारुण्याच्या सुरुवातीलाच आणि पुन्हा पन्नाशीनंतर अशी दोनच महत्त्वाची वळणे लागली आणि गंमत अशी, की या दोन्हींना कारणीभूत झाले ते राजकारणी स्वरूपाचे राष्ट्रव्यापी लढेच. पहिला बेचाळीस सालचा लढा आणि दुसरा आणीबाणीच्या वेळचा लढा." (पृ. २३७)

आत्मचरित्राच्या 'ऐतिहासिकते' मुळे किंवा तथ्यलक्षित्वामुळे आणखी एक अपेक्षा येथे निर्माण होते. केवळ कथनांतर्गत जगातच नव्हे तर कथनाबाहेरच्या वास्तव जगातही 'ओळखी'ची असणारी ही व्यक्ती आहे, अशी ओळख वाचकाला पटावी लागते. तशी ती पटली नाही तर ती संहिता काल्पनिकतेच्या ध्रुवाकडे ओढली जाईल. इथे 'ओळख' म्हणजे व्यक्तिगत ओळख अभिप्रेत नाही, आणि वाचक म्हणजे एक विशिष्ट व्यक्ती असेही अभिप्रेत नाही. वाचक म्हणजे एक आदर्शीकृत वाचक येथे अभिप्रेत आहे. मराठी साहित्यिक-सांस्कृतिक विश्वाची, इतिहासाची जाण असणारा 'सक्षम' वाचक येथे अभिप्रेत आहे. त्याला मुंबई, कोकण, कोल्हापूर, गोवा वगैरे स्थळांची जशी ओळख पटेल तशीच अपूर्वाई हे प्रवासवर्णन किंवा अंमलदार हे नाटक आणि ते लिहिणारे पु.ल. देशपांडे यांची ओळख पटेल, कुमारगंधर्व, भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे या संगीत क्षेत्रातील व्यक्तींची किंवा जे.पी.नाईक, भाऊसाहेब हिरे, राम जोशी या सामाजिक-राजकीय क्षेत्रांतील व्यक्तींचीही ओळख पटेल. 'आहे मनोहर तरी'च्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यातल्या कथन करणाऱ्या 'मी'ने स्वतःची आणि

अनुक्रमणिका

स्वतःच्या परिसराची जुनी ओळख तर दिलेली आहेच, परंतु त्याचबरोबर केवळ तेवढ्या ओळखीपुरते मर्यादित राहण्याचे नाकारून एक नवी ओळख जगाला पटवून देणे हे कथनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट मानलेले आहे. माधवी देसाई यांनीसुद्धा 'मी'ची ओळख स्पष्टपणे करून दिलेली आहे. रमाबाई सती जाण्याचा स्वामी या कादंबरीतील उतारा प्रारंभीच येतो आणि 'माझे पती' स्वामीकार रणजित देसाई असा उल्लेख लगेचच येतो. भालजी पेंढारकर, कुरुंदकर, यशवंतराव यांसारख्या व्यक्तींची ओळख यात पटते.

३. आत्मचरित्रात्मक लेखनाच्या करारशर्ती आणि शैली

आत्मचरित्राच्या बाबतीत एक महत्त्वाचा प्रश्न आपल्याला विचारावा लागतो : कथन करणाऱ्या 'मी'ने भूतकाळातल्या 'मी'च्या चरित्राचे कथन करण्याचे का ठरविले असावे ? नुसते 'मी'चे व्यक्तिचित्रण करून काम भागले नसते का ? उदाहरणार्थ, 'आहे मनोहर तरी'मधील कथनकार 'मी' ने 'माझा पिंडच असा-असा आहे - म्हणजे तसा तो होता, आहे व असणार आहे --'असे म्हणून काम भागले असते का ? 'माझ्यात बदल आहेत पण ते बाह्य स्वरूपाचे, वरवरचे आहेत,' असे या 'मी'ला म्हणता आले असते का ?

'मी'च्या पिंडाचे असे स्थिरचित्रण हे आत्मचरित्राच्या करारशर्तीमध्ये बसणारे नाही. आत्मचरित्र हे एक कथन असते, याचा अर्थच असा की ते केवळ वर्णनपर, स्थिरचित्रणपर असू शकत नाही. त्यात कालगतीचा अनुभव अपेक्षित असतो, आणि त्यासाठी 'मी'मधले मोठे परिवर्तन येथे असावेच लागते. या परिवर्तनामुळे तर कथनाच्या क्षणाची 'मी' मागे वळून भूतकाळातील 'मी'चा वेध घेऊ पाहते. 'आहे मनोहर तरी'मध्ये काही ठिकाणी हे स्पष्टपणे जाणवते. अगदी प्रारंभीच 'मी' मधील बदलाचा आलेला पुढील उल्लेख पाहा :

आयुष्याच्या सुरुवातीला, जिथून आयुष्य फुलायला लागते अशा वळणावर एक, आणि शेवटी शेवटी, म्हणजे जिथून आयुष्य उतरणीला लागते अशा वळणावर एक, असे दोन जबरदस्त मित्र मला लाभले. दोघेही अगदी भिन्न प्रकृतीचे, प्रवृत्तीचे. मीही तीच राहिले नव्हते; पार बदलून गेले होते. मधल्या काळात तिसऱ्याच एकाच्या सहवासात स्वतःला पूर्ण विसरून ...... (पृ. २)

'आहे मनोहर तरी' मध्ये भूतकालीन 'मी'ने घेतलेले निर्णय त्या त्या वेळी 'मी'ला मनोहरच वाटलेले होते, पण आजच्या 'मी'ला त्यांचा उदासवाणा परिणाम जाणवतो आहे, हेही 'मी'मधले परिवर्तनच होय.

'नाच ग घुमा'मध्ये 'मी'मध्ये घटस्फोटाच्या घटनेमुळे मोठेच परिवर्तन घडून आलेले आहे. कोर्टाचा निर्णय झाल्यानंतर आत्मचरित्राच्या अखेरीस येणाऱ्या पुढील

अनुक्रमणिका

कथनामध्ये 'मी'मधला बदल दडविण्याची थोडीशी धडपड जाणवते :

"कोल्हापूर-बेळगाव बस धावत होती. पूर्वी अशीच ताईंचा हात धरून बेळगाव बसमधून बाबांकडे गेले होते. बाबांचा तो आधार मला आजवर मिळाला आहे. तो आधार हे परमेश्वराचं वरदानचं आहे. आता मी बेळगावला परत चालले आहे. आताही आधार आहे परमेश्वराचा." (पृ.३२२)

"पूर्वी आणि आता या दोन्ही परिस्थितीमध्ये आधार मिळाला खरा. पण 'मी' मधला बदल त्यामुळे दडविता येणार नाही :

मी बेळगावला घरी आले. चौदा वर्षांनतर आता माझे नक्की ठरलेलं हेच छोटं घरकुल. घरमालक कुणीही असेना. वादग्रस्त सीमाभागातलं हे छोटेखानी घर. या गावाच्या सीमारेषेचा वाद कधी संपणार मला ठाऊक नाही, पण माझ्या जीवनाच्या सीमारेषा मात्र निश्चित झाल्या आहेत. त्यात मी स्वतःला बंदिस्त करून घेतलं आहे.

'नाच ग घुमाचा' आक्रोश आता थांबला आहे. (पृ. ३२३ : अधोरेखन मुळात नाही)

अशा परिवर्तनाला आणि त्यातून निर्माण होणाऱ्या मानसिक परिस्थितीला आत्मचरित्रामध्ये केंद्रवर्ती स्थान असते. त्यामुळेच आत्मचरित्र हे केवळ बाह्य ऐतिहासिक बदलाचे चित्रण राहात नाही; कथनाद्वारे, म्हणजे कालिक परिवर्तनाच्या द्वारे अंतर्गत परिवर्तनाचा वेध त्यामध्ये यावा, ही त्याची एक करारशर्तच असते.

'आहे मनोहर तरी'मध्ये भूतकाळातील 'मी'शी सबंधित घटना-प्रसंगांचे जे कथन येते ते केवळ एक मनोरंजक गोष्ट सांगायची आहे, त्यातून वाचकांना रिझवायचे आहे, म्हणून अर्थातच होत नाही. वर म्हटल्याप्रमाणे वाचकांना आजवर या 'मी'ची जी बाजू दिसलेली नाही ती दाखवून देणे, हे या पुस्तकाचे मुख्य विषयसूत्र आहे. 'स्वतःच्या जीवनसूत्राशी अदृश्य संबंध ठेवत' केलेले हे कथन आहे; 'साठा प्रश्नांची ही कहाणी' आहे. 'मी'च्या या अदृश्य जीवनसूत्राचा, 'मी'ला पडलेल्या साठा प्रश्नांचा अनुभव वाचकांना देण्यासाठी या आत्मचरित्रात्मक कथनामध्ये कोणत्या सुरावटी (tonalities) वापरलेल्या आहेत, ते येथे तपासायला हवे. त्यातूनच आत्मचरित्राच्या शैलीची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आपल्याला सापडू शकतील.

कालानुक्रमाने घटना-प्रसंगांचे चित्रण करणारी कथन-शैलीच आत्मचरित्राने वापरायला हवी असे नाही. आहे मनोहर तरीमध्ये कालानुक्रमी कथन नाही. किंबहुना कथनाचा धागाही या पुस्तकात सलगपणे येत नाही आणि त्यामुळेच 'हे आत्मचरित्र नाही' असा दावा लेखिकेला करता आलेला आहे. कथनाचा धागा तोडणाऱ्या दोन महत्त्वाच्या सुरावटी या पुस्तकात आढळतात. त्यातली एक सुरावट काव्यात्म

आविष्काराची सुरावट आहे. ही सुरावट पुस्तकाच्या शीर्षकापासूनच सुरू होते. वरवर दिसणारी बाह्य वस्तुस्थिती ('आहे मनोहर') आणि मनाच्या अंतर्भागात होणारी तिची जाणीव ('गमते उदास') यांच्यामधील विरोध ('तरी'), हे या पुस्तकाचे मुख्य आशयसूत्र या पुस्तकाच्या सुरावटीमधून सतत व्यक्त होत राहते. पुस्तकाची अर्पण-पत्रिका ही लेखन-खेळीसुद्धा याच सुरावटीत होतेः 'कवितांना : ज्यांनी आयुष्यभर साथ दिली' अधून-मधून येणारे काव्यात्म तुकडे, निसर्गाशी सबंधित अशा असंख्य प्रतिमा (पाखरे, पक्ष्यांचे लक्ष थवे, वेल्हाळ पाखरू, फांद्या, झाड, बोरकरांचे गडद निळे गडद निळे जलद, निळं गाणं निळ्या नदीत, नक्षत्रांची रांगोळीच रांगोळी, हसरी ओलसर नक्षत्रं, वगैरे वगैरे), यातून खूपशी सांकेतिक अशी 'काव्यात्म' सुरावट ठळक होत जाते. या सुरावटीला छेद देणारी दुसरी सुरावट आहे चिंतनपर बुद्धिवादी अविष्काराची. अस्तिक्य-नास्तिक्य, सद्‌गुण-दुर्गुण, पिंड, तत्त्वनिष्ठा आणि तडजोड, मूलपणा आणि मातृत्व, एकटेपणा आणि मैत्री, मानवी मूल्ये आणि व्यवहारात त्यांची होणारी पडझड, अशा अनेक महत्त्वाच्या विषयसूत्रांची चर्चा या पुस्तकात जागोजाग येते.

'नाच ग घुमा'मध्ये सुरावटीच्या आणि शैलीच्या बारकाव्यांना फारसे स्थान नाही. भावुक नाट्यमयता हा या कथनाचा स्थायीभाव म्हणता येईल. पुस्तकाच्या प्रारंभीच वर म्हटल्याप्रमाणे स्वामी या कादंबरीतला रमाबाई सती जाण्याच्या प्रसंगाचे चित्रण करणारा उतारा येतो. त्यावर भाष्य म्हणून लेखिकेचे पहिलेच वाक्य या नाट्यमयतेची चूणूक दाखविणारे आहे : 'स्वप्नातून मी जागी झाले. अनेकदा वाचलेला, मनात ठसलेला रमाबाईसाहेब सती जातानाचा प्रसंग, जो मराठी साहित्यात अजरामर ठरला आहे, ज्या प्रसंगानं वाचकांना वेडं केलं, रडवलं, तो 'स्वामी' कादंबरीतला हा उतारा आज पहाटेच का आठवावा?' (पृ.३०) या नाट्यमय प्रश्नाला उत्तर असे की 'काल आठ एप्रिल ! माझे पती रणजित देसाई यांचा वाढदिवस ! कालचा सारा दिवस अनेक आठ एप्रिल आठवण्यात सरला. भरल्या डोळ्यांच्या तळ्यांत अनेक आठ एप्रिल सावली धरून डोकावत होते.' आणि त्यानंतर आठ एप्रिलच्या नाट्यमय आणि भावविवश आठवणी तुकड्या-तुकड्यांनी येतात. घटस्फोटाच्या नाट्यमय घटनेभोवती घुमत राहणाऱ्या या आत्मकथनाचा शेवटही स्वतःचे दुःख कुरवाळत राहणारा आहे आणि त्याहीपुढे जाऊन भारतीय स्त्रीजीवनाविषयी भावुक generalizations करणारा आहे : माझ्या मनातली प्रेमवेल मी त्यात जपलेली आहे. अश्रूंचं सिंचन करून ती प्रेमवेल मी जगवणार आहे. ती सुकेल त्या दिवशी जगण्याचा हेतूच संपलेला असेल.

'नाच ग घुमाचा' आक्रोश आता थांबला आहे.

आता गळ्यात सौभाग्य अलंकार नाही.

पण......

मात्र कपाळावर लालभडक कुंकू आहे.

ती निशाणी आहे, माझ्या प्रिय हिंदुधर्माची ! बदलत गेलेल्या भारतीय स्त्रीजीवनाची, कपाळावरची ती रक्तरंजित खूण - मी भोगलेल्या वेदनेची, शोकाची, सुखाची, दुःखाची अन् मोहाचीही ! ....

एका कोमल, भावुक रक्तकमळाची !

जे प्रत्येक भारतीय स्त्रीच्या कपाळावर जन्मापासून रेखाटलेले आहे ! (पृ. ३२३)

वरील उद्धृतामधील सर्व उद्‌गारचिन्हे, टिंबे आणि परिच्छेदरचना मुळाबरहूकुम आहेत. प्रश्नचिन्हे, उद्‌गारचिन्हे आणि टिंबे, त्याचप्रमाणे एखाद्या शब्दाचे, अर्धवट सोडलेल्या वाक्याचे परिच्छेद, आक्रोश, आकांत, हुंदके, वेदना, दुःख हे शब्द - या साऱ्यांची गणतीच करता येणार नाही. भावुक नाट्यमयतेचा ध्यास लागलेल्या 'मी'ची ओळख यातून निश्चितच पटते.

कोणत्याही भाषिक वापरात 'मी' आल्याबरोबर 'तू' येणे अपरिहार्यच असते. आत्मचरित्रात्मक कथनामध्ये कथनकार 'मी' च्या जोडीला गर्भित वाचक 'तू' / 'तुम्ही' या भूमिकेत अभिप्रेत असतो. म्हणजे 'मी'चे कथन उघडपणे 'तू'ला उद्देशून चाललेले नसले तरी गर्भित पातळीवर 'तू' ची अपेक्षा असते. आत्मचरित्रामध्ये 'मी' आणि 'तू'चे हे नाट्य वेगवेगळी रूपे कशी धारण करू शकते, ते पाहण्यासारखे आहे.

आत्मचरित्रामध्ये संहितांतर्गत 'मी' अनेक रूपांमध्ये येऊ शकतो. उदाहरणार्थ, हा 'मी' स्वतःला किंवा स्वतःच्या एका रूपाला 'तो' म्हणून पाहू शकतो, वाचकाला 'तू' म्हणून उद्देशून कथन करू शकतो, इत्यादी. काही आत्मचरित्रांमध्ये 'तू'च्या या भूमिकेला गर्भित न ठेवता स्फुट केलेले असते. बलुतंमधील आत्मकथनाला जी चौकट आहे तिचा उल्लेख आपण वर केलेला आहे. या चौकटीमध्ये 'मी'च्या भूमिकेचे विभाजन 'मी' आणि 'तो' या भूमिकांमध्ये केलेले आहे : 'तो एकटा असला, म्हणजे त्याची आणि माझी हमखास भेट होते. मला कळू लागल्यापासून तसा मी त्याला ओळखतो.' (पृ.१) यातला 'तो' आत्मकथन करणार आहे, व ते 'मी'ला उद्देशून करणार आहे, म्हणजेच 'मी'ला 'तू'बनवून करणार आहे. हे आत्मकथन संपल्यावर अखेरीस पुन्हा 'मी' बोलू लागतो आणि 'दगडू पवार' म्हणजे 'तो' वेगळा होऊन 'समोरच्या प्रचंड गर्दीत सामावलेला दिसतो.' (पृ. १९४)

वाचकाशी बोलणाऱ्या 'मी'ने हे 'तो'चे आत्मकथन वाचकासमोर ठेवलेले आहे.

या गर्भित वाचक-भूमिकेला किंवा 'तू'ला उद्देशून कथन करण्याऐवजी मध्येच दुसरीच कोणी व्यक्ती 'तू' बनली तर एक वेगळा 'नाट्यात्म' परिणाम साधणारी लेखन-

खेळी म्हणून तिच्याकडे पाहावे लागते. आहे मनोहर तरीच्या शैलीचा एक विशेष येथे नोंदविण्यासारखा आहे. पुस्तकाच्या प्रारंभीच्या तीन-चार पानांमध्ये जे काव्यात्म चिंतन येते त्यात याचे एक उदाहरण सापडते :

आज पाहावं तिथे सगळी स्वच्छ निराशाच दिसतेय. आकाशदेखील कुठे निळे नाही. सगळीकडे एकच राखी रंग, अगदी निर्मळ किंवा विशुद्ध कारुण्याची राखी रंगच्छटा. Gray of the purest melancholy.... कदाचित साऱ्या सजीव-निर्जीव सृष्टीशी माझे अज्ञात नाते असेल. शेवटी त्याच मूलतत्त्वांतून - पंचमहाभूतांतून - सारी सृष्टी निर्माण झाली ना ? मग सारे काही अदृश्य धाग्यांनी जोडलेले नसेलच कशावरून ? समोरच्या खिडकीच्या लोखंडी गजांचे माझ्या रक्तातल्या लोहाशी नाते असेलही. समोर कोण राहतो ? त्याची-माझी ओळख नाही, त्याचे नाव मला माहीत नाही. अरे वेड्या, आम्हा बाहेरच्या लोकांपासून संरक्षण मिळावे म्हणून खिडकीच्या झरोक्यात तू उभे केलेले हे लोखंडी पहारेकरी आमच्याही नात्यातलेच आहेत हे कसे विसरलास ? (पृ.३)

येथे या अनाम समोरच्याला उद्देशून उच्चारलेले हे वाक्य भावनिक आर्ततेचा परिणाम साधून जाते. मात्र गर्भित वाचकाला 'तू' समजून होणाऱ्या कथनाचा धागा लगेच जुळविला जातो : 'हा विचार आला आणि सगळे काही मूर्खपणाचेच वाटायला लागले.' (पृ.३) नाना जोगांच्या आठवणीच्या (पृ.२१८) संदर्भातही काहीसे असेच घडते.

या प्रकारचे अधिक ठळक असे उदाहरण दलित कवींच्या संदर्भात येते. प्रथम 'एक दिवशी नवी कविता घरात आली' या विषयीचे कथन येते (यशवंत मनोहरांच्या) कवितेवरील भाईची प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्यावर

"आमचे घर हे मग त्या लोकांना माहेर वाटू लागले. .... मग या नव्याने निर्माण झालेल्या नात्यांत देवघेव चालू झाली. ... यांत कुठेही ढोंग नाही. सगळे कसे मनापासूनचे, माणसांमाणसांतले, आणि म्हणून साजरे, स्वागतार्ह. पण -...(पृ.२३१)"

आणि या 'क्लेशकारक ... मन पार पोखरत' जाणाऱ्या 'पण' मधून 'नकळत त्या दलित बांधवाशी मनाचा मूक सवाद सुरू होतो.':

खरंच का आपलं नातं माहेरचं आहे ? त्या शब्दाची पूर्ण व्याप्ती तुमच्या लक्षात आली आहे ना ? अर्ध जग व्यापणाऱ्या आम्ही स्त्रिया. आम्हाला तो शब्द लाखमोलाचा आहे. ...'माहेर' या शब्दाची जबाबदारी स्वीकारण्याची तुमची तयारी आहे का ? (पृ. २३१)

दलित कवींशी केलेला हा 'मूक संवाद' बऱ्याच विस्तृतपणे नाट्यछटेच्या रूपात बोलका होतो. स्त्रियांचे दुःख आणि त्याच्याही पलीकडे असणारे 'पुरातन दुःख' यांच्याशी

दलित कवींनी नाते जोडायला हवे. असे आवाहन त्यात आहे तक्रारीचा आणि त्याचबरोबर खडसावणीचा सूरही आहे :

आयाबहिणींच्या दुःखाचं भांडवल करून कागदावर उतरविणारे जाहीर हुंदके कागदी आणि कृतिशून्यच राहणार असतील तर - तर मग तुमचं आमचं नातं आम्ही कोणतं समजायचं ? 'कालचा पाऊस' सारख्या कितीतरी सुंदर ओळी तुम्ही मराठी कवितेला दिल्या. पण माणसं म्हणून तुम्ही इतर साहित्यिकांहून वेगळे आहात का ? (पृ. २३२-३३)

'तुम्ही आमच्या घराशी माहेरचं नातं जोडलंच आहे, तर या माहेरघराची ओळख व्हायला तिथे घडलेली एक गोष्ट तुम्हाला सांगते,' अशी प्रस्तावना करून मावशीची एक गोष्टही यात ओढून-ताणून आणलेली आहे. आत्मचरित्राच्या कथनकाराची भूमिका सोडून लेखिकेने ही जी अधिक नाट्यमय अशी संवादकाची भूमिका स्वीकारली आहे, ती फार लांबलेली आहे. तीन-चार पाने चालणारी ही नाट्यछटा एकूण कथनाच्या चौकटीमध्ये बरीचशी कृत्रिम वाटते.

'मी'ची ओळख, 'मी'चे विभाजन, 'मी' मधील परिवर्तन, 'मी' व 'तू'चे नाट्य - ही सर्व घटकतत्वे आत्मचरित्र या साहित्यप्रकाराच्या करारशर्तीच आहेत आत्मचरित्राच्या या स्वरुपाचा, त्याच्या करारशर्तीचा शोध घेताना असे लक्षात येते की या साहित्यप्रकाराची एकाच प्रकारची खास अशी शैली असते असे म्हणता येणार नाही. अनेकविध सुराजटी या प्रकारामध्ये सामावल्या जाऊ शकतात. 'मी'ची ओळख पटण्यासाठी कथनाबरोबरच येथे नाट्यमयता, काव्यमयता, वर्णनात्मकता, तत्त्वचिंतन, वगैरे अनेक भाषिक खेळी आत्मचरित्रकारापाशी उपलब्ध असतात. या घटकांचा उपयोग कोणत्या प्रकारे व किती प्रमाणात होतो त्यावर विशिष्ट आत्मचरित्राचे स्वरूप अवलंबून असते.

टीपा

१. 'तत्कालीन समाजस्थितीचे ... तपशीलवार चित्रण स्मृतिचित्रांत आढळते. त्या काळात परगावी राहणाऱ्या कोणासही दहा रुपये पाठविले की त्याचे भागू शकत असे! ... तेव्हाचे कौटुंबिक जीवन, कुटुंबातील माणसांत असलेले अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध, परस्परांच्या मदतीला उभे राहण्याची तेव्हाची वृत्ती, समाजांतल्या वेगवेगळ्या वर्गांचे परस्परसबंध आणि मुख्य म्हणजे त्या काळातील स्त्रीजीवन याविषयी कितीतरी माहिती अनेक बारकाव्यासहित लक्ष्मीबाईंनी सहजगत्या दिली आहे. ... लक्ष्मीबाईंनी सर्वांत अधिक माहिती दिली आहे ती आपल्या भाषेच्या द्वारे. खरोखर एखाद्या

समाजशास्त्रज्ञाने या भाषेचा अभ्यास करून एक प्रबंध लिहिण्यासारखा आहे.' (गाडगीळ, १९६२ : ७३-७४)

'एका दृष्टीने आनंदीबाईचे चरित्र हे गेल्या पिढीतील मराठा स्त्रीचे प्रातिनिधिक चरित्र आहे. ... त्यांनी आपल्या वेगळ्या मराठा समाजाचा परिचय कुशलतेने आणि संयमाने करून दिलेला आहे. ....' (शिर्के, १९७२ : वि. द. घाटे यांची 'प्रस्तावना')

२. या खेळींच्या बरोबरच विधीकरण (ritualization) - विधिवत् प्रयोग करणे, वाचिक कृत्याला शारीरिक जोड देणे, अशी एक व्यापक 'खेळी' नाट्यसंहितेच्या संदर्भात मांडता येईल आणि संवादन हा या खेळीचा एक भाग मानता येईल. साहित्य-संहिता संवादरूपी असल्यास ती नाट्यात्मकतेचा अनुभव देते. कथनाच्या संदर्भात संवाद आल्यास नाट्यात्मकता कशी निर्माण होते याचा विचार पुढे येईलच. प्लेटोने diagesis(सांगणे) आणि mimesis (दाखविणे) यांत भेद करून या करारव्यवस्थेच्या मांडणीला प्रारंभ करून दिला. विसाव्या शतकात संरचनावादी सैद्धांतिकांनी ही भूमिका पुढे विकसित केलेली आहे. उदाहरणार्थ, जेने या फ्रेंच संरचनावादी कथनमीमांसकाने पुढीलप्रमाणे मांडणी केलेली आहे. (पाहा : Genette, १९७६):

LEXIS
DIEGESIS MIMESIS
DESCRIPTION NARRATION
NARRATIVE DISCOURSE

३. रा. भा. पाटणकरांनी आहे मनोहर तरी या आत्मचरित्राच्या संदर्भात व्यक्तीचे लौकिक संदर्भ पूर्णपणे बाजूला सारून वाचन केलेले आहे : 'मी स्वतः पु. ल. किंवा सुनीताबाई यांना व्यक्ती म्हणून ओळखत नाही. ही व्यक्तिगत माहिती माझ्याजवळ नाही. ती मिळविण्याचा मी प्रयत्नही केलेला नाही. त्यांच्याविषयी मी जी विधाने करीन त्यांच्या पुष्ट्यर्थ वापरलेला पुरावा हाही पुस्तकगत असणार आहे. या पुस्तकाच्या केंद्रस्थानी जी (खरी किंवा कल्पनात्मक पातळीवरची) व्यक्ती आहे. तिच्यापुढील प्रश्नांत, त्यावर तिने शोधलेल्या उत्तरांत मला रस आहे. ही व्यक्ती, तिचे प्रश्न व उत्तरे यांच्यात, एक प्रकारची प्रातिनिधिकता आहे.' (पाटणकर, १९९२:११)

४. एमिल् बांवनिस्त् या फ्रेंच अभ्यासकाची भूमिका या संदर्भात महत्त्वाची आहे : Language is .... The possibility of subjectivity because it always contains the linguistic forms appropriate to the expression of subjectivity because it consists of discrete instances. In some तरीः शैली-रूपलक्ष्यी दृष्टिकोन.'

अनुक्रमणिका

यादव, आनंद (१९८९ : दु. आ.) झोंबी. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.

शिर्के, आनंदीबाई (१९७२) सांजवात. मुंबई: मौज.

हस्तक, उषा (१९९२) 'मराठीतील आत्मचरित्रात्मक लेखन आणि आहे मनोहर तरी'. प्रतिष्ठान. सप्टेंबर-ऑक्टोबर १९९२. वर्ष ४०, अंक १. पृ. ३२-४४.

इंग्लिश

Benveniste, Emile. 1971. Problems in General Linguistics. (Translated from French by Mary Elizabeth Meek). Coral Gables : University of Miami Press.

Gemette, G. (1976)."

New Literary History, 8: 1-13.

Starobinsky, Jean (1971). "The Style of Autobiography". In Chatman, S. (ed.) (1971).

Literary Style : S Symposium. London : OUP.

- मिलिंद स. मालशे,
आय.आय.टी.पवई, मुंबई ७६

⌘⌘⌘

आशा नाम नदी

रमेश दा. गाडे

मध्यरात्रीच्या सुमारास राजपुत्र बाहेर पडला तेव्हा पहारेकऱ्यास किंचित आश्चर्य वाटले. पण ते आश्चर्य आता नेहमीचेच झाले होते. राजपुत्राची रात्री अपरात्री बाहेर फिरण्याची, राजप्रासादातल्या बागेतील एखाद्या आसनावर जाऊन प्रहर तीन प्रहर स्तब्ध बसून राहाण्याची सवय त्याला नवीन नव्हती. त्याच्या शय्यागृहात आता तरुण, सुस्वरूप पत्नी व छोटा निरागस पुत्र अगदी गाढ झोपलेले असतील, अशा वेळी पत्नीच्या अंगावर हात टाकून दोघांनाही कवेत घेवून झोपण्याचे सुख नाकारून हा तरुण राजपुत्र एकटाच कसला विचार करीत असतो ह्याचे आश्चर्य वाटले नव्हते असे नाही पण ते फक्त पहिल्यांदाच. नंतर ते नेहमीचेच झाले होते. व त्याचे आश्चर्य ओसरले होते. शेवटी प्रत्येकाचे सुख दुःख हे पूर्णतः ज्याचे त्याचेच असते व ते मूळ मालकास फारसे लांब भटकू देत नाही, असा त्या पहारेकऱ्यांचा होरा होता.

राजपुत्र बाहेर पडला तो राजवाड्याच्या सिंहद्वाराजवळ आला. त्यावेळी दोन्ही पहारेकऱ्यांचे भाले त्याला अडविणारच, एवढ्यात पहारेकऱ्यांना आपण कोणास

अडवत आहोत हे समजले व त्यांनी रस्ता खुला करून देत खडी ताजीम दिली.

राजपुत्र राजवाड्याबाहेर पडला व भराभर रस्ता कापीत नगराबाहेर निघाला. नगराच्या वेशीवर पहारेकऱ्यांचा तोच अडथळा त्याला होणार होता पण पूर्वीप्रमाणेच तोही दूर झाला व तो राजधानीपासून दूर जाणाऱ्या रस्त्यावर मार्गस्थ झाला.

ती रात्र अमावस्येची होती व चंद्र जरी नसला तरी आभाळ चांदण्यांनी खचून भरले होते. रात्रीचे तारुण्य उबाराला लागायची वेळ होत आली होती. सप्तर्षी उत्तरेकडे झुकायच्या तयारीत होते. हवेत किंचित गारवा होता. सभोवार काळोख होता व जो काय उजेड असेल तो फक्त ताऱ्यांचाच होता. पायाखालची वाट दिसणे त्या काळोखात कठिण होते व रस्ता अरण्यातून होता. मध्येच काटेरी झाडे राजपुत्राच्या अंगावरची रेशमी वस्त्रे ओरबाडून काढीत व कधी कधी तर त्याच्या शरीराला रक्ताचा एखादा टपोरा थेंब टारून उठे तेव्हा राजपुत्र चालता-चालताच तो पुसून टाकी व जणू पावलांना डोळे फुटल्यासारखा त्या घनदाट अरण्यातील कामचलाऊ पायवाटेवरून चालायला लागे.

त्याला त्या निर्बिड अंधाराचे, घनदाट जंगलाचे, बोचऱ्या थंड वाऱ्याचे अन् काट्याकुट्यांचे भानच नव्हते. एखादा चर्मवाद्यावरचे कातडे वादकाच्या आघातांनी सतत थरथरत रहावे तसे त्याचे मस्तक भ्रमत होते व त्या भ्रमणासमोर हे भ्रमण काहीच नव्हते.

काही दिवसांपूर्वीच मृगयेस निघाला असताना त्याने एक जराजर्जर म्हातारा पाहिला होता. तो कमरेत वाकला होता व त्याला जरासे झुकविले असते तर त्याचे डोके त्याच्याच पायास लागते. राजपुत्राला याचे अत्यंत आश्चर्य वाटले होते. आतापर्यंत त्याच्याभोवती उंची कापडाची वस्त्रे घातलेले राजदरबारी, तलम कापडांनी आवृत अशा सुंदर दासी, स्वतःची अति कोमल अशी पत्नी व सुकुमार असा पुत्र ह्या सर्वांचा गराडा असायचा आणि ह्या गराड्यात जरेला, आधिव्याधींना, दुःखांना प्रवेश नव्हता. पण हे प्रासादातले जग होते व ते त्याच्या पुरतेच खरे होते. बाहेर जरामरण, दुःख, दैन्य हे होतेच. फक्त राजपुत्राला ते दिसत नव्हते एवढंच. पण राजपुत्राला त्या दिवशी तो म्हातारा दिसला होता अन् काळ्या सूर्याच्या त्या पहिल्या किरणाने राजपुत्राच्या गौर कोमल अंगावर जणू एक चरचरून भाजल्या गेल्यासारखा डाग पडला होता.

तर मग असे असते तर माणूस शेवटी पायाळू होतो तो असा. स्वतःच्या मनात येऊनही एखाद्या प्रमदेकडे पाहाणे लांबच, थरथरती मान स्थिर ठेवून शून्यात पाहाणेही जर अशक्य होत असेल तर ह्या शरीराचा भरवसाच काय हा प्रश्न त्याला पहिल्यांदाच. एखाद्या सावकाराने ऋणकोच्या दारवठ्यात ठाण मांडावे, तसा पडला होता व तो अजूनही तिथेच बसून होता. त्याला कसे घालवावे हे राजपुत्राला कळले नव्हते. मग त्याला हेही

आठवले होते की नाना प्रकारचे पुष्टिवर्धक पाक, याकुती, कायाकल्प चूर्ण व कामवृद्धी करणारी औषधे बटव्यात असूनही स्वतः राजवैद्याची हालत काही त्या म्हाताऱ्यापेक्षा फारशी वेगळी नव्हती. नवीन राजवैद्य नेमण्याबद्दलचा प्रस्ताव त्याच्या मंत्र्याने प्राथमिक स्वरूपात त्याच्यापुढे मांडला होता. हे आठवले तेव्हा राजपुत्र अंतर्बाह्य ढवळून निघाला होता. आणि आपल्या मनातच नव्हे तर शरीरातही एक अपरिवर्तनीय असा बदल झाल्याचे त्याला वाटून गेले होते.

पण त्या वृद्धाने दाखविलेल्या सूर्यांच्या ह्या किरणापेक्षाही अती दाहक प्रकाश नंतरच्या कांही दृश्यांनी त्याला दाखविला होता. व मृगयेनंतरचा राजपुत्र हा मृगयेपूर्वीच्या राजपुत्राहून कायमचा विभक्त झाला होता.

नंतर त्याला दिसला होता तो एक व्याधिग्रस्त माणूस. तो रस्त्याच्या एका कडेला पडला होता व राजपुत्राचा रथ, त्याला जोडलेले घोडे, त्यात असलेला सुकुमार कुमर, त्या मिरवणुकीतले अग्रभागी चालणारे संरक्षक शिपाई, लोकांनी बाजूस व्हावे म्हणून त्यांनी दिलेल्या हाळ्या अन् प्रसंगी केलेली जबरदस्ती ह्या सर्व गोष्टी त्या माणसाच्या खिसगणतीतही नव्हत्या. तो राजपुत्राकडे पाठ करून व एका भिंतीकडे तोंड करून पडून राहिला होता. व एवढी मोठी मिरवणूक अंगावरून गेली तरीही त्याच्या अंगावर किंचितही थरार उठला नव्हता. मग राजपुत्राचा जयजयकार करणे लांबच. इतरांनी केलेल्या जयजयकारात आपलाही सूर लावून देणे एवढेही त्याने केले नव्हते. ती मिरवणूक त्याच्यासाठी नव्हतीच. शेजारी बसलेल्या मंत्र्यास राजपुत्राने विचारले होते, "रस्त्याच्या कडेला घडलेला तो माणूस कोण आहे ?"

यावर तो मंत्री रथातून खाली उडी मारून त्या माणसाची वासलात लावण्याच्या बेतात होता. पण राजपुत्राने त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्यास थांबविले व म्हटले, "मी तुम्हास तो माणूस कोण आहे एवढेच विचारले होते."

"महाराज तो माणूस रक्तपितीचा रोगी आहे."

"रक्तपिती ? हे काय असते ?"

"महाराज, तो भयानक रोग आहे पण सुदैवाने संसर्गजन्य नाही. ह्या रोगात माणसाचे रक्तच नासून जाते. अंगावरचे मांस झडत जाते, बोटे वाकडी होतात व शेवटी एखाद्या कवटीवर अगदीच जरुरीपुरते मांस चिकटवावे तसा माणसाचा चेहरा दिसायला लागतो. मुख्य म्हणजे अशा माणसाला विस्तवात लोटले तरी त्याचा चटका त्यास लागत नाही व झिजत झिजत मरण येईल तेव्हा मरून जाणे... मरण, पण झिजत जाण्याची पूर्व अट असलेले मरण हेच त्याचे प्राक्तन असते." आपण त्या रोग्याचे वर्णन जरा जास्तच केले असे मंत्र्याला वाटले व तो घाईघाईने म्हणाला, "कसूरीची माफी असावी महाराज,

अनुक्रमणिका

पण शिपायांच्या हातून जरा गलथानपणा झाला. मी आताच.." असे म्हणून मंत्री पुन्हा रथाखाली उतरण्यास सिद्ध झाला पण यावेळी राजपुत्राने त्यास नुसत्या नजरेच्या जरबेनेच खाली बसविले. राजपुत्राचे मंत्र्याच्या बोलण्याकडे शेवटी शेवटी लक्षच नव्हते कारण काळ्या सूर्याचा आणखी एक किरण त्याच्या अंगावर पडला होता... मरण. तो शब्द ऐकता क्षणीच एखादा अज्ञात पण भावी शाप समूर्त होऊन आपल्यापुढे उभा ठाकला आहे व त्या महारोग्यास जशा इतर संवेदना जडशीळ झाल्या होत्या तसाच मंत्र्याचा शब्द-जंजाळ त्याच्यासाठी मोठ्या डौलाचा पण अर्थशून्य ठरला होता. मरण,मरण: काय असते ते ? हा एकच प्रश्न त्याच्या मनःपटलावर उमटत राहिला होता.

त्यासाठी त्यास फार काळ वाट पहावी लागली नव्हती. एक प्रेतयात्राच त्या रस्त्याने चालली होती व मागून राजपुत्राची स्वारी येताना दिसताच घाईघाईने तिच्यातील माणसे बाजूला झाली होती व त्यांनी त्याच्यासाठी रस्ता मोकळा करून दिला होता.

हे सारे राजपुत्राने पाहिले होते. चार माणसांच्या खांद्यावरची ती तिरडी, तिच्यावरचे शुभ्र आणि पातळ प्रेतवस्त्र, गुलाल, हार, गळ्यापर्यंत झाकलेले ते शव व उघडा असलेला त्याचा चेहरा, त्याची डगमगती मान हे सर्व त्याने पाहिले होते आणि एक थंड झोत आपल्या अंगावरूनही गेल्याची अत्यंत स्पष्ट जाणीव त्याला झाली होती. त्याने पुटपुटून विचारले होते, "कुठे निघाले हे लोक ?"

"महाराज, ही अंत्ययात्रा आहे. ह्या शवास ते स्मशानांत नेवून मंत्राग्नी देणार व मग सारे संपणार." काय बोलावे न सुचल्याने मंत्री सुचेल ते बोलून गेला होता.

पण मंत्री खरंच बोलत आहे, फक्त शब्दांची जुळवाजुळव तो म्हणावी तशी करू शकला नाही हे राजपुत्राने ओळखले होते. पण नंतर त्याला वाटले होते, शब्दांचे बुडबुडे इथं काय कामाचे ? एखाद्या मुकस्तंभालाही अगदी डोळ्यात बोट खुपसावे तसे जाणवणारे सत्य जर अगदी समोरच दिसत आहे तर शब्दांची गरज काय ? आपणही तो प्रश्न उत्तर माहीत असूनही केवळ स्वतःची भीती लपवावी म्हणून विचारला होता व मंत्र्यानेही त्याचे उत्तर आपली चाकरी टिकवावी म्हणून कसे तरी दिले होते हे त्याच्या ताबडतोब लक्षात आले होते.

अस्सं आहे तर. म्हणजे, माणूस जराजर्जर होणार, त्याचा आपल्या शरीराचा ताबा राहणार नाही आणि शेवटी चार वाहकांच्या पालखीत बसून तो जरेपाड जाणार किंवा मग व्याधिग्रस्त होऊन साऱ्या चटक्या-दाहांपासून मुक्त होऊन तो पुन्हा याच पालखीत बसणार. पालखी ठरलेलीच आहे. पण गंमत पाहा, म्हाताऱ्याचे शरीर तर मृत्यूनंतर अचेतन होणार. त्याला अगिनडाग काय बसणार ? पण महारोग्याचे शरीर जिवंतपणीच बधिर होऊनही पुन्हा त्याच्यावर मृत्यू आपली मुद्रा उमटविणार व त्यालाही

अग्निस्नान घडणार. दोघांचीही शुद्धी शून्यच. आणि हे सारे अटळ... एकदा इथे जन्म घेतल्यावर मरण अटळच. फक्त आईच्या उदरात असेपर्यंतच काय ते आपण सुरक्षित, हे सारे त्याला वाटून गेले होते. काळ्या सूर्याचा प्रकाश आता त्याच्या अंतरंगात पूर्ण पडला होता व राजपुत्र अंतर्बाह्य बदलून गेला होता. पण याची त्याच्या बरोबर असलेल्या मंत्र्याला किंवा इतरांना माहितीच नव्हती. राजपुत्राचे लक्ष आज-म्हणावे तसे मृगयेत लागले नाही एवढेच त्यांना कळले होते.

त्या दिवसांपासून राजपुत्र बदलला तो कायमचा.

जरा, व्याधी, मरण हे जर शेवटी खरे आहे, 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' हेच जर अटळ सत्य असेल तर मग शरीराचे तरी लाड काय कामाचे ? आणि त्यापासून लाभ काय ? एखादे कोकरू मोठ्या लाडाने वाढवावे आणि शेवटी कसायाचे हाती देऊन मोकळे व्हावे असेच नाही का हे ? ही सुंदर वस्त्रे, ह्या सुंदर ललना, हे सुग्रास अन्न, परांच्या गाद्यांचे ते बिछाने, रतिक्लान्त झालेल्या पत्नीकडे पहाण्याचे ते सुख आणि त्या आधीची तथाकथित सृजनप्रक्रिया.. सृजन, कसले सृजन ? सृजन की मृत्यूचे भाजन ? ..., हे सारे काय आहे ? आपण स्वतः अंततः दुःखपर्यवसायी अशा यात्रेत उत्साहाने भाग घेणार. आपण असे भाग घेणारेही निर्माण करणार. उजू आहे का हे सारं. कजू नसलं तरी ? कोणतीही खेळी खेळले तरी शेवट चुकत नाही, स्वतःला व इतरांना दुःख दिल्यावाचून राहत नाही. मग हे दुःखच खरे मानणे भाग आहे. कारण प्रत्येकाचे खेळण्याचे फासे वेगवेगळेच असणार. कुणाचे हस्तिदंती, कुणाची वल्कले, कुणाची राजवस्त्रे, कुणाच्या रंभा-मेनका, कुणाच्या हिडिंबा आणि त्यांनी दिलेले क्षणिक स्निग्ध नव्हे तर चिकट सुख अन् त्यात आपण रोपलेला दुःखाचा कंद. पण खेळाचा शेवट सर्वांनाच सारखा. डुगडुगती मान साऱ्यांचीच, अस्थिरता प्रत्येकाचीच, उचलबांगडी झाल्यावरच बांगडीची व्यर्थता कळणार पण तेव्हा कळून लाभ नाही. तर मग खेळाचा पट घडी करून ठेवण्याआधीच ह्या खेळावर, त्यातील धोंड्यासारख्या जडशीळ दुःखावर काही मार्ग सापडेल काय ? मृत्यूचा हा फास प्रत्येकाच्या गळ्यात असूनही सार्थपणे जगता येईल काय, इतरांना जगविता येईल काय हे प्रश्न राजपुत्राला मृगयेच्या त्या दिवसापासून पडले होते. त्या दिवसापासूनच त्याचे राजवाड्यातून रात्री अपरात्री बाहेर पडणे सुरू झाले होते. आणि आज तर तो तरुण, सुस्वरूप, सुकुमार पत्नी आणि त्याच्या गळ्यातील ताईतच असा तो निरागस राजकुमर ह्यांच्याकडे एकदाही न पहाता निघाला होता तो ह्या अटळ दुःखावर मात करण्याची प्रतिज्ञा करूनच. ह्या दुःखावर मार्ग सापडेपर्यंत घरी परतायचे नाही हे त्याने पक्के ठरविले होते. आणि तो सापडला की आपण ज्यांच्यात जन्मलो त्यांना ती जादू कशी दाखवू ती पाहून त्यांना किती हर्ष होईल, जीवनावर सार्थकतेचे एक पुट कसे चढेल हेही

अनुक्रमणिका

तो कल्पत होता.

मनातल्या मनात उसळणाऱ्या ह्या विचारवादळामुळे त्याला आपण किती अंतर चालून आलो, आपल्याला किती काटे बोचले व किती ओरखडे उमटले ह्याचे भानच नव्हते. जणू मेंदूने इतर अवयवांशी फारकत घेतली होती व प्रत्येकाने नेमून दिलेले काम करावे अशी आज्ञा देऊन तो आपल्या कामात मग्न झाला होता व एवढे खरे की आता राजपुत्राचे सारे कपडे चिंध्या चिंध्या झाले होते, अनवाणी पायात काटे शिरले होते व सर्वांग बोरीबाभळीच्या काट्यांच्या ओरखड्यांनी विद्रूप झाले होते. केस विस्कटले होते. डोळे जागरणाने चुरचुरत होते व त्यांच्या कडावर पाणी जमू लागले होते. काहीशा दीर्घ अशा ह्या प्रवासाने आता त्याला थकवा आल्यासारखा झाला होता. त्याच्या केसात ठिकठिकाणी जीर्ण पानांचे तुकडे विसावले होते. पण राजपुत्रास ह्याचे भानही नव्हते. एखाद्या तांत्रिकाने बाकी साऱ्या क्रियाप्रक्रिया उरकल्यावर निखळ काळे गरळ कुपीत घालून हलवावे तसे त्याच्या मेंदूला कोणी हिंदकळत होते व त्यात तेच दुःखमुळाच्या प्रश्नाचे कालकूट हेलकावत होते. ह्या क्षणी तर त्याला राजपुत्र म्हणून कोणी ओळखलेही नसते.

अशातच सूर्यांच्या पहिल्या किरणाने एखाद्या लहानग्याने आपल्या आईच्या मांडीवर अगदी सहज व निशंःक लोळावे तसे पृथ्वीवर अंग पसरून दिले.

ते अगदी छोटे गाव होते व लोक नेहमीसारखे आपापल्या उद्योगाला लागले होते. सर्व प्रथम राजपुत्राला दिसला तो एक गुराखी. त्याचे खिल्लार काही फार मोठे नव्हते. दोन चार गाई अन् त्यांची तेवढीच बछडी हेच त्याचे पशुधन होते. पण जणू एखादा चक्रवर्ती राजा चालावा तसा तो त्यांच्यामागून जात होता. त्याने आपली काठी मानेवर आडवी धरून तिच्यावर आपले दोन्ही हात अडकविले होते, आपली बासरी मुंडाशात खोचून ठेवली होती व न्याहारीचे बोचके एका गाईच्या वाकड्या शिंगात अडकवून दिले होते. त्याला भोवती पसरलेल्या दुनियेची खबरबातच नव्हती व तो आपल्याच तालात रमत गमत जात होता. एखाद्या चुकार वासराने काही खोडी केली तर त्यास दटावण्यापुरताच तो तोंडातून काही अगम्य आवाज काढी एवढेच. राजपुत्राची नजर त्याच्यावर खिळून राहिली. गुराख्याचेही लक्ष राजपुत्राकडे गेले पण त्याने त्याची विचारपूस करणे लांबच, पण त्यास साधा नमस्कारही न करता आपली मिरवणूक पुढे रेटत नेली.

राजपुत्र नंतर त्या गावात शिरला. गाव नुकतेच झोपून उठले होते, व अजूनही सकाळचा आळस,सगळीकडे भरून राहिला होता. काही घरांत सडासंमार्जन झाले होते, काहीत सुरू होते. दोन खोपटी अगदी शेजारी शेजारी होती व त्यात फक्त काटेरी

फासांचे कुंपण होते. त्या कुंपणाच्या दोन्ही बाजूला उभ्या राहून दाने नवोढा एकमेकींची मस्करी करीत होत्या व आपल्या सासवा थोड्याच वेळात ह्या मस्करीचे उट्टे काढणारच आहेत ह्याचाही त्यांना धाक नव्हता. त्या दोघींचे केस विस्कटले होते, पदर ढळले होते व कुंकवाचे फरकाटे निघाले होते. त्या एकमेकींना काहीतरी म्हणत व मग दोघीही खदखदून हसत. कधीकधी त्या हसण्याला अंगणातल्या चिमण्याही साथ देत. हे असेच जगाच्या अंतापर्यंत चालले असते पण एवढ्यात त्यातील एका घरातून एका बाईचा नवरा बाहेर आला व त्या बरोबर लाजाळूची पानं नुसत्या फुंकरीन मिटावी तशा त्या गप्प झाल्या व चटकन् आपापल्या घरांत निघून गेल्या. तेव्हा एका घरातील म्हातारीला ह्याचे, आपली संधी हुकली म्हणून मोठेच वैषम्य वाटले.

हे सारे राजपुत्राने पाहिले व तो पुढे सरकला.

एका गल्लीत दोन लहान मुले खेळत होती. त्यातल्या एका मुलाच्या कंबरेस करगोटा होता व तो करगोटा तो आपल्या सोबत्यास मोठ्या कौतुकानं दाखवीत होता, पण क्षणार्धच. मोठ्या मित्रतवारीने तो आपला करगोटा दोस्तास दाखवी व पटकन् अंगातले कुडते त्यावर टाकून देई. राजपुत्रास हे सारेच नवीन होते कारण अशी दृश्ये त्याने राजवाड्यात पाहिलीच नव्हती. पण त्याला हसू आले ते याचे की करगोटेवालं पोरगं खाली पूर्ण दिगंबर होतं आणि त्याला खाली काही घालण्याची गरजही भासत नव्हती. नाहीतर मग करगोटा दिसला नसता.

थोडा पुढे जातो तो त्यास सुतार आपली कार्यशाळा उघडताना दिसला. तो थोडा वेळ तिथेच घुटमळला.

सुताराने आपली ठोकपीट सुरू करताच सुगीची खबर लागताच पाखरं यावी तशी भराभरा चार माणसं त्याच्याकडं आली व ज्याला जो सापडला त्या ओंडक्यावर तो स्थानापन्न झाला. त्यांच्या पावसापाण्याच्या गोष्टी सुरू झाल्या. त्यानंतर गावातल्या कुचाळ्या आणि हे चालू असतानाच कडुनिंबाच्या काडीने दात घासणेही सुरूच. जगातली सर्वांत निष्काळजी आणि म्हणूनच सुखी माणसे कुठली असलीच तर हीच असे राजपुत्राला वाटून गेले. त्यांना शेजारच्या राज्याच्या आक्रमणाची भीती वगैरे तर नव्हतीच पण नागरी सोयी सुविधा सारखे विषयही त्यांच्या खिसगणतीत नव्हते. दोन वेळा जेवणे आणि भरपूर काम करणे हेच त्यांचे कामही होते आणि समाधानही होते.

असा विचार करीतच राजपुत्र गावातून पुढे निघाला होता. रस्त्यावरच एक बऱ्यापैकी घर होते. त्यातील गृहिणीने अंगणात सडा घातला होता, तुळशीवृंदावनापुढे रांगोळी घातली होती व आता हातात हळदी-कुंकवाची कुयरी घेऊन ते रांगोळीवर वाहण्यास ती आतून येत होती. ती सद्यःस्नाता असावी कारण मानेजवळ तिचा पदर

चिकटला होता व एक सुटलेली बट ओलेपणाने झाडास बेल बिलगावी तशी तिच्या गालावर विसावली होती. राजपुत्राला ती अतिशय सुंदर दिसली व त्याने मनातल्या मनात त्या सौंदर्यास प्रणाम केला. त्या बाईची नजर राजपुत्राकडे जाताच तिने घाईघाईने डोक्यावरून पदर घेतला व ती पुन्हा घरात शिरली. राजपुत्र किंचित हिरमुसला व त्याच वेळी त्याला थोडे बरेही वाटले. हे सारेच त्याला नवीन होते. राजवाड्यातला सुंदर स्त्रियांच्या संगतीतला नर्मविनोद त्याच्या परिचयाचा होता पण स्त्रीसुलभ लज्जेचे हे अनपेक्षित दर्शन त्याला एकाच वेळी सुखावून अन् अस्वस्थ करून गेले.

तो आता गावाबाहेर आला होता.

समोरं नदी वहात होती. तिचा मंद आणि दबलेला खळखळाट त्याला उभ्या जागेवरून ऐकू येत होता. आता सूर्य बराच वर आला होता व सगळीकडे पिवळा नव्हे तर कनकांकित रंग त्याने उधळून दिला होता. नदीच्या काठीच एक अगदी छोटे देऊळ होते व त्यातील घंटीचा गोड आवाज मधूनच कानावर येई. देवळापासूनच थोड्या अंतरावर एक मोठे वडाचे झाड होते अन् त्याच्या खाली पार होता. राजपुत्र हळूहळू चालत त्याजवळ गेला व पारावर बसला.

पार बराच मोठा होता व त्यावर पुष्कळ माणसे बसली होती. ती सारी स्नानं करून आली असावी कारण बहुतेकाच्या कपाळावर भस्माचे किंवा गंधाचे पट्टे होते. त्यापैकी बहुतेक कुठलेतरी स्तोत्र पुटपुटत होती. स्नानाचे सोयरसुतक नसलेली दोन-चार शेंबडी मुलं मात्र त्या विशाल वटवृक्षाच्या भोवती फिरत शिवाशिवीचा खेळ खेळत होती. त्यांना त्या मोठ्या माणसांशी काही देणे घेणे नव्हते व राजपुत्राशीही नव्हते. खेळता खेळता त्यातील एका मुलाचा पाय राजपुत्रास लागलाही. पण त्या मुलाने खेळणे थांबविले नाही. खरे म्हणजे ती 'पोर' मोठ्यांना काय किंवा राजपुत्रास काय, मोजत नव्हती. मधूनच त्यातले एखादे पोर थांबे, आपल्या सोबत्यांना नदीवर धुणे धूत असलेली आपली आई दाखवे व नंतर पुन्हा खेळायला लागे. झाडावर पाखरांनी कलकलाट मांडला होता. खरे म्हणजे खूपशी पाखरं आधीच चाऱ्यासाठी निघून गेली होती. उरलेली जाण्याच्या तयारीत होती, लहानग्यांना शेवटचे भरवून. लहानगी त्यांच्या चोचीत चोच घालीत होती. त्यांना लवकर येण्याबद्दल बजावीत असावी. कारण अर्धा कलकलाट तर त्यांचाच होता. मग भरकन् एखादा पक्षी त्या घनदाट झाडातून बाहेर पडे आणि पहाता-पहाता एका अज्ञात स्थळाच्या रोखाने उडून जाई. त्याची पिलं खोपीच्या दाराशी येऊन चोचा फाकवून तो दिसेनासा होईस्तोवर त्याला न्याहाळीत रहात.

हे सारे राजपुत्र मनात साठवून घेत होता. त्या साठवणुकीने आपल्या शरीरातल्या साऱ्या ग्रंथी आता मोकळ्या होत आहेत. काट्यांनी ओढलेले फरकाडे आपोआप पुसून

अनुक्रमणिका

जात आहेत असे त्याला वाटत होते.

थोड्या वेळाने तो उठला व नदीकडे जाऊ लागला.

ती नदी काही फारशी मोठी नव्हती. पात्र अरुंदच होते पण खळखळाट भारी होता व एखादा डोह तर तिच्यात शोधूनही सापडला नसता. सारा सरळ मामला होता. मधेच ती एखाद्या बारक्या उंचवट्यावरून उडी घेई व पुढे चालायला लागे त्यावेळी साचलेल्या लहानशा डबक्याला डोह म्हणायचे तर म्हणा नाहीतर मी जाते कशी, असे म्हणून जणू ती आपला प्रवाह पुढे चालू ठेवीत होती. पण त्या छोट्या धबधब्यांनी तिला एक फेनधवलता दिली होती व एखाद्या किशोरीने आपल्या कुरळ्या पण आखूड केशकलापात खूपसे मोगऱ्याचे बळेसर घालावेत असे ते छोटे प्रपात दिसत होते. नदीच्या काठावर बाया धुणी धूत होत्या आणि काही मस्करी करीत होत्या व त्यांच्या गप्पांना अंतच नसावा असे राजपुत्रास वाटले. कारण त्यातील एका स्त्रीने डोक्यावर पितळेचा चकाकता हंडा घेतला, खांद्यावर धुण्याचे पिळे टाकले व ती परतायला निघाली तर इतर बायांचे तिला चिडविणे सुरूच होते. आणि मुख्य म्हणजे ते तिला हवेसे वाटत होते. नुकता आकारास येऊ घातलेला फुगीरपणा लपवीत शेवटी ती त्यांच्यातनं निघाली ती पाय ओढीतच.

राजपुत्राने हे सारे पाहिले. आपण यांच्या जास्त जवळ गेलो तर ह्या गप्प होतील, ह्यांच्या रंगाचा बेरंग होईल हे त्याने मागच्या अनुभवाने हेरले व तो नदीच्या काठाकाठाने पुढे चालू लागला.

दूरवर धूर निघत होता.

तो जवळ गेला तेव्हा त्याला चिता जळत असताना दिसली. तिथं विसेक माणसं होती. आणि त्यातील एक माणूस एका पाच-सहा वर्षांच्या मुलाच्या खांद्यावर भरलेला घट देऊन त्याला चितेस प्रदक्षिणा घालायला शिकवीत होता. अशा तीन प्रदक्षिणा झाल्यावर त्याने मुलास दक्षिण दिशेकडे तोंड करून उभे केले व एका दगडाने ते मडके जरासे फोडले. तेव्हा पाण्याची धार त्या मुलाच्या अंगावरून ओघळत दहनभूमीत जिरून जाऊ लागली.

राजपुत्र थक्क होऊन हे सारे पहात होता. त्याने पाहिलेली ती पहिली उत्तरक्रिया होती.

बऱ्याच वेळाने ती माणसे गटागटाने परत जायला निघाली. राजपुत्रही त्यांच्यातल्या एका गटाबरोबर चालू लागला.

"वाईट झालं. अर्ध्या ताटावरून उठवण्यासारखं झालं हे. लग्न होऊन आठेक वर्ष झाली असतील नाही ?"

"हो ना. लग्नाच्या वेळचा काय तो थाट. अगदी काल झाल्यासारखे वाटते."

"बायकोही अगदी सुशील नि सुंदर मिळाली होती हो. कधी कुणाकडे डोळा उचलून पाह्यल्याचं आठवत नाही."

"चालायचंच."

"अहो पण हा काय न्याय झाला ? आम्ही म्हणतो आम्हाला ने तर नेत नाही आणि ज्यांच्या खांद्यावरून आम्ही जायचे त्यांनाच आम्हाला खांदा द्यावा लागतो. अहो, तो नाही मेला. आमचा खांदेकरी गेला. आता येणं आहे तर जाणं लागलंच. फक्त उशिरा पाशिराचाच प्रश्न आहे. ते आपल्या हाती नाही. पण म्हाताऱ्याला नातू तर आहे. शेवटचं पाणी पाजायला. हां, आता त्या पोरीचं वाईट वाटतं. पण शेवटी काय, ते सुख तिळभरच आपल्या नशिबी होतं असं मानायचं. पोरगा मोठा होईल, आपले पांग फेडील ह्या आशेवर आता ती जगेल, जगणं भागच आहे. ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत त्याबद्दल काय करणार ? आणि कोणावाचून कोणाचे काही अडत नाही. सोबत असो नसो, चालत रहावेच लागते."

हे बोलून त्यांच्यातील एक माणूस गप्प झाला व मग समोर जाऊन त्याने त्या मुलाचा हात हाती धरून आजोबांबरोबरच त्यालाही चालविले.

त्याच्या बोलण्याने राजपुत्र पुन्हा एकदा हादरला होता. कोणाचे काही अडत नाही ? म्हणजे मग आपण राज्यत्याग केल्याने प्रजेचेही काही अडणार नाही ? राणीचे, युवराजाचे काही अडणार नाही ? चालत जाणे भाग आहे तर मग त्यांनाही चालत जावेच लागेल कारण जाणे भागच आहे... पाय थकेपर्यंत नव्हे तर कपाळ थकेपर्यंत ?

त्याला दरदरून घाम फुटला. होय, प्रजाजन काही दिवस वाट पाहतील, मग आपल्या भावालाच राजा बनवतील. राजा तर पाहिजेच. पत्नी शोक करेल. मुलासाठी का होईना जगत राहील आणि मुलगा मोठा झाल्यावर आपले पांग फेडील असे म्हणत राहील. आपण हयात आहोत कुठे ? म्हणजे, भस्मीभूत झालेला आत्ता पाहिलेला माणूस अन् बेपत्ता झालेले आपण यात संख्यात्मक जाऊ दे पण गुणात्मक किंवा परिणामात्मक तरी फरक आहे कुठे ? आणि नसेल तर जगणे आणि मरणे ह्यात तरी फरक कुठे आहे ? माणूस जगतो म्हणजे शेवटी काय करतो ? कपाळमोक्ष होईपर्यंत आंधळेपणी वाटचाल करीत राहतो ?

ह्या प्रश्नांनी भणाणून गेलेला मेंदू घेऊन त्या माणसांबरोबर जात राहणे त्याला आता अशक्य होते. काहीही झाले तरी आपल्या पुढे आता काय वाढून ठेवले आहे याची पक्की कल्पना त्याला होती. राजपुत्राचे तसे नव्हते. आपल्या अध्ययन कक्षाचा दरवाजाच त्याला सापडत नव्हता.

अनुक्रमणिका

मग तो हळूच त्यांच्यातून सटकला व वाट फुटेल तिकडे चालत राहिला. त्याचे जाणेही त्या आत्ममग्न माणसांच्या ध्यानात आले नाही.

भटकता भटकता तो एका गुहेच्या तोंडाशी आला आणि आतील दृश्य पाहून थक्कच झाला.

आत एक संन्यासी खिळ्यांच्या आसनावर पद्मासन घालून बसला होता. गुहेतला वारा अगदी स्तब्ध होता आणि आजूबाजूला जिवंतपणाच्या काही खुणाही दिसत नव्हत्या. न कोपऱ्यात एखादा कमंडलु, न मृगाजिन, न धुनी, न काही फळांची टरफले, त्या संन्यासाचा चेहरा मात्र टवटवीत होता व निबिड अरण्यात एखादेच मोठे फूल फुलून डोलत रहावे असा दिसत होता. राजपुत्र एक टक त्याच्याकडे पहातच राहिला.

थोड्या वेळाने गुहेत स्वर उमटला, "सापडले उत्तर ?"

आपण काही शोधत होतो याचा विसर राजपुत्राला पडला नव्हता. तो शोध कसला होता हे पानाड्यास भूगर्भातील जल दिसावे तसे या संन्याशास कसे कळले याचे आश्चर्यही त्याला वाटले. पण ते अणकुचीदार खिळे जणू त्याच्या डोळ्यात घुसून बसले होते. म्हणून संन्याशाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत त्याने विचारले, "स्वामी, आपणास हे खिळे बोचत नाहीत का ?"

"कुठले खिळे ?"

"ज्या आसनावर आपण बसला आहात ते खिळे."

"कुठायत ते ?"

राजपुत्रास त्या प्रश्नांचे अत्यंत आश्चर्य वाटले अन् त्याने खिळ्यांकडे अंगुलीनिर्देश केला. अन् तो चकितच झाला.

कारण आता तिथं खिळे नव्हते तर अत्यंत नाजूक अशी फुलं होती अन् त्या गालिच्यावर त्याच शांत मुद्रेने तो संन्यासी बसला होता.

"स्वामी, स्वामी..."

"काय ते ?"

"ही फुलं इथं कशी आली ? मघा तर...."

"कुठली फुलं ?"

"ज्यावर आपण बसला आहात ती."

"नीट बघ."

राजपुत्राने पाहिले तेव्हा ती फुलंही तिथं नव्हती. फक्त तो योगी तेवढा अधांतरी तरंगत होता. तेच पद्मासन, ती शांतिमुद्रा.

आता मात्र राजपुत्र दिङ् मूढ झाला. त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. चाचरत तो

म्हणाला, "स्वामी, ते खिळे ती फुलं गेली कुठं ?"

"कुठली फुलं ?"

"ज्यावर आपण बसला होता ती."

"कोण मी ?"

या प्रश्नाने राजपुत्र गोंधळला तो. तो प्रश्न गूढ होता म्हणून नव्हे तर प्रश्न विचारणारा आवाज कुठून आला ते न कळल्यामुळे. कारण आता गुहेत त्याच्या स्वतःशिवाय कुणीच नव्हते.

राजपुत्राने डोळे घट्ट मिटून दोन्ही हातांना आपले डोके धरून ठेवले व तो स्तब्ध बसून राहिला. थोडा वेळ असाच गेला.

राजपुत्राने डोळे उघडले तेव्हा त्याला तो योगी खिळ्यांच्या आसनावर पूर्वी होता तसाच बसलेला दिसला.

धीर करून आवाज रेटीत राजपुत्र बोलला, "स्वामी आधी आपण कंटकशय्येवर होता. नंतर फुलांच्या शय्येवर अन् नंतर तर अधांतरीच राहिलात हे कसे झाले ?"

"जाऊ दे ते. इतर मोठाल्या आव्हानांच्या समोर तो नुसता एक पोरखेळ आहे झालं. त्याबद्दल जितकं कमी बोलावं तेवढं चांगलं. पण मला एक सांग. तू इथं कशासाठी आला होतास ?"

"स्वामी, मानवी जीवन हे दुःखमयच नव्हे तर दुःखपर्यवसायीही आहे याची मला खात्री पटली आहे व त्या दुःखाचे मूळ उपटून कसे टाकता येईल या प्रश्नाचे उत्तर शोधीत मी येथवर आलो आहे."

"आता मघाचाच प्रश्न. मिळाले उत्तर ?"

"नाही स्वामी."

"बरोबर आहे जो प्रश्नच नाही त्याचे उत्तर कसे सापडणार ?"

"माझ्या ध्यानात नाही आले स्वामी."

"नाहीच यायचे, आता असे बघ ज्याला तू दुःख, दुःख म्हणतोस ते काय आहे हे तू मला सांगशील काय ?"

"व्याधी, जरा आणि मरण."

"एवढेच ?"

"मला तरी असे वाटते स्वामी."

"पण तसे नाही. या व्यतिरिक्त अनेक गोष्टी आहेत ज्यांना माणसे दुःख म्हणतात. एखाद्या वस्तूची किंवा व्यक्तीची अप्राप्यता, वंध्यत्व, दारिद्र्य, मनोभंग, एखाद्याचे कुत्सित हास्य किंवा टाकून बोलणे हेही दुःखास कारणीभूत होते. कधीकधी तर आपल्या पुढचे

ताटच कुणी ओढून नेतात व त्यातील पदार्थ आपल्या पुढं तरंगायला लागतात, जे नुसते पाहाणेच आपल्या नशिबी असते. अनेकदा माणसे गुलाम खरेदी करायला म्हणून जातात अन् त्यांच्या डोळ्यातील दुःख पाहून स्वतःच त्यांचे गुलाम बनून बसतात ! पुढे मग कधीतरी त्यातीलच एखादा माथेफिरू गुलामगिरीची प्रथाच नष्ट करून टाकतो. हे सारे दुःखामुळे होते. आणि हो, कातरवेळी क्षणोक्षणी गडद होत जाणारा अंधार तर दुःखाचा अस्फुट उद्गारच असतो असेही मी ऐकले आहे."

"हे जर खरे आहे तर मग यातून सुटका नाही का ?"

"कसली सुटका. सुटायला तू अडकला आहेसंच कुठं ? अरे, जी दुःखं तू म्हणतोस त्यापैकी किती भोगली आहेस तू ?"

"पण स्वामी ती दुःख भोगावी लागणारच नाहीत असे नाही."

"खरे आहे. पण ती तुला दुःख वाटली तरच. तू जर नीट डोळे उघडून पाहिलेस तर तुला दिसेल की ह्यांना कुणी दुःख मानून घेत नाहीत. आता सांगतो. तू नीट बघितले असते तर तुला दिसले असते की जो महारोगी तू बघितला होतास तो भिंतीकडे तोंड करून भाकरीचा तुकडा चघळीत बसला होता. जो जराजर्जर म्हातारा तू बघितला होतास त्याला नातवाचे तोंड पहायची आंस होती. ज्याचे प्रेत तू पाहिले तो त्याच्या व्याख्येप्रमाणे पुरुषार्थ गाजवून समाधानाने सुखाचे मरण मेला होता."

"सुखाचे मरण ?"

"का ? आश्चर्य वाटते तुला हा वदतोव्याघात ऐकून ? अरे, ज्या गोष्टीचे अस्तित्व मुळी संशयास्पद आहे त्यांचा शोध ह्या पाच चाकांच्या खटाऱ्याने तू घेऊ पाहतोस. खरे म्हणजे ह्याचे आश्चर्य वाटायला हवे तुला. एक लक्षात घे, सुख आणि दुःख सर्व तुझ्या मनात आहे ते पाहिजे तसे तुला भावेल. शेवटी, सारा खेळ नजरेचा आहे. कुणी येत नाही व कुणी जातही नाही."

"पण मग अनेकदा माणसं दुःखी दिसतात ती कशी ?"

"ते सारे स्वार्थमूलक होते. पण मला तशा माणसांचा तिरस्कार नाही वाटत. कारण माझी माया सुटली तरी दया सुटली नाही व ती मला सोडायचीही नाही. कारण मी तुमच्यातलाच आहे. अरे, एक पाय तुटलेल्या बेडकीला तू दगड मारून पहा. उरलेल्या तीन पायावर टणटण उड्या मारीत ती पसार होईल. तिला एका पायच्या मरणाचे दुःख नाही, तीन पायावर जगण्याची हौस आहे. जीवनाच्या प्रवाहासमोर कोण टिकला आहे तर दुःख आणि मृत्यू टिकेल ? ती टिकणारी बाब असती तर मानवजात केव्हाच लुप्त झाली असती. कारण मरण हेच तुमचे मोठ्यातले मोठे दुःख असते. खरे ना ?"

"होय स्वामी."

अनुक्रमणिका

"खऱ्या दुःखाबद्दल बोलणे न बोलणे सारखेच असते. ते जाऊ दे." "म्हणजे दुःख असे काही काहीच असे म्हणता का तुम्ही ?"

"खरे म्हणजे तसेच ते म्हणायला पाहिजे. पण तुला कळणार नाही म्हणून 'कमी सुख' असे मी त्याला म्हणतो. ठीक आहे ?"

यावर राजपुत्र काहीच बोलला नाही.

योगी शांतपणे पुढे म्हणाला, "हे बघ, वर काही नाही व खालीही काही नाही. ज्याच्यावरती काही आहे असे आपण समजतो तेच जर मुळी आभासात्मक आहे तर त्याच्यावरती काय राहणार ? सारे आपल्या मनातच असते. अस्तित्व आहे कारण ते आपल्याला भासमान होते म्हणून. ते नाही कारण आपण साक्षी नसतो म्हणून. यास्तव ह्या साऱ्या गोष्टींचा फारसा विचार शहाण्याने करू नये. शिवाय त्याच गोष्टींचा विचार करणारे अनेक लोक आहेतच. त्यांच्या सिद्धांतांनी घटनाक्रमात फरक पडत नाही. जगातली सारी दर्शने एकत्र केली तरी मुंगीच्या दंशाने होणाऱ्या वेदनेचाही ती परिहार करू शकत नाहीत किंवा नुसत्या नजरेने होणाऱ्या जखमेचेही निवारण ती करू शकत नाही. हे सारे भोगूनच संपवावे लागते. फक्त ते आनंदाने भोगणे एवढेच आपल्या हाती असते. जन्म मृत्यू टळत नाही आणि सूक्ष्म विचार केल्यास सार्थ अस्तित्वाच्या दृष्टीने जीवन आनंदात घालविणे एवढेच आपल्या हाती ठरते. कारण मरणाचा बिंदू आपल्याला अलिकडे ओढता येत नाही की पलिकडे ढकलता येत नाही. आनंदाने जगण्याच्या कार्यक्रमात पुर्नजन्मासारखी किंवा स्वर्गनरकासारखी किचाटं किंवा विश्वाचा उगम किंवा त्याचा कर्ता या गोष्टीही बाधा ठरत नाहीत. समज, उद्या एखाद्याने हा-हा ईश्वर आहे व ह्याने हे-हे विश्व निर्माण केले आहे असे साक्षात तुमच्या चर्मचक्षूंना जरी दाखवून दिले तरी त्याने काय फरक पडणार ? चक्षूंना बरेच कांही इतरही पहायचे असते. त्यामुळे आपल्या सदसद्विवेक बुद्धीला गुरू करून आनंदाने जगून, कोंड्याचा मांडा करून जीवनाची एक यात्रा बनविणे एवढेच आपल्या हाती ठरते. हे बघ, एखाद्या लहान मुलाला जरी तू हसवलेत ना तरी तुझ्या मनातल्या सृष्टिकर्त्यांना फार जवळ जाशील तू. कारण तोही तुझ्यातच आहे, दुसरीकडे नाही."

योग्याचे बोलणे संपताच राजपुत्रास ती गुहा उंची उदबत्त्यांच्या वासाने कोंदून गेल्यासारखी वाटली व तो स्वर्गीय सुगंध घेण्यसाठी सारी इंद्रिये एकवटावी म्हणून त्याने डोळे मिटून घेतले.

त्याने डोळे उघडले, तेव्हा गुहा सताड मोकळी पडली होती. तो योगी नव्हता, त्यांची कंटकशय्या किंवा पुष्पशेज नव्हती. काही नाही, काही नाही.

राजपुत्र हळूहळू चालत नदी काठाने निघाला. पायात नवे बळ आल्याचा प्रत्यय

अनुक्रमणिका

त्यास येत होता. नदीकाठावरच पण एका झाडाच्या खाली एक बाई आपले तान्हुले मांडीवर घेऊन बसली होती. तिने त्याच्या डोक्यावर आपला पदर टाकला होता व ती त्यास स्तनपान करवीत होती. पण तो पोरगा मात्र सरळ दिसत नव्हता ! तो वारंवार पदर बाजूला करी व दुधाचा फवारा उडवी. यावर ती बाई त्याच्या डोक्यावर हळुवार चापट मारी आणि त्याला छातीशी घट्ट धरी. शेवटी तिने आपल्या स्तनाची बोंडी दोन बोटांच्या चिमटीत पकडली व त्या तान्हुल्याच्या तोंडात दुधाची धार धरली. एवढ्यात तिचे लक्ष राजपुत्राकडे गेले व तिने घाई-घाईने पोरावर पदर पांघरून त्याला आपल्या छातीशी धरले. स्त्रीसुलभ लज्जेचा लालिमा तिच्या डोक्यावरून घेतलेल्या पदरातूनही राजपुत्राला स्पष्ट दिसला.

पण राजपुत्राच्या मनःपटलावर एकही चुणी पडली नाही.

त्याच्या डोळ्यापुढे आता त्याची सुस्वरूप पत्नी, अंतराची पर्वा न करता तिच्या कडेवरून त्याच्याकडे झेपावणारा राजकुमार व त्यामुळे पत्नीच्या डोळ्यांत भावनांचे झालेले कौतुक हे सारे आले. त्याने स्वतःच आपले दोन्ही खांदे थोपटले व तो त्वरेने परतीच्या मार्गास लागला.

- रमेश दा. गाडे

⌘⌘⌘

अनुक्रमणिका

एकोणिसाव्या शतकातील वाचक-समीक्षा

भा. श्री. परांजपे

प्राचीन मराठीला जसा श्रोता होता तसा वाचकही होता काय? असा प्रश्न कोणी विचारल्यास त्याला होकारार्थीच उत्तर द्यावे लागेल. तेराव्या शतकातील 'जनाबाई वाची ज्ञानेश्वरी प्रेमें' अशा वाचकाचा आपल्या अभंगात उल्लेख करते तर उत्तरपेशवाईत श्रीमंत गोपिकाबाई पेशवे आपला नातू सवाई माधवराव यास विराटपर्व नेहमी वाचीत जावे, असा उपदेश पत्रातून करते. या शतकांच्या मधल्या काळात पैठणच्या संत एकनाथांचा एक शिष्य आपल्या गुरूचा भागवतावरील टीकाग्रंथ काशीक्षेत्री गंगेच्या घाटावर वाचताना दिसतो तर पुढल्या शतकात समर्थशिष्या वेणाबाई तोच ग्रंथ तुळशीवृंदावनाजवळ बसून वाचताना आढळते. खुद्द वेणाबाईंचे गुरु समर्थ रामदास आपल्या दासबोधात 'आवडीसारखे वाचिती सर्वकाळ' अशी वाचनासंबंधी नोंद करीत आहेत.

पण एकोणिसाव्या शतकातील वाचक या पाच-सहा शतकांतील वाचकाहून अगदीं भिन्न आहे. 'मराठी समीक्षेचा आरंभकाळ' मानल्या जाणाऱ्या या शतकात त्यानं ही स्वतः

अनुक्रमणिका

या शतकाला साजेशी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. समीक्षेच्या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविले आहे आणि म्हणूनच या काळातील समीक्षा व्यवहाराचा विचार करताना त्याची दखल घेणे आवश्यक ठरते.

एकोणिसावे शतक हे मराठी समीक्षेचे आरंभस्थान असले तरी या समीक्षेचा उदय बऱ्याच उशीरा या शतकाच्या उत्तरार्धात १८६५ च्या सुमारास झाला. दादोबा पांडुरंगाची 'यशोदापांडुरंगी' ही केकावलीवरील १८६५ त प्रसिद्ध झालेली टीका हे या समीक्षेचे आरंभीचे टोक तर १८९८ मधील न्या. रानडे यांनी केलेले मराठी वाङ्मयाचे समालोचन त्याच्या शेवटाचे (या शतकापुरते) टोक ठरते. इंग्रजांच्या राजवटीत मुद्रणसंस्कार उपलब्ध झाले. पण त्या मानाने १८४८ पर्यंत मराठीत अवघे तीस (३०) ग्रंथ निर्माण झाले होते आणि त्यातील एकही ग्रंथ समीक्षायोग्य नव्हता. त्यामुळे या राजवटीतील नव्या विचारप्रवाहाचे आकलन व्हायला हवे होते ते झालेले दिसत नाही. वाचकांच्या विचार पद्धतीला चालना देण्यास ही ग्रंथसंपत्ती दुबळी ठरली. याच्या उलट या शतकाच्या पूर्वार्धातच सन १८३२ ते १८४५ पर्यंतच्या काळात जी नियतकालिके एका मागोमाग बाहेर पडली. त्यांनी आपल्या भोवतालच्या परिस्थितीकडे जागृतपणे पाहणारी वाचकांची पिढीच उत्पन्न केली. बाळशास्त्री जांभेकर यांचे १८३२ त निघालेले 'दर्पण' आणि सन् १८४० त प्रकाशित होऊ लागलेले भाऊ महाजनांचे 'प्रभाकर' यातील वाचकांचा पत्रव्यवहार पाहावा. या नियतकालिकात 'वाचकांची पत्रे व उत्तरे' हे एक सदर असे. व त्याने एखाद्या वाचकाने काही माहिती विचारली तर ती तत्परतेने पुरविली जाई. 'दर्पण' सुरू झाल्यानंतरच्या दुसऱ्याच अंकात १६ जानेवारीच्या आपल्या पत्रात एक पुणेकर वाचक मुंबईतील वाफयंत्राच्या काही गोष्टी समजल्या तर हर्ष होईल असे लिहितो. संपादक त्याचे हे पत्र तर छापतातच पण त्याबरोबरच आपली इच्छा लवकरच पूर्ण करू असे आश्वासनही देतात. भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' पत्रात ग्रेटब्रिटनची राजनीती व फ्रेंचांचे बंडाचा वृत्तांत ही दोन्ही फार उपयोगी प्रकरणे आहेत. असा एका वाचकाने २४ मे १८४२ च्या अंकात दिलेला अभिप्राय हा पहिल्या पत्राच्या मानाने जास्त महत्त्वाचा आहे. -'समीक्षाभिमुख' आहे. माहितीपूर्ण लेख या काळातल्या वाचकाला फार आवडतात असे या प्रकारावरून कळते. पण वाचकांच्या वाङ्मयीन आवडीनिवडी संबंधीच्या प्रतिक्रिया आपणास प्रथम कळतात त्या ज्ञानोदय या ख्रिस्ती वर्तमानपत्रातून.

'ज्ञानोदय' हे अहमदनगर येथून १८४२ साली निघालेले नियतकालिक हे ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थ अमेरिकन मिशनने काढले होते. साहजिकच हिंदु लोकांच्या चालीरीतीवर टीका करणे हा त्याचा प्रमुख उद्देश असे. हिंदु समाजातील ग्रंथावरील त्याचे अभिप्राय याच धोरणाचे निर्देशक असत. त्यामुळे कळत न कळत का होईना या

मनःप्रकटनाला वाङ्मय टीकेचे स्वरूप आले आहे. या दृष्टीने मराठी लावणी वाङ्मयावरील एका वाचकाचे (१५ ऑगस्ट १८५०) हे पत्र पाहावे. पत्रलेखक लिहितो, "विद्याहीन द्वाड पोरे शृंगाराची लावणी वगैरे हे गाणी म्हणतात. लावणी काव्य प्रशस्त नाही तर ते दुष्ट काव्य आहे. त्यात गुंड, दुष्ट व पापाचरणी लोकांची हकीगत असते. तमासगीरांचे पांडित्य तर शिमग्यापेक्षा अधिक अर्वाच्य असते. काही संभावित बायका पोरांसह तमाशाला जातात. मग मुले बिघडल्यावाचून कशी राहतील ? पत्रलेखकाचा कटाक्ष काव्याच्या स्वरूपापेक्षा त्याच्या परिणामावर आहे."

लावणी वाङ्मयाप्रमाणेच 'तमासगीरांची नाटके' हा ज्ञानोदयातील बऱ्याच पत्रलेखकांच्या टीकेचा विषय झाला आहे. या तमासगीरांबद्दल १८५० ते १८६२ ह्या काळात बरीच पत्रे पाहायला मिळतात. 'तमासगीर लोक' (ऑगस्ट १८५०) 'नाटकापासून नासाडी' (जानेवारी १८५७) 'नाच तमाशे करण्याविषयी' (सप्टेंबर १८५९) 'पोऱ्यांचे तमाशे' (मे १८६२) या साऱ्या पत्रातून तमाशामुळे पोरं कशी बिघडतात याचे वर्णन आले आहे. या साऱ्या पत्रात ही बहकलेली पोरं ताळ्यावर कशी येतील याची विवंचना आहे. नमुना म्हणून हे एक पत्र पाहा. पत्रलेखक स्वतःला यथार्थवादी म्हणतो. तो लिहितो.

"सैतानाने अनेक व्यसने निर्माण केली. त्याप्रमाणे आता मोहमय नाटकांचे बंड माजले आहे. नाटकवाले असभ्य व लोभाविष्ट असून मुलांना नाचणं, उद्धटपणा, स्त्रियांचे हावभाव यांचे शिक्षण देतात. नाटकवाले सुधारणेच्या नावाखाली लुटारूपणा करीत आहेत. तरी नाटकवाल्यांचे प्राबल्य कमी करावे ?"

पत्र लिहिणारा ख्रिस्ती धर्माचा असला तरी त्याच्या अंतःकरणातील तळमळ व्यापक व समाजकल्याणाची आहे. या संबंधात १८८६ साली ज्ञानदीप मासिकात अमंगल लेखांचा प्रसार व त्याच्या 'प्रतिबंधार्थ यत्नांची आवश्यकता' या मथळ्याचा एक लेख आला आहे. याच संदर्भात १८९३-९४ तील श्री. कृ. कोल्हटकरांनी 'विक्रमशशिकला" या नाटकावर लिहिलेली विविध ज्ञान विस्तारातील टीका आठवावी. यावरून असे दिसते की अनीतिवर्धक असभ्य व अश्लील वाङ्मयाला अधूनमधून भरती येते व तिचा निषेध करणे हे समाजातील विचारवंताचे कर्तव्य होऊन बसते. संस्कृत साहित्यशास्त्रात 'अमंगलाचा निरास' हे मम्मटाने एक काव्यप्रयोजन सांगितले आहे. गंमत अशी की अशा दुष्ट वाङ्मयाचा निषेध करताना पत्रलेखक 'जया मानिती सज्जन' या समर्थप्रणीत वचनाचा हवाला देतो. या सर्व गोष्टीवरून लक्षात येते की अश्लीलतेचा निषेध हा समीक्षा व्यवहारातील एक वाहता प्रवाह आहे आणि मराठी वाचकांच्या पत्रव्यवहारातून या प्रवाहाला समांतर अशी 'समीक्षा' दिसते. वा.ल.कुलकर्णी यांनी सामान्य वाचकाचे

लक्षण सांगताना वाचक श्रेयाऐवजी प्रेयाकडे धाव घेतो असे म्हटले आहे. येथे मात्र हा वाचक प्रेयाऐवजी श्रेयाचीच तरफदारी करताना दिसतो.

१८६१ साली मुंबई इलाख्याच्या सरकारी विद्याखात्यामार्फत एक अशी गोष्ट घडली की जी शहरापासून दूर असलेल्या आणि खेड्यापाड्यांत पसरलेल्या शाळांतील शिक्षकांना विकासाची एक संधीच ठरली. ती म्हणजे पुणे पाठशाळेतील शास्त्री पंडितांच्या व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने 'शालापत्रक' नावाने एक मासिकपत्रिका निघू लागली. १८२१ सालापासून विद्येचा प्रसार व्हावा या उद्देशाने निघालेल्या विद्याखात्याचा व्याप आता वाढला होता आणि जिल्ह्यात व तालुक्यात ज्या शाळा होत्या त्यांचे नियमन करणें, सरकारी खात्याचे हुकूम त्यांच्यापर्यंत पोहचविणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे दिवसेंदिवस कठिण होत होते. त्यासाठीच सरकारी विद्याखात्याने ही मासिकपत्रिका काढण्याचे ठरविले. सरकारी नियमांची वेळोवेळी नीट अंमलबजावणी कशी होते हे पाहणे एवढेच तिचे कार्य होते. परंतु पाठशाळेच्या वतीने जे संपादक नेमले होते त्यांनी मोठ्या कौशल्याने सरकारी धोरणाबरोबरच शिक्षकांनाही उपयुक्त व्हावे अशी भूमिका घेतली होती. जानेवारीमध्ये निघालेल्या पहिल्याच अंकात संपादकीय निवेदन करताना त्यांनी असे जाहीर केले की शाळांचे दृष्टीने जे जे उपयुक्त वाटेल ते ते ह्यात छापले जाईल. मराठी शाळांचे शिक्षक आहेत तितके या पत्रात छापावयाकरता उपयुक्त मजकूर पाठवतील अशी आशा आहे आणि जो त्यांचेकडून मजकूर येईल त्याचा अत्यादराने स्वीकार होईल.

खुद्द संपादकाकडून असे मन प्रकटनाचे आश्वासन मिळाल्यामुळं साऱ्या शाळातील शिक्षक वर्ग सुखावला असला तर नवल नाही. त्याने हे आमंत्रण अतिशय तत्परतेने झेललेले दिसते. दुसऱ्या वर्षाच्या पहिल्याच अंकात के.भ. (केशवराव भवाळकर) या सहीने छापलेले हे पत्र पाहा. ' मी आपला एक पत्र वाचणारा आहे' अशी स्वतःची ओळख करून देत हा पत्रलेखक लिहितो.

"आजपर्यंत या बिचाऱ्या मराठी शाळांवरील शिक्षकास ...आपले ज्ञान प्रकट करण्यास किंवा ज्ञानगम्य विषयावर वादविवाद करून निर्णयार्थ ठरविण्यास साधन नव्हते. आता ही तजवीज झाली. एणेकरून आम्ही सर्व आनंदात निमग्न होऊन गेलो आहोत." यानंतर शाळापत्रक आपणास का आवडते हे सांगताना तो पुढे लिहितो, "आपल्या पत्रात विषयाचे उपपादन करण्याची रीत फार सुलभ व सुरस आहे. एखादे विषयावर वादविवाद उभयपक्षांचे चालतात ते वाचण्याची मला फार हौस वाटते!" अशा वादविवादांना लेखक ज्ञानयुद्ध म्हणून संबोधतो आणि या प्रचंड कृत्यात माझा समावेश करून घेण्याची कृपा करावी अशी विनंती करतो.

अनुक्रमणिका

१८६५ साली मासिकाच्या संपादकात बदल होऊन कृष्ण शास्त्री चिपळूणकर यांच्या हाती संपादनाची सूत्रे आली. 'सुरवंटाचे फुलपाखरू व्हावे तशी मासिकाची कळाच बदलली आणि त्याला वाङ्मयीन रूप मिळाले. १८६५ ते १८७५ या दहा वर्षाच्या काळात प्रथम कृष्णशास्त्री आणि नंतर त्यांचे पुत्र विष्णुशास्त्री यांच्या कारकीर्दीत पुस्तकपरीक्षणाचे अंग नव्याने वाढले. 'थोरले माधवराव पेशवे' व 'जयपाल' ही नाटके, 'रघुवंश' व 'कुमारसंभव' यासारखी भाषांतरं, 'घाशीराम कोतवाल' सारखी कादंबरी आणि 'दैवसेनी' व 'पार्वती प्रकोप' या काव्यावरील परीक्षणे यातून हा पुस्तक परीक्षणाचा प्रकार मराठीत संपविण्याचा प्रयत्न शाळापत्रकांच्या संपादकानी आपल्या वाचकवर्गाच्या सहकार्याने केला. या परीक्षणाच्या प्रकारातून वाचकांची शोधक, चिकित्सक, आस्वादक व वादप्रिय अशी विविध स्वरूपं आपणाला दिसतात. 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकातील छत्रपती रामराजाचे भाषण खेडवळ का अशी शंका एका वाचकाने विचारली आहे तर पुणे शहराचे वर्णन या ना.वि.जोशी यांच्या पुस्तकातील माहिती अपूर्ण आहे असे एक वाचक सांगताना दिसतो.

तसेच पाहिले तर न्यून परिहार हा दोष बहुश्रुत वाचकाच्याच लक्षात येणारी गोष्ट आहे. पण पुराणकाळात व्यासासारख्या ग्रंथकारानेही आपल्या हितचिंतकाजवळ 'न्यूनमत्रं विचक्ष्व' अशी मागणी केली आहे. ज्ञानेश्वर रामदासांनीही 'न्यून तें पुरतें करून घ्यावें' वा 'न्यूनपूर्ण क्षमा केलें पाहिजे' यासारखी विनंती केल्याचे प्रसिद्धच आहे. अर्थात ही मागणी बहुश्रुत रसिकाकडूनच करणे शक्य असते. बहुश्रुत व शोधक अशा दोन्ही दृष्टींनी शाळा पत्रकातील या वाचकांची टीका वाचकसमीक्षेचे एक महत्वाचे देणे ठरते असे या संदर्भात म्हणता येईल काय ?

१८७५ त शाळापत्रक बंद पडले पण तेवढ्याने विष्णुशास्त्री चिपळूणकरांची लेखणी बंद पडली नाही किंबहुना तिचा भर पुढेही चालू राहिला हे त्यातील १८७४ त सुरू केलेल्या निबंधमालेत दिसते. हे मासिक साधारणपणे १८८१ पर्यंत चालले. शाळापत्रकातील वाङ्मयीन अंग या मासिकात विशेष झळकताना दिसते. बहुधा म्हणूनच हा आठ वर्षांचा काळ मराठी वाचकवर्गालाही उत्साहजनक ठरला. मागील पिढीतील न्यूनदिग्दर्शकांना जसा येथे प्रवेश आहे तसाच तो खंडनमंडनार्थ आसुसलेल्या वादप्रियांनाही आहे. मालेच्या ८ वर्षांच्या कारकीर्दीत याच नव्हे तर कितीतरी विविध प्रकृतीच्या व आवडीनिवडीच्या वाचकांना मुक्तद्वार मिळाले आहे. 'वाचकांची पत्रे' हे मालेचे एक आकर्षक सदर आहे. येथे 'जिज्ञासा आणि भक्त' 'विद्यार्थी आणि वाचक' 'वेताळ व षट्पद' या साऱ्यांच्याच पत्रांना स्थान मिळाले आहे.

यामुळेच वाचकसमीक्षा जिला म्हणता येईल ती बहुधा सर्वांगाने नसली तरी

बऱ्याच अंगाने येथे पुष्ट झाली आणि याबद्दल खुद्द वाचकांनी, वादप्रिय वाचकांनी मालाकारांचे आभार मानले आहेत. 'मोरोपंतांची कविता' या लेखातील काही विधानावर तुटून पडलेल्या व मालेच्या तीन अंकातली बरीचशी पाने व्यापून बसलेल्या वामनराव ओकांनी आपल्या पत्रांना जागा दिल्याबद्दल मालाकारांचे आभार मानले आहेत. (निबं.अं.६५, फेब्रु, १८८०)

'मोरोपंताची कविता' या विषयावर निबंधमालेच्या ४५ व्या अंकापासून जे चिपळूणकरांचे लेखन झाले; त्याने मराठी कवितेविषयी आस्था वाटणाऱ्या वाचकांचे लक्ष त्या विषयाकडे वळले आणि तेव्हापासून त्या विषयाचा व्यासंग आणि अभिरुची असणाऱ्यांची पत्रे त्यांना येऊ लागली. अशा पत्रलेखकांत ज.वा.मोडक, वा.दा.ओक, के.बा.कानेटकर, मो.गं.लोंढे, वेताळ यांची नावे घ्यावी लागतील. मोरोपंताची कविता स्वतंत्र की भाषांतरित, मोरोपंत पुराणिक होते की पंडित, मोरोपंताची प्रशंसा गतानुगतिक न्यायाने चालत आली काय? मोरोपंतांच्या कवितेवर आक्षेप कोणते व ते कितपत योग्य यासारख्या प्रश्नांची चर्चा निबंधमालेत चालू झाली. त्या चर्चेने निबंधमालेची सुमारे १९० पाने व्यापली आहेत. या साऱ्या पत्रांचा विचार केला तर या पत्रे लिहिणाऱ्यांचा व्यासंग बराच सूक्ष्म होता हे लक्षात येते.

या पत्रलेखनाचा दुसरा विशेष म्हणजे बऱ्याच ठिकाणी त्या लेखनाला सैद्धांतिक स्पर्श झाल्याचे जाणवते. विशेषतः चरित्रलेखनाचा विचार यादृष्टीने लक्षणीय वाटतो. 'चरित्रांत स्वरचित चरित्र उत्तम', 'आख्यायिकांतही सत्यांश असतो'' यांसारखी विधाने चरित्रलेखनाच्या संदर्भात विचारार्ह ठरावीत.

वाचकांच्या या पत्रातून विचारांचे आदानप्रदान सतत होत राहिले तसेच काही वाङ्मयप्रकारांचे स्वरूप नव्याने नजरेपुढे आले. या संबंधात एक लक्षणीय विशेष म्हणजे निबंधमालेच्या २२ व्या अंकातील के.बा.कानेटकर यांचे पत्ररूपाने छापले गेलेले प्रेमबंधन कादंबरीचे परीक्षण. चिपळूणकरांच्या स्वतःच्या लेखनात कादंबरीविचार फारसा दिसत नाही. त्या दृष्टीने निबंधमालेत आलेले कादंबरीचे हे एकमेव परीक्षण ठरेल. कानेटकरांनी या पत्रात तत्कालीन प्रघाताला धरून संविधानक, पात्राचे स्वभाव व निवेदनाचे संवादमय स्वरूप यातील गुणदोष सांगून शेवटी ग्रंथकाराला त्यास साधणारा संवाद गुण लक्षात घेता त्याने कादंबरी ऐवजी नाटकरचनेकडे वळावे अशी सूचना केली आहे. १८७५ साली निबंधमालेत आलेले कादंबरीप्रकाराचे हे परीक्षण बरेच लक्षणीय वाटते.

एकाच पुस्तकावर अनेक वाचकांनी पाठविलेली पत्रे हा वाचकसमीक्षेचा एक प्रकार आपणास १८८५-८६ साली म्हणजे मराठी भाषांतरयुगाच्या शेवटच्या टप्प्यावर दिसतो. इंग्रजी राजवटीत १८५४ सालापासून हे भाषांतर युग सुरू झाले आणि त्या

अनुक्रमणिका

पहिल्या टप्प्यात संस्कृतातील बहुतेक प्रसिद्ध असलेल्या नाटकांची भाषांतरे झाली. दुसऱ्या टप्प्यावर शेक्सपीयरच्या नाटकांची भाषांतरे हा प्रमुख विषय होता तर या शेवटच्या टप्प्यावर शेक्सपीयर बाजूला करून इतर परदेशी उत्कृष्ट नाटकांची भाषांतरासाठी निवड व्हावी असा विचार पुढे येत होता आणि तोही चिपळूणकरांशी समकालीन असलेल्या न्या.मू.का.वि.तेलंगांसारख्या विद्वान विचारवंताकडून मराठी भाषेची समृद्धी व्हायची असेल तर त्यासाठी उत्तमोत्तम युरोपीय नाटकांची भाषांतरे व्हावी आणि त्यासाठी केवळ शेक्सपीयरवर अवलंबून न राहता इतर भाषेतील उत्कृष्ट ग्रंथाची निवड व्हावी ही यामागील भूमिका होती आणि या विचाराला तत्कालीन वाङ्मयप्रांतातील धुरीणांचा पाठिंबा होता. ज्यात न्या.म.गो.रानडे, शंकर पांडुरंग पंडित, गोविंदशास्त्री बापट, रा.भि.गुंजीकर अशी मोठमोठी माणसे होती.

अशा स्थितीत पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असलेल्या रघुनाथ राजाध्यक्ष या तरुण विद्यार्थ्याने इंग्रजी नाटककार ऑलिव्हर गोल्डस्मिथ याच्या एका नाटकाचे मराठीत भाषांतर करून ते या विद्वानांकडे पाठविले. त्यावेळी या साऱ्याच विद्वानांनी पत्रांनी त्यांना आपला अभिप्राय तर कळविलाच पण त्याबरोबर भाषांतर कसे असावे ? यासंबंधीचे आपले विचार कळविले. न्या. रानड्यांनी गोल्डस्मिथच्या इतरही नाटकाची भाषांतरे करावी असे सुचवलं तर न्या. तेलंगानी त्यांच्या शुद्ध भाषेचे कौतुक केले व उत्तमोत्तम परभाषेतील नाटकांना तुमच्या हातून चांगला न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली. विस्ताराचे संपादक रा.भि.गुंजीकर यांच्या मते शंभर वर्षामागील इंग्लिश लोकांची लौकिक स्थिती दर्शविणारा हा एक चांगला आरसा होता. या साऱ्या विद्वानमंडळीत गोविंदशास्त्री बापट यांचा अभिप्राय विस्तृत असून त्याच्या शेवटी "असल्या भाषांतराचा मुख्य उपयोग म्हटला म्हणजे इंग्लिश लोकांच्या रीतिभाती ज्यास इंग्रजी भाषा येत नाही त्यास कळणे" असा एकंदर भाषांतर रचनेचा उद्देश सांगितला आहे. याच्याच जोडीला 'लोक सुधारणा' हाही उद्देश या नाटकांच्या भाषांतरात असावा असा विचार न्या. तेलंगानी मांडला आहे. 'युरोपीय देशात नाटकांचा लोकसुधारणेच्या कामात उपयोग होत असतो. तसेच आपल्या देशांतही व्हावं' असे या संदर्भात त्यांनी आपल्या 'शाइजा नेथन' या भाषांतरित नाटकाच्या प्रस्तावनेत ही म्हटले आहे. नाटकांपासून ज्ञानच नव्हे तर बोध व्हावा, सुधारणा करण्याची इच्छा वाचकांच्या मनात उत्पन्न व्हावी ही या विचारामागील भूमिका दिसते.

निबंधमालेनंतर सुमारे तीन वर्षांनी कोचीन येथून कृष्णाजी केशव आठल्ये यांच्या संपादकत्वाखाली केरळ कोकिळ मासिक सुरू झाले. ते निबंधमालेच्या धर्तीवर असल्यामुळे लवकरच लोकप्रिय झाले. पण निबंधमालेत नसलेल्या दोन गोष्टी केरळ

कोकिळमध्ये होत्या. एक त्यातील वाङ्मयप्रकारांची विविधता आणि दुसरी म्हणजे त्यात येणारी कविता. जस्टिस तेलंग यांनी मराठीतील भाषांतरित नाटकांच्या संदर्भात लोकसुधारणेचा हेतू आवश्यक मानला होता. तो आता काव्याच्याही संदर्भात दिसू लागला. सद्यः स्थितिनिदर्शन आणि सुधारणा यांच्या मिश्रणातून सामाजिक स्वरूपाची नवी कविता या काळांत मिरवू लागली आणि तरुण वाचकांना ती विशेष आकर्षक वाटू लागली.

या दृष्टीने केरळ कोकिळ (१८९५) च्या एका अंकात खुद्द संपादकानी लिहिलेला 'ग्रहदशेचा फटका' ही कविता प्रसिद्ध झाली. ती बऱ्याच वाचकांना आवडली पण त्याबरोबरच त्या कवितेतील सुधारणेविषयीचे काहीसे चेष्टेचे उद्गार त्यांना पसंत पडले नाहीत. या संबंधात नागपूरच्या एका तरुण वाचकाने संपादकांना पाठवलेले पत्र केरळ कोकिळच्या ऑगस्ट १८९५ च्या अंकात १२ प्रसिद्ध झाले आहे. या पत्रात कवीबद्दल आदरभाव व्यक्त करताना सुधारणेविषयीच्या त्यांच्या उद्गाराबद्दल दोष द्यायला पत्रलेखक विसरला नाही. कवितेतील गुणाबद्दल अभिनंदन करताना सुधारणेचा विषय कसा हाताळला जावा या विषयी सूचनाही त्याने केल्या आहेत. मजकुराच्या दृष्टीने हे सर्वच पत्र उद्बोधक आहे. केरळ कोकिळ चे अंक दुर्मिळ असल्यामुळे या पत्राचे काही उतारे देणे विषयाच्या संदर्भात उपयुक्त ठरेल.

"रा.रा.एडिटर, केरळ कोकिळ यांस साष्टांग नमस्कार. आपलें मासिक पुस्तक अलिकडे फार लोकप्रिय झालें आहे हें कळविण्यास आम्हांला फार आनंद वाटतो. आपल्या मागील अंकांतील 'ग्रहदशेचा फटका' फार नामी उतरला. आपल्या भारतवर्षाच्या स्थितीचें त्यांत फार खुबीदार वर्णन आलें आहे. काही स्थळी आधुनिक सुधारणेची टर उडवितांना आपलें मन समतोल नव्हतें एवढाच काय तो दोष मला दिसला. हा फटका वाचून पाहिल्यावर आपल्या बायकामंडळींना वाचून दाखवून त्यांना तो पाठ करण्यास सांगितला. त्यांनाही तो आवडून त्यांनी तो आनंदानें पाठ केला."

याप्रमाणे पूर्वार्धात गुणदोष सांगून पत्राच्या उत्तरार्धात हा पत्रलेखक काही सूचना करू पाहत आहे. तो लिहितो-

"आपल्या फटक्यांतील शब्दसौष्ठव अनुप्रासचातुर्य अवर्णनीय होते. यासंबंधात आपणास एक सूचना करावीशी वाटते. ती ही की आपण ज्यांत सद्यःस्थितीचें चित्र चितारलें आहे तीं गाणीं (फटके वगैरे) सोप्या व सरळ भाषेंत लिहून आपल्या मासिकांत प्रसिद्ध करावी.

सध्याची आपली राजकीय स्थिती कशी आहे, सामाजिक सुधारणा (स्त्रीशिक्षण वगैरे) कोणकोणत्या गोष्टीत आपण कशीकशी सुधारणा केली पाहिजे, "आमच्या

अनुक्रमणिका

स्त्रीपुरुषांना आपले कर्तव्य मनापासून करणें किती आवश्यक आहे. वगैरे गोष्टींसंबंधानें सोप्या व गोड भाषेंत जर आपण कवनें करून तीं स्त्रीपुरुषांच्या विशेषतः आमच्या स्त्रियांच्या हातीं दिलीं तर आपण आर्यमातेची मोठीच सेवा केल्यासारखें होईल. आपली जी कविता मीं वाचली आहे. त्यावरून हें दिसण्यास सोपें पण खरोखरीच अवघड असें काम शेवटी करण्यास आपणच योग्य आहों असें मला वाटतें." या पत्राच्या शेवटी श्रीधर विष्णु परांजपे अशी सही आहे.

हे पत्र वाचताना याच सुमारास लिहिल्या गेलेल्या पण लक्षात कोण घेतो च्या कर्त्यास या केशवसुतांच्या कवितेची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. फरक असला तर इतकाच की तेथे कवीने संपादकाचे अभिनंदन केले आहे तर येथे संपादकाजवळ काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

एकोणिसाव्या शतकातल्या नियतकालिकातील वाचकांच्या पत्रव्यवहारातून आढळणाऱ्या समीक्षेचे स्वरूप व कार्य याचा हा आलेख. त्या शतकातील मुख्य समीक्षा प्रवाहाशी कधी समांतर तर कधी मिळताजुळता असा हा छोटासा प्रवाह आहे. या शतकातील समीक्षेचा आरंभ १८६५ तील दादोबा पांडुरंगांच्या केकावलीवरील टीकाग्रंथापासून मानला जातो. त्या दृष्टीने ही वाचक समीक्षा त्याच्याही अगोदर कार्यप्रवृत्त झालेली दिसते. उदाहरणार्थ १८९४ त श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी विविधज्ञानविस्तारामध्ये 'विक्रमशशिकला' नाटकावर कडक टीका करून वाङ्मयातील ज्या दुष्ट प्रवृत्तीशी झुंज घेतली होती. तशीच ती १८५० पासून १८६२ पर्यंतच्या बारा वर्षाच्या काळात मराठी वाचकांनी घेतली आहे तर या शतकाच्या शेवटी नुकत्याच डोकावू पाहणाऱ्या सामाजिक कवितेतील सुधारणांची कुणी चेष्टा केलीच तर तिलाही अंकुश लावण्याचे कार्य वाचकांतील आपल्या पत्राद्वारे केले आहे.

मोरोपंताच्या कवितेसंबंधी जो वाद निबंध मालेत निर्माण झाला त्याही वेळी त्या वादातील प्रश्नांची उकल करण्यात या वाचकवर्गाने बरेच साह्य केले आहे. इतकेच नव्हे तर नव्याने निर्माण होणाऱ्या कादंबरीसारख्या वाङ्मयाचे गुणदोष विवेचन करण्याची तत्परताही दाखवली आणि चरित्रात्मक समीक्षेने तर या समीक्षेला सैद्धांतिक स्पर्शही झालेला आढळतो. यानंतरच्या शतकात निदान पहिली तीसचाळीस वर्षे तरी हा उत्साह वा हुरूप वाचकांच्या संदर्भात फारसा दिसत नाही. हे लक्षात घेता १९व्या शतकातील या वाचकसमीक्षेचे महत्त्व विशेष जाणवते.

टीप - प्रस्तुत लेखकाच्या एकोणिसावे शतक : मराठी समीक्षा या संकल्पित ग्रंथातील एक प्रकरण

संदर्भ :- १-२ गतशतकपत्रिका डॉ. शशिकांत लोखंडे ज्ञानोदय पृ. १२ / पृ १७

अनुक्रमणिका

३. मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास - पृ.४४

४. मराठी समीक्षेचे आदिपर्व पृ. १३२

५. निबंधमला अं.२२ पृ. ३३-३६

६-१० विश्रब्ध शारदा पृ. १८१-१८९ टीप क्र. ६-१०

११. निबंधमालेचा शेवटचा अंक डिसेंबर १८८१ चा असला तरी तो चिपळूणरांच्या मृत्यूनंतर ना. १ एप्रिल १८८३ ला प्रसिद्ध झाला.

१२. रा. श्रीधर विष्णु परांजपे बी.ए. नागपूर यांचे पत्र (केरळकोकिळ ऑगस्ट १८९५)

१३. केशवसुतांची कविता (संपा.भ.श्री.पंडित. कविता क्र. ६८ पृ. २०२)

- भा. श्री. परांजपे

⌘⌘⌘

कविता... कविता... कविता...

घन: श्यामा

(१)
तू वेचत राहिलीस
त्या शापित राज्यातले उरले सुरले
पुण्य,
तापसांच्या साधनेतले सत्त्व,
निसर्गातले निखळ निर्मलत्व
तू वेचत रहिलीस
पर्वतीय वायूची प्रार्थना,
चंद्र-सूर्याची प्रतीक्षा,
सागराची अपेक्षा.
हे सारे वेचून, हे गर्भवती !
तू तुझ्या गर्भात शिरली - गर्भच
बनली.
आणि अखेरीस उगवली
ती विद्युतनेत्री पर्जन्यरात्र-
श्रावण वद्य अष्टमीची
गोष्ट !!

(२)
ही नदी, हा समुद्र, हे आकाश
हे जंगल, हा पर्वत, हा अवकाश
सारे कसे अचानक
एखाद्या अद्भुत क्षणी
माझ्या वैष्णवतेत येऊन उभे राहतात ;
मग हृद्यागारी प्रवेशून
एका सुगंध - अनुष्ठानाला प्रारंभ
करतात !
आणि त्याच वेळी
तू विदुराकडे गेल्या प्रसंगाची
भागवत पाने
माझ्या कानाशी
सस्मित कुजबुजत राहतात !!

कविता...
कविता...
कविता...

(३)
जेव्हा माझी शब्दसंहिता
निराधार बनते,
जेव्हा ती एकवस्त्रा असते ;
अधोमुख होऊन
थरथरत
जेव्हा ती दुखाव्यात उभी राहते ;
तेव्ही ती तुला हाकारते
तुझी प्रार्थना करते -
" हे अनादी अनंता, हे प्रगल्भा, हे अपरा !
तुझ्याजवळ
अमर्याद अर्थ आहे
अपरंपार आशय आहे;
तुझी जाण, तुझे भान-
दिशातीत चैत्र आहे,
कालातीत वसंत आहे...."
जेव्हा माझी शब्दसंहिता
रजःस्वला असताना
विवस्त्रा होऊ जाते
तेव्हा त्या सर्वांसकट
तुझी कृपा
हे सूर्याच्या सुगंधा,
वस्त्ररुप होऊन
तिला झाकायला येते.

(४)
अवस्था
जाग आणि झोप
यातील सीमा प्रदेशाची...
मी टिपणे काढीत होतो
महाभारताची
धर्मक्षेत्रावरील घटितांची.
तू बोलत होता-
"कृतस्त्वा कश्मलमिदं
विषमे समुपस्थितम्...."

कविता...
कविता...
कविता...

आणि अस्वस्थ झाला होता
ध्वजारूढ
वानरयूथमुख्यम्.
तेवढ्यात अचानक
वादळवारा सुटला
आणि तुझ्या मोरपिसातला एक तंतू
माझ्या वहीवर पडून चिकटला !
तेव्हापासून
त्या तंतूच्या आशीर्षादात
मी धन्य आहे ;
बावडीत भिजणाऱ्या
फुटक्या पायरीसारखा
प्रसन्न आहे.
...अवस्था
जाग आणि झोप
यांतील सीमाप्रदेशाची.

(५)
महाभारताच्या
शेवटच्या शब्दासमोर
उद्गार - चिन्हासारखी
तुझी बासरी उभी असते.
आणि त्या चिन्हाखाली
टाकलेल्या टिंबामध्ये
मला सारी सृष्टी
हिंदकळताना दिसते !

अनुक्रमणिका

कविता...
कविता...
कविता...

(६)

त्याच आंगठ्यावर बाण मारला व्याधाने
जो तोंडात धरून
पाण्यावर पसरविलेले
अलौकिक हास्य
प्रलयाने पाहिले
ज्या महाविरामाची विलसिते
मी प्रारंभापासून चोखत राहिलो शब्दांतून
त्यानेच मला आज
अगदी खेचून जवळ ओढले.
मी तुझा एक अती अल्प
पण आत्मीय अंश आहे
असे मला नेहमीच वाटत आले आहे;
आज ते पुन्हा एकदा
खरे ठरले !

- श्रीधर शनवारे
राधेय, गोकुळ, नागपूर

अनुक्रमणिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि निझाम

प्रा. डॉ. भाऊ लोखंडे

The States can not have an existence apart from the Indian Union. People of India will never recognize any Indian State as a SOVEREIGN INDEPENDENT STATE. The INDIAN STATES are part and parcel of India. The Union can not permit them to exist within it as islands of isolation. Hyderabad move will lead to BALKANIZATION. The United Nations Organization will never grant any assistance to an Indian State against external aggression or internal commotion without insisting upon the States first introducing responsible Government. Whatever the choice of the Indian states may be, the duty of the people of Indian is clear. On their behalf the interim Government should notify His Majesty's Government that the British Parliament has no right to pass any law abrogating paramountcy.

अनुक्रमणिका

Government of India will never recognize any Indian States as a Sovereign Independent State. The announcement by Travancore and HYDERABAD and the inclination shown by other states to follow their example has created a new problem which may turn out to be worse than the Hindu-Muslim problem as it is sure to result in the further BALKANIZATION OF INDIA.

उपरोक्त सिंहगर्जना आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या अनामिक व विस्मृत देशभक्ताची, निजामाच्या हैद्राबादसंबंधीची -

निजाम सरकारने 'हैद्राबाद' स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली तेव्हा बाबासाहेबांचे राष्ट्रभक्त अंतःकरण खडबडून नव्हे खवळून उठले आणि म्हणाले, "भारतीय जनता केन्द्रशासनाव्यतिरिक्त कुठल्याही स्वतंत्र राज्याचे अस्तित्व मान्यच करणार नाही."

" हैद्राबादची कृती ही भारताचे तुकडे करणारी ठरेल."

"यूनोदेखील अशा फुटीरांना मदत करणार नाही. ब्रिटिश संसदेला अशा प्रकारचा कायदा करण्याचा मुळीच अधिकार नाही. ही समस्या हिंदू-मुस्लिम समस्येपेक्षाही भयावह ठरेल आणि तिचे पर्यवसान भारताच्या विभाजनात होईल. म्हणून सर्व दलित मंडळी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी सर्वसामर्थ्यानिशी लढा देईल" -

"The Scheduled Castes would fight for the Independence of the country with greater vigour and with greater conviction than others"

"आपण स्वतंत्र राहून यूनोची मदत मिळविण्याची निजामाची अपेक्षा म्हणजे आपल्याच कल्पनास्वर्गात विचरणे होय."

बाबासाहेब कठोरपणे म्हणतात, "To be independent and to hope to get recognition and protection from the UNO is to live in one's own paradise."

हैद्राबादसंस्थानात राहणाऱ्या आपल्या दलित बांधवांना सावधगिरीचा इशारा देत बाबासाहेब म्हणतात, "हैद्राबादसंस्थानातील अस्पृश्य बंधूंना मी असा इशारा देतो की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत आणि कितीही संकटे ओढवली तरी निजामाला आणि इत्तेहादुल मुसलमीनाला साथ देता कामा नये. सवर्ण हिन्दू आपणावर कितीही जुलूम करीत असोत, त्यामुळे आपण आपली बुद्धी बहकू देता कामा नये. आणि त्यांच्या विषयीच्या राजामुळे आपली जात सोडून देऊन आपल्या शत्रूला सामील होता कामा नये. अस्पृश्य जातींचा झगडा स्वातंत्र्यासाठी आहे, त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आज

हवे आहे आणि म्हणून ते स्वातंत्र्यासाठी सतत झगडत आहेत. निजाम हा स्वातंत्र्याचा शत्रू आहे. त्या स्वातंत्र्याच्या शत्रूबरोबर जर अस्पृश्यांनी संगनमत केले तर त्यांचा घात होईल. निजाम हा हिंदुस्थानचा, आपल्या मातृभूमीचा शत्रू आहे ही गोष्ट अस्पृश्यांनी लक्षात घेतली पाहिजे. हैद्राबाद संस्थानने हिंदी संघराज्यात सामील झालेच पाहिजे आणि सामील होण्याबद्दल आपण आग्रह धरला पाहिजे कारण हिंदुस्थानची भौगोलिक एकता आणि अखंडता बिघडू देण्याचा हक्क कोणत्याही संस्थानाला नाही. हिंदी संघराज्याला जो विरोध निजामाने चालविला आहे त्याबद्दल यत्किंचितही गय करता कामा नये.

"निजामाला हे कळले पाहिजे की, हिंदी संघराज्यात तो जर सामील झाला आणि हिंदी राज्यघटनेत जर त्यांच्या घराण्याला अभयवचन दिले तर त्याचे राजपद सुरक्षित होईल. इत्तेहादुल मुसलमीनावर विश्वास टाकण्यापेक्षा हिंदूंचा विश्वास संपादन करण्यात त्याला जास्त सुरक्षितता आहे. तथापि, त्याने कसे वागावे हा त्याचा प्रश्न आहे."

"मला आज फक्त एवढीच तळमळ लागली आहे की, माझ्या बांधवांनी त्याला साथ देऊन आपल्या इमानदारीला काळिमा फासू नये. त्यांनी लक्षात ठेवावे की, निजाम हा अस्पृश्यांचा आणि अस्पृश्यांच्या मातृभूमीचा शत्रू आहे."

बाबासाहेब आपल्या दलित बांधवांना देशभक्तीची जाणीव करून देत देशासाठी आत्माहुती द्यायला तत्पर राहायला सांगताना म्हणतात, "अस्पृश्य जाती ह्या भारतभूमीची पहिली लेकरे आहेत. या हिंदुस्थानचे अस्पृश्य हे आदिसंतान आहेत. हिंदुस्थानातील इतर काही जातींची हिंद ही जितकी मातृभूमी आहे. तितकीच ती अस्पृश्यांचीही मातृभूमी आहे. या मायभूमीच्या मोठेपणासाठी त्यांनी झगडले पाहिजे. मायभूमीचे स्वातंत्र्य आणि तिचे अखंडत्व कायम ठेवण्यासाठी त्यांनी जिवाभावाने लढावयास तयार झाले पाहिजे. हिंदुस्थान हे आपले घर आहे, आपले वतन आहे, ही गोष्ट अस्पृश्यांनी कधी विसरता कामा नये."

हैद्राबाद संस्थान :

भारतात त्या काळी अनेक संस्थाने होती. त्यात हैद्राबादचे हे लोकसंख्येने पहिल्या आणि विस्ताराने दुसऱ्या क्रमांकाचे होते. हैद्राबादचे त्या काळचे वार्षिक उत्पन्न आठ कोटी आणि क्षेत्रफळ ब्यांशी हजार तीनशे तेरा चौरस मैल होते. त्यात सत्तर टक्के हिंदु, अठरा टक्के दलित, अकरा टक्के मुसलमान आणि इतर एक टक्का असे लोकसंख्येचे प्रमाण होते. १९४१ च्या जनगणनेप्रमाणे हैद्राबाद संस्थानात १ कोटी, ६३ लक्ष ३८ हजार

५३४ एवढी लोकसंख्या होती. त्यातच सालारजंग, फखरुल खानखानान, महाराजा किशन प्रसाद, राजे रायरायान यांच्या जहागिरी होत्या. सालारजंगाचे घराणे शियापंथी होते. याच घराण्यातील तीन जण पुढे निजामाच्या पंतप्रधानपदावर आरूढ झाले. नरेंद्र बहादूर नंतर हैद्राबाद संस्थानाचे दिवाण म्हणून नेमले गेले. मीर उस्मान अली ह्या सातव्या निजामाला हैद्राबादच्या गादीवर बसविण्यात महाराजा किशनप्रसादांनी पुढाकार घेतला होता. 'निजाम' चा अर्थ व्यवस्थापक 'Regulator of the Realm' असा होतो. मीर कमरुद्दीन हा १७२४ मध्ये पहिला निजाम बनला. मीर कमरुद्दीनचे आजोबा अबिदअली मूळ समरकंदबुखाराचे होते ते यात्रेनिमित्त भारतात आले. अबिदअलींनी तत्कालीन सम्राट शहाजहानला प्रसन्न केले. आपला मुलगा शहाबुद्दीन याचा सादुल्लाखानाच्या मुलीशी विवाह घडवून आणला. शहाजहान-औरंगजेब या पितापुत्राच्या भांडणांत अबिदअलीने औरंगजेबाचे समर्थन केले. गोवळकोंड्याच्या लढाईत १६८७ ला तो मृत्यू पावला. त्याच्यानंतर त्यांचा मुलगा शाहबुद्दीन गुजरातचा सुभेदार बनला. त्याचा ही शेवट १७१० साली झाला. त्याचा मुलगा मीर कमरुद्दीन हा हैद्राबादचा पहिला निजाम बनला. १६७१ साली जन्मलेल्या मीर कमरुद्दीनने गुजरातमध्ये सुभेदार असताना दिल्लीतील सत्तासंघर्षात भाग घेतला होता. मोगल सम्राट फरुखसियरने पहिल्या निजामाला निजामुलमुल्क फिरोजजंग चिनकुलिझखान असा किताब दिला होता. नंतर महंमदशहाने त्याला 'आसिफजाह' असा किताब दिला. औरंगजेबाच्या मृत्यूपरान्त तो अधिकच प्रतिष्ठित झाला. दक्षिणचा सुभेदार म्हणून आलेल्या कमरुद्दीनने मुबारीजखानाला पराभूत करून १७२४ मध्ये आपली पूर्ण सत्ता जाहीर केली. आपल्या विजयात मदतगार ठरलेल्या छत्रपती शाहू पेशवा बाजीराव आणि पिलाजी जाधवांची प्रशंसा करण्यास हा चतरा निजाम विसरला नाही. आता मात्र तो दिल्लीच्या दडपणातून पूर्णपणे मुक्त झाला होता. त्यांच्या नंतर नासिरजंग, मुजफ्फरजंग, सालाबतजंग, निजाममुल्मुल्क, सिकंदर अलीखां, नबाब नासिरुद्दौला, महबूब अलीखां आणि शेवटी मीर उस्मानजी अली असे एकूण दहाजण निजाम झाले. १९४८ साली सरदार पटेलांनी पोलीस कार्यवाहीत हैद्राबाद संस्थान खालसा केले.

मराठवाडा :

निजामुल्मुल्क किंवा निजामअलीने १७६३ ते १८०३ पर्यंत राज्य केले. त्याला अनेक वेळा मराठ्यांचा मुकाबला करावा लागला. त्याला वठणीवर आणण्यासाठी पेशव्यांनी विश्वासराव व शिंदेंना औरंगाबादला रवाना केले आणि स्वतः होळकर, शिंदे यांच्या मदतीने सिंदखेड्यावर धडक देऊ लागले. त्या लढाईत निजाम पराभूत होऊन २५

अनुक्रमणिका

लाखांचा प्रदेश पेशव्यांना द्यायला तयार झाला. परंतु त्याने वचन पाळले नाही त्यामुळे बाळाजी पेशव्यांनी सदाशिवराव भाऊस निजामावर पाठविले. १७६० साली उदगीरच्या याच लढाईत सदाशिवराव भाऊंनी त्याला पराभूत केले. त्यानंतर ज्या वाटाघाटी झाल्या त्या सरदार नाईक बावणे यांच्या गढीत. तहनाम्यात निजामाने गोदावरी, तुंगभद्रा आणि सीना या नद्यांच्यामध्ये येणारा मराठी भाषिकांचा 'वाडा' म्हणूनच या प्रदेशास 'मराठवाडा' असे नाव पडले. मराठवाड्याचा जन्म ज्या गढीत झाला तीच सरदार नाईक बावणे यांची गढी. असा इतिहास वसंत पोतदार सांगतात. असाच दुसरा अभिमानाने छाती उंचावणारा प्रसंग नाना फडणिसाच्या वेळी उद्‌भवला होता.

१७६३ साली पैठणजवळ राक्षसभुवन येथे माधवराव पेशव्यांनी रघुनाथरावांबरोबर निजामावर हल्ला केला. माधवरावांनी पराक्रमाची शर्थ केली. शत्रुपक्षात सापडलेल्या राघोबांना सोडविले. निजाम पुन्हा शरण आला. ८२ लाख उत्पन्नाचा मुलूख द्यायला कबूल झाला पण पुन्हा दगाबाजी केली. नाना फडणिसांच्या पत्रास महत्त्व दिले नाही. निजामाच्या दिवाणाने (मशिर उल्मुलक ने) भर दरबारात मराठा वकिलाचा अपमान केला. पेशव्यास लंगोटी लावून, लोटी घेऊन काशीस जावयास लावू अशी भाषा वापरली. आता निजामाला चांगलीच अद्दल घडविण्यासाठी शिंदे, भोसले, गायकवाड, पटवर्धन, आणि शिदनाक् महार ससैन्य गोळा झाले. या सर्वांची गाठ खर्ड्याच्या लढाईत निजामाशी पडली. त्यातला मजेदार प्रसंग सुप्रसिद्ध आहे. शिदनाक् महाराचे पथक खर्ड्याच्या लढाईत अग्रभागी होते. शिदनाक् हा पराक्रमी महार तासगावजवळील कळंबी गावचा वतनदार होता. शाहू सुटून आल्यावर शिदनाक्‌च्या आजोबाने त्याला मदत केल्याबद्दल शाहूमहाराजांनी 'कळंब' गाव त्याला वतन म्हणून दिला होता. त्याचा तळ इतर ब्राह्मणमराठा सरदारांशेजारीच पडला होता. सवर्ण सरदारांत चुळबुळ सुरू झाली. सवाई माधवरावांपर्यंत वार्ता नव्हे तक्रारच गेली. पेशव्यांच्या शेजारी वृद्ध मराठा सरदार हिरोजी पाटणकर बसलेले होते. श्रीमंत पेशव्यांनी तक्रार ऐकून पाटणकरांकडे नजर टाकली. तेव्हा तो म्हातारा सरदार गुरगुरत म्हणाला, "ही काय जेवणाची पंगत आहे? ही युद्धाची छावणी आहे. येथे विटाळ चांडाळ काही नाही." तेव्हा पेशव्यांनी निकाल देत म्हटले, "शिदनाकाचा तळ आहे तेथेच असू द्यावा." निजाम व मराठ्यांच्या चकमकी प्रथमतः परिंडे गावी झाल्या आणि नंतर निजामाचे सैन्य 'खर्डे' या गावी घेरले गेले. या लढाईत शिदनाक् महाराने केलेला पराक्रम जगजाहीर आहे. निजाम शरण आला. १७९५ ला झालेली ही खर्ड्याची लढाई महारांच्या पराक्रमाचे प्रतीक ठरली. निजामाने नाईलाजाने परिंड्यापासून तापीपर्यंत प्रदेश, तीन कोटी रुपये युद्धखर्च आणि दौलताबादचा किल्ला तहामध्ये मराठ्यांना दिला.

अनुक्रमणिका

जुने हैद्राबाद आणि मीर उस्मान अलीचे नवीन हैद्राबाद संस्थानात बरेच अंतर होते. सर्व क्षेत्रांत मुस्लिमवर्चस्व होते. एकनिष्ठ हिंदू जागिरदारांना व बुद्धिमान हिंदु कारभाऱ्यांना हाताशी धरून मुस्लिम वर्चस्व अबाधित ठेवण्याची रीत तेथे नवीन नव्हती. सर्वांची इच्छा निजाम राजवट कायम राहावी अशीच होती. जागीरदारच काय तेथील कम्युनिस्टांचाही पाठिंबा मिळविण्यात निजाम यशस्वी झाला होता. प्रा. नरहर कुरुंदकर म्हणतात, "वऱ्हाड हैद्राबाद संस्थानात समाविष्ट करण्यासाठी जोर धरणारा प्रभावी हिंदु नेत्यांचा गट निर्माण करण्यात निजाम यशस्वी झाला होता. बाबासाहेब खापर्डे तर बावीस-अजुर या दिवशी असफजाही ध्वज आपल्या गढीवर लावीत असत. पन्नालाल पित्ती हे निजामाचे खास विश्वस्त होते. अकोल्याच्या बाबुराव देशमुख वाचनालयासाठी १० हजार, शिवाजी शिक्षण संस्थेला काही एकर जागा व इमारतीसाठी तीस हजारांची देणगी निजामाकडून मिळाली होती. बनारस हिंदु युनिवर्सिटीला १ लाखाची देणगी निजामानेच दिली होती."

मराठवाड्यात शैक्षणिक कार्य :

कालान्तराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी एका उदात्त हेतूने स्थापन केली.

"The People's Education Society's objective is not merely to give education, but to give education in such a manner as to promote intellectual, moral and social democracy. This is what modern India needs and this is what well-wisher of India must promote."

मराठवाड्याचे आकर्षण :

बाबासाहेबांना विश्वविख्यात अजिंठा एलोऱ्याची लेणी, औरंगाबादचे सुखद हवामान आणि तेथे विसावणारी त्यांच्या आजोबांची समाधी मराठवाड्यात ओढून नेत असे. याशिवाय मराठवाड्याचे अपरंपार अज्ञान आणि दारिद्रय त्यांच्या हृदयाला भोके पाडीत असे.

औरंगाबाद जिल्हा दलित परिषदेने मक्रनपूर येथे ३०/१२/१९३८ साली घेतलेल्या परिषदेत बोलताना बाबासाहेब मोठ्या खेदाने म्हणतात, "आजची येथील परिस्थिती फारच विचित्र आहे. कारण येथे सर्वच मुसलमानी दिसत आहे. इस्लाम धर्म असा आहे की ज्यात काहीही भेद मानीत नाहीत. इस्लाम धर्मात शेठ व गरीब एकाच

मशिदीत बसू शकतात आणि याच निजाम सरकारच्या राज्यात अस्पृश्यता पाळली जावी ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. १९३४ साली मी दौलताबादचा किल्ला पाहावयास गेलो तेव्हा एका मुसलमान मुलीने एक तास शिव्या देऊन आईबहिणी उद्धरल्या." बाबासाहेब त्या प्रसंगाचे वर्णन करतात, "तो महिना रमझानचा होता. मुसलमान लोकांच्या उपवासाचा. किल्ल्याच्या गेटबाहेर एक छोटा हौद होता. पाण्याने काठोकाठ भरलेला. सभोवार दगडी चौथरा. प्रवासामुळे धुळीने आमचे सर्व कपडे भरून गेले होते. सर्वांची इच्छा तोंड धुऊन साफ करण्याची होती. विचार न करता, दगडी चौथऱ्यावर हौदातील पाण्याने तोंड व पाय धुतले. आम्ही किल्ल्याच्या दरवाज्यापाशी गेलो. आत हत्यारधारी सैनिक होते. त्यांनी तो दरवाजा उघडला व आत प्रवेश दिला. मागून एक वृद्ध मुसलमान माणूस धावत आला. तो ओरडत होता. 'धेडांनी हौद बाटविला.' भराभर आसपासचे मुसलमान जमा झाले. आम्हाला शिव्या देत म्हणू लागले, "धेड उर्मट बनलेत, आपला धर्म विसरलेत, धेड लोकांना धडा शिकवलाच पाहिजे.....आमची सहनशीलता संपुष्टात येत चालली" रागीट आवाजात मी म्हणालो, "तुमचा धर्म तुम्हाला हेच शिकवितो काय ? आम्ही किल्ल्यात जायचे की नाही ?" पहारेकऱ्याने माझ्या नावाची चिठ्ठी दाखवून परतल्यावर म्हटले, "तुम्ही किल्ल्यात जाऊ शकता परंतु आत कोठेही पाण्याला हात लावता येणार नाही. आमच्या बरोबर एक सशस्त्र सैनिक देण्यात आला तो एवढ्याचसाठी की पाण्याबाबत मुसलमान सुपरिंटेंडेंटने काढलेल्या फर्मानाचे उल्लंघन होता कामा नये."

या प्रसंगाने बाबासाहेबांच्या डोक्यात धर्मान्तराची चक्रे वेगाने फिरू लागली. १३ ऑक्टोबर १९३५ ला बाबासाहेबांनी येवले मुक्कामी धर्मान्तराची भीमप्रतिज्ञा प्रकट केली. हैद्राबादेत अस्पृश्यांना बळजबरीने धर्मान्तरित करण्यासाठी मुसलमानांना सरकारचे प्रोत्साहन देण्यात येई. या चळवळीला ते तबलीघ व संजीय चळवळ म्हणत. 'खाकसार पार्टी' सुद्धा त्यांना मदत करी. तीनशे मौलवी या कामी पगारावर नेमले होते. ते अस्पृश्यांमध्ये इस्लाम धर्माचा प्रचार करीत. अनेकदा बळजबरीने पैसा व गुंडगिरीचा वापर करीत. बहादूरयारजंगच्या हस्तकांची हजारावर अस्पृश्य बाटवून मुस्लिम बनविले होते. साठी ओलांडलेल्या स्त्रिया इस्लाम कबूल करीत नव्हत्या. त्यांना बळजबरीने मुसलमान बनविण्यात आल्याचे बाबासाहेबांना कळले.दलितांना जमिनी नव्हत्या. वेठबिगारी चालू असे. शाळा नव्हत्या, नोकऱ्या नव्हत्या. बाबासाहेब हे सर्व आठवून म्हणाले, "या संस्थानात अस्पृश्यांसाठी शाळा नसाव्यात ही आश्चर्याची गोष्ट आहे. एकच मुलगा येथे बी.ए झाला आहे. पण मी ३ वर्षे खटपट करूनही त्याला नोकरी मिळाली नाही. मी लंडनमध्ये असताना निजामाची स्कॉलरशिप घेऊन पुष्कळ विद्यार्थी आले होते, त्यात

अनुक्रमणिका

एकही महार, मांग किंवा चांभार नव्हता. तुम्हाला तोंड खोलण्याची (उघडण्याची) सक्त मनाई आहे. मिरवणुकी काढता येत नाहीत. आम्ही ब्रिटिश मुलखातले आहोत म्हणून आम्हाला गर्व्हनर पर्यंत जाता येते. मुलाच्या पोटात दुःख असूनही जीभ छाटून गेल्यामुळे त्याचे दुःख कळणे शक्य नाही. तशीच तुमची स्थिती आहे. तुमच्या जिभा कापल्या गेल्या आहेत. येथील राज्यपद्धती सदोष आहे. म्हणून तुम्ही आतून काही करू शकत नाही. पण मी बाहेरून जरूर करीन. तुमची दुःखे नाहीशी करण्याचा प्रयत्न करीन. तुम्ही मात्र मेलेल्या जनावरांचे मांस खाण्यासारख्या गलिच्छ चाली सोडून दिल्या पाहिजेत. तुम्ही म्हणाल आमचे पोट नडते. पण हा पोटाचा प्रश्न नाही. ह्या अब्रूचा प्रश्न आहे. त्याने सर्व जातीची अब्रू जाते.'' तळवदे (ढोकी) येथे दि २३ फेब्रु १९४१ ला भरलेल्या वतनदार महार मांग परिषदेतही बाबासाहेबांनी दीनदलितांबद्दल असाच कळवळा व काळजी व्यक्त केली होती. त्यात ते म्हैसूरची तुलना हैद्रावादबरोबर करतात व खेद व्यक्त करीत म्हणतात, ''हिंदुस्थानातील पाचसहाशे संस्थानापैकी निजामाचे राज्य पहिल्या दर्जाचे आहे. त्या मानाने बडोदा स्टेट किती लहान पण त्याने अस्पृश्यशिक्षणाची सोय केली आहे. म्हैसूर संस्थानामध्ये तसेच : अस्पृश्यांना जमिनी मिळाल्या तसे हैद्राबाद संस्थानात आहे काय ? वतनदार महारांच्या पोटापाण्याचा प्रश्न अजून सुटला नाही. प्राथमिक शिक्षणाची सोय नाही. लाखो एकर जमीन रिकामी पडली असून अस्पृश्य उपास काढीत आहेत. आपली दुःखे सरकारच्या नजरेस आणण्यासाठी अस्पृश्यांनी संघटना करावी. हैद्राबादच्या नवीन होणाऱ्या राज्यघटनेत अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य ते प्रतिनिधित्व मिळविण्याचा प्रयत्न करावा. आज जे काही पैसे निजामप्रांतीय अस्पृश्यांनी मला देण्यासाठी आणले होते ते त्यांच्या कार्याला पाहिजे असतील तर घेऊन जावेत. आपली गाऱ्हाणी योग्य त्या प्रसंगी मी सहाय्य करीन.'' अशाही भयानक अवस्थेमध्ये बाबासाहेब सनदशीर मार्गाचाच अवलंब करायला सांगतात हे विशेष.

बळजबरीचे धर्मान्तर :

बाबासाहेब आंबेडकरांना सर्वांत जास्त अस्वस्थ करणारी गोष्ट म्हणजे दलिताचे (तत्कालीन अस्पृश्यांचे) निजामाच्या हस्तकांकडून केले जाणारे बळजबरीचे धर्मान्तर होय. रझाकाराचे अस्पृश्यांना धाकदपटून, घरे उद्ध्वस्त करून इस्लाममध्ये जबरदस्तीने ढकलणे असह्य झाले होते. याबाबतीत त्यांनी दिल्लीवरून निवेदन करून जनतेला केलेले मार्गदर्शन ऐतिहासिक मोलाचे आहे. नव्हे हृदयाची कालवाकालव करणारे आहे. बाबासाहेब म्हणतात, ''पाकिस्तान आणि निजाम हैद्राबाद संस्थान यात राहणाऱ्या अस्पृश्य लोकांकडून असंख्य तक्रारी माझ्याकडे आल्या असून पाकिस्तान आणि हैद्राबाद

यांच्या दुष्ट धोरणामुळे तेथील जनतेवर आज संकटे गुदरली आहेत. अल्पसंख्य मुसलमानांची लोकसंख्या वाढविण्यासाठी अस्पृश्यांना जबरदस्तीने बाटविले जात आहे.''

हैद्राबाद संस्थानातील इत्तेहादुल मुसलमीनने तर अस्पृश्यांच्या छळणुकीचा कहरच करून सोडला आहे. अस्पृश्यांना दहशत बसावी आणि त्यांनी भयभीत होऊन इस्लामधर्माचा आश्रय घ्यावा म्हणून रजाकारांनी त्यांची घरे जाळण्याचा आणि त्यांना लुटण्याचा सपाटा सुरू केला आहे. या अत्याचारात जसा धार्मिक डाव आहे तसा राजकीय डावही आहे. हैद्राबाद संस्थानातील प्रजासत्ताक राज्यपद्धती स्थापन करण्याची जी चळवळ सुरू होत आहे आणि हिंदी संघराज्यात हैद्राबादने सामील व्हावे म्हणून जे प्रयत्न स्टेट काँग्रेसतर्फे चालू आहेत त्यांना अस्पृश्यांनी पाठिंबा देऊ नये म्हणून इत्तेहादुल मुसलमीनने जाळपोळ आणि मारपीट सुरू केली आहे. मी त्यांना, या दारुण आपत्तीत हात देऊ शकत नाही याबद्दल मला अत्यंत दुःख होते. मी त्यांना एवढेच म्हणू शकतो की, ताबडतोब हिंदुस्थानात निघून या. हिंदुस्थानातही त्यांचे कमी हाल आहेत असे नाही. पाकिस्तानात त्यांच्यावर इस्लामी धर्मात ओढण्यासाठी जुलूम चालू आहे. हिंदुस्थानात त्यांच्यावर बहिष्कार टाकला जातो व त्यांना जिणे मुश्किल केले जाते. संयुक्त प्रांतात तर अस्पृश्यांना जिवंत जाळण्यापर्यंत मजल गेली. पूर्व पंजाबात जाट आणि शीख लोक अस्पृश्यांचा जो छळ करीत आहेत त्याला सीमा नाही. शीख आणि जाट हे शरणार्थींची घरे बळकावतात, मालमत्ता हिसकावून घेतात व त्यांच्या बायकामुलीही पळवून नेतात. ज्या सवर्ण हिंदूंच्या हाती राज्यकारभार आहे ते कोणत्याही प्रकारची मदत अस्पृश्यांना करीत नाहीत. अशातऱ्हेची शोचनीय अवस्था असली तरीसुद्धा अस्पृश्य बांधवांना माझा आदेश आहे, की यापुढे क्षणभरही पाकिस्तानमध्ये न राहता साधेल त्या युक्तीने हिंदुस्थानात ताबडतोब निघून यावे. अस्पृश्यांना जे संरक्षण देणे आवश्यक होते ते काँग्रेसपक्षाने तितक्या प्रमाणात दिले नाही ही गोष्ट खरी. तरीसुद्धा आम्ही अस्पृश्य लोक संख्याबळाने इतके मोठे आहोत की, जर आम्ही सुसंघटित आणि शिस्तबद्ध झालो तर देशातील राजसत्ता ज्या पक्षाच्या हातात असेल त्याला आपल्या सामर्थ्याच्या जोरावर अंकित करू शकू.''

धर्मान्तरापेक्षा मृत्यू बरा :

धर्मान्तर घडविण्यात रझाकारांनी पुढाकार घेतला आणि अनेकांना छळून मारून धमकावून धर्मान्तरित केले. त्याही अवस्थेत बाबासाहेब सहज वाकू नका. धर्मान्तर करण्यापेक्षा मरण पत्करायला सांगतात, धर्मान्तराच्या बाबतीत माझ्या अस्पृश्य बांधवांना माझे निक्षून सांगणे आहे की, मुसलमानांच्या छळापासून आपला बचाव करण्यासाठी

अनुक्रमणिका

म्हणून सुखासुखी धर्मान्तर करू नका. धर्मान्तर करण्यापेक्षा त्यांनी मेलेले बरे. त्यांना पुन्हा निक्षून सांगतो की, जुलुमाचा जर कहरच होऊन त्या जुलमाने मुसलमान व्हावे लागल्यास आपण कायमचे आपल्या जातीला मुकलो असे मात्र त्यांनी मुळीच समजू नये. सुदैवाने सवर्ण हिंदूवर धर्मशास्त्राची जी कडक बंधने आहेत ती आपल्यावर नाहीत. त्यामुळे बाटाबाटी झाल्यानंतरही आपण आपल्या जातीत आणि धर्मात संधी सापडताच बेशक परत येऊ शकतो. माझे जे दुर्दैवी बांधव जुलूमजबरदस्तीमुळे मुसलमान झाले असतील त्यांना परत प्रेमाने आपल्या जातीत घेतले जाईल आणि सन्मानाने वागविले जाईल.

हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्य बंधूंना मी असा इशारा देतो की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत आणि कितीही संकटे ओढवली तरी निजामाला आणि इत्तेहादुल मुसलमीनला साथ देता कामा नये. तद्वतच मुसलमान किंवा मुस्लिमलीग वर विश्वास टाकण्याबद्दल इशारा देताना बाबासाहेब म्हणतात, "मला माझ्या बांधवांना जे सांगावयाचे आहे, ते हे की, पाकिस्तानमध्ये असो की हैद्राबादमध्ये असो, मुसलमान किंवा मुस्लिमलीग यांच्यावर विश्वास टाकल्याने त्यांचा घात होईल. अस्पृश्य जातींना हिंदूंविषयी जो राग वाटतो त्यामुळे मुसलमानांवर विश्वास टाकण्याची आणि त्यांना आपले दोस्त समजण्याची अस्पृश्यांना जणू खोडच जडली आहे. मुसलमानांना आपले राजकीय हित साधण्यासाठी अस्पृश्यांच्या मदतीची गरज होती. पण त्यांनी स्वतः मात्र अस्पृश्यांना कधी पाठिंबा दिला नाही.

मिस्टर जीना हे अस्पृश्यांच्या बाबतीत नेहमीच दुटप्पीपणाचे डाव खेळत आलेले आहेत. ज्यावेळी अस्पृश्य ही मुसलमानांप्रमाणेच हिंदुपासून अगदी वेगळी जमात आहे असे भासविणे त्यांच्या फायद्याचे असेल त्यावेळी ते अस्पृश्य हे हिंदुपासून वेगळे आहेत असे म्हणत. पण ज्यावेळी ते सोईचे नसे त्यावेळी 'तुम्ही हिंदुच' असे सांगून ते त्यांच्या हितसंबंधावर बिब्बा घालीत. मुसलमान आणि मुस्लिमलीग यांना शक्य तितक्या लवकर सत्ताधारी होण्याची हाव सुटली असल्यामुळे अस्पृश्यांच्या हक्काविषयी ते कधीच सहानुभूतीने विचार करणार नाहीत असे मी अनुभवाने सांगू शकतो." "हैद्राबादचा राजा मुस्लिम आहे. एवढ्यावरूनच निजामाने हैद्राबादवर अधिकार सांगू नये." असे दरडावून 'मुस्लिमलीगला' सांगण्यासही बाबासाहेबांनी कमी केले नाही.

हैद्राबादेत बाबासाहेबांच्या धर्मान्तराच्या कल्पनेला समर्थन करताना अस्पृश्य परिषदेत म्हटले गेले की, "या संस्थानातील प्रबळ मुसलमानी धर्माने ब्राह्मणी धर्माचे त्याज्य स्वरूप अंगीकारले आहे. अस्पृश्यता हे धर्माचे न्याय्यत्व पूज्य मानून सार्वजनिक जीवनातून अस्पृश्यांची हकालपट्टी केली. हिंदू धर्माची देवळे तर राहू द्या, पण निजाम

सरकारने बांधलेल्या विहिरी आणि धर्मशाळा येथेसुद्धा त्यांना मज्जाव करण्यात येतो..... आम्ही वेरूळ येथे देवळात व तळ्यात जाण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मुसलमानांच्या मदतीनेच ब्राह्मणांनी आम्हास विरोध केला. कारण मुसलमानी धर्मावर ब्राह्मणी धर्माची बसलेली पकड होय. कोणत्याही संस्थांनापेक्षा येथील अस्पृश्यता अधिक तीव्र आहे. इतकेच नव्हे तर ती जास्त हिडीस स्वरूपाची आहे. हे वास्तव ज्ञात असल्यामुळे बाबासाहेबांनी स्पष्ट घोषणा केली की, गांधी जिन्ना यांच्यात होणारा करार त्यांना मान्य होणार नाही."

"Dr. Ambedkar made a pointed reference to Gandhi-Jinnah talks going on in Bombay. He was not concerned with what the two leaders agreed or differed on ...... No agreement would be binding on them unless and untill the entire S.C. and accepted it."

बाबासाहेबानी पंडित नेहरुंना पत्र लिहून अस्पृश्यांना पाकिस्तान व हैद्राबादच्या अत्याचारांतून सोडविण्याची विनंती केली. नेहरूजींनी बाबासाहेबांना उत्तर लिहून कार्यवाहीचे आश्वासनही दिले. बाबासाहेबांचा सगळा जीव मराठवाड्यात गुंतून पडला होता. ते म्हणत, "मी खेड्यातील लोकांसाठी काही करू शकलो नाही. आता उर्वरित आयुष्य त्यांच्यासाठीच घालवीन." आणि असे म्हणत ढसाढसा रडत. तेव्हा त्यांच्या नजरेसमोर मराठवाड्याचे चित्र नक्कीच उभे राहत असेल. एके ठिकाणी बाबासाहेब म्हणतात,

"I am greatly worried about Marathwada. The Nizam had criminally neglected this area. He took no interest in it. There is not a mile of canal irrigation in Marathwada. People are not only down and out, they are ignorant. They are being grabbed by highly advanced people on both sides."

मराठवाड्याचे कृषिविषयक मागासलेपण आणि शैक्षणिक अज्ञान बाबासाहेबांना बोचत असे. १९४७ सालानंतर मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठ मागितले गेले. १२ डिसेंबर १९५४ ला मोमीनाबाद म्हणजे अंबाजोगाई येथे मराठवाडा शिक्षण संकलन समितीने स्वतंत्र विद्यापीठाची मागणी केली. मार्च १९५६ मध्ये या मागणीवर जोर देण्यात आला. ९ ऑक्टो. १९५६ ला राष्ट्रीय नियोजन मंडळाला सादर केलेल्या निवेदन व मागणीला बाबासाहेबांनी जाहीर समर्थन दिले. जानेवारी १९५७ मध्ये यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री म्हणून दौरा करीत असताना पुन्हा मागणी रेटण्यात आली. ५ मे

१९५८ ला राज्यपालांची सही झाली. पहिले कुलगुरू श्री. एस.आर.डोंगरकेरी आणि पहिले रजिस्ट्रार प्राचार्य म.भि. चिटणीस झाले. मराठवाडा विद्यापीठाचे स्वप्न बाबांच्या महापरिनिर्वाणानंतर साकार झाले. ३ ऑगस्ट १९५८ ला पं. जवाहरलाल नेहरूंनी मराठवाडा विद्यापीठाचे उद्घाटन केले. बाबासाहेब शिक्षण विषयक महत्व विशद करीत म्हणतात, ''हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्व किती आहे ते मी जाणतो.''

''खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते,पण ही चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न वस्त्र निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्चवर्गाची सेवा करायला लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन निर्दयपणे लुबाडण्यात आले आहे, त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे याची जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यांवर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे.'' राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या उपस्थितीत बाबासाहेबांनी सर्व अहवाल कथन करताना म्हटले, ''या (मिलिन्द) कॉलेजमध्ये मुलांबरोबर मुलीही शिक्षण घेत आहेत. येथे सर्व जाती धर्माच्या मुली शिक्षण घेत आहेत. मुलींनी शिक्षणाला उत्तेजन मिळावे व मोठ्या संख्येने त्यांनी कॉलेजमध्ये यावे म्हणून शहरापासून कॉलेजपर्यंत येण्याकरिता एक बसही कॉलेजने ठेवली आहे. या कॉलेजचे द्वार सर्व धर्मीयांना मोकळे आहे. येथे कोठल्याच प्रकारची जातीयता नाही. प्राध्यापकवर्गात सर्व धर्माचे आणि जातीचे प्राध्यापक आहेत. विद्यार्थ्यांत विद्या, विनय आणि शील बाणवणे हे कॉलेजचे ध्येय आहे. अस्पृश्य आणि मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे हे कॉलेज खास लक्ष पुरविते. खालचा वर्ग व वरचा वर्ग यांच्यातील संभाव्य संघर्ष टाळावयाचा असेल तर सर्व कॉलेजांनी हेच करायला पाहिजे.'' कॉलेजच्या उभारणीची साद्यंत माहिती देताना बाबासाहेब म्हणतात, ''सोसायटीने शहरापासून अडीच मैल अंतरावर १५५ एकर जागा खरेदी केली आहे. या जागेभोवतालचे दृश्य रमणीय असून लगतच पोहण्याची व बोटिंगची जिच्यात व्यवस्था आहे अशी औरंगाबादेतील सुप्रसिद्ध पाणचक्की आहे. सोसायटीने मोठी धोंड शिरावर घेऊन हे कॉलेज सुरू केले. ती धोंड किती आहे याची कल्पना फार थोडक्यांना आहे. शेड्यूल्ड कास्टस् ट्रस्ट फंडातून १२ लाख रुपये कर्ज घेतले आहे. कर्ज बिनव्याजी आहे. वार्षिक ५० हजार या हप्त्याचे हे कर्ज फेडावयाचे आहे. आतापर्यंत उपकरणे व फर्निचर यांवर तीन लाख रुपये खर्च झाले

अनुक्रमणिका

आहेत. ९ लाख हातात शिल्लक राहतात. इमारतीसाठी वीस लाख लागतील. साधारणपणे ११ लाखांची तूट येते. बाबांनी आरंभिलेल्या महाविद्यालयाला सरदार वल्लभभाई पटेल, गोपाळस्वामी अय्यंगार व रामकृष्णराव यांच्यासारख्यांनी भेटी दिल्या. १२ लाखांचे अनुदान निजामाकडून घेतल्याबद्दल काही नतद्रष्ट बाबांना दूषण लावण्याचा अश्वलाघ्य प्रयत्न करतात. परंतु त्यांनी सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न न केलेलाच बरा. हे कर्ज 'शेड्यूल्ड कास्ट ट्रस्ट फंडा'तून मिळाले होते. दलितांच्या शैक्षणिक आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी मद्रास सरकारप्रमाणेच एक कोटी रुपयांचा 'डिप्रेस्ड क्लासेस वेलफेअर फंड' उभारण्याचा निर्णय १ एप्रिल १९४७ ला घेतला. 'पोलीस ॲक्शन नंतर' फंडाचे नाव बदलून 'शेड्यूल्ड कास्ट ट्रस्ट फंड' असे ठेवण्यात आले. या फंडाच्या विनियोगासाठी स्थापन केलेली जुनी समिती विसर्जित केली गेली. नवीन समितीत शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या पाच नेत्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यात हैद्राबाद राज्य सरकारचेही काही प्रतिनिधी होते. १ डिसेंबर १९४८ पासून नागरी प्रशासक श्री. एम.के.वेलोडी यांचे अंतरिम मंत्रिमंडळ सत्तेवर आले. तत्कालीन स्टेट शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष जे.एच.सुब्बय्या हे शेड्यूल्ड कास्ट फंड समिती आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सदस्य होते. त्यांच्याच पुढाकाराने ट्रस्ट बोर्डाचे पदसिद्ध अध्यक्ष आणि हैद्राबाद सरकारचे अर्थमंत्री सी.व्ही.एस.राव व पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये २३ मे १९५० ला लेखी करार होऊन १२ लाखाचे कर्ज मंजूर झाले. १९ जून १९५० पासून औरंगाबादला हे मिलिंद महाविद्यालय सुरू झाले. तत्पूर्वी हेच कॉलेज हैद्राबादला काढण्याचा प्रस्ताव होता. तो डॉ. बाबासाहेबांनी नाकारला. १७ सप्टेंबर १९४८ ला 'पोलीस ॲक्शन' समाप्त झाली. म्हणजेच बाबासाहेबांना कर्ज राज्यसरकारकडून मिळाले. निजामाकडून नाही. निजाम तेव्हा जिवंत होता पण सरकार किंवा सरकारात नव्हता. ह्या कर्ज मंजुरीसाठी तशा आशयाचे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले. त्यावर चर्चा झाली. वेलोडी मंत्रिमंडळाने कर्जमंजुरीला एकमुखाने मान्यता दिली. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत कोनशिला समारंभात बाबासाहेबांनी माजी शिक्षणमंत्री धोंडीराजबहादूर, मुख्यमंत्री एम.के.वेलोडी, विद्यमान शिक्षणमंत्री बी.रामकृष्णराव, ट्रस्टफंडाचे सेक्रेटरी एम.ए.आबासी इत्यादींचे अंतःकरणपूर्वक आभार मानले. त्यातही अलिकडचा सज्जड पुरावा म्हणजे मिलिंद कॉलेज व पी.ई. सोसायटीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त पंतप्रधान इंदिरा गांधींनी दहा लाखांची देणगी दिली आणि ते जुने १२ लाखांचे कर्जसुद्धा माफ करून दिले. याचाच अर्थ असा की बाबासाहेबांनी निजामाकडून एक छदामही कर्जापायी घेतला नव्हता हे स्पष्ट होते.

निजामसरकार खालसा :-

अशा प्रकारचा इतिहास असलेले हे संस्थान विलिनीकरण करताना त्यांचे नेतृत्व गृहमंत्री लोहपुरुष सरदार पटेल यांचेकडे होते आणि बाबासाहेब हे कायदेमंत्री होते. डॉ. फडक्यांच्या भाषेत बाबासाहेबांना 'पटेलांचा माणूस' म्हणून पाहिले जाई. धनंजय कीर म्हणतात, युनो पुढे प्रतिवाद करण्यासाठी यत्किंचितही जागा राहणार नाही अशा रीतीने कारवाई करणे आवश्यक होते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याचा मागोवा घेणे जरुरीचे होते, म्हणून सरदार पटेल हैद्राबाद संस्थानच्या प्रश्नाबाबत डॉ. आंबेडकरांशी वारंवार चर्चा करीत असत. निजामच्या हैद्राबाद संस्थानाविरुद्ध भारत सरकारने जेव्हा पोलीस कारवाई केली तेव्हा डॉ. आंबेडकरांनी त्या कारवाईचे प्रमुख गृहमंत्री सरदार पटेल यांना मोठ्या नेटाने पाठिंबा दिला. याची खात्री श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी सरदार पटेलांना २३ सप्टें. १९४८ ला लिहिलेल्या पत्रावरून होते.

"My dear Sardarji, I am, as I told you the other day, I would very much like to be present at the cabinet meeting when a decision on Hyderabad is taken. If the meeting takes place before Tuesday, I hope you will send me a telephonic message so that I may come to Delhi at once. I enclose a copy of a letter I am writing to Panditji about this. Dr. Ambedkar will also return to Delhi on Monday afternoon."

यावरून हैद्राबाद कारवाईत बाबासाहेबांचा सहभाग स्पष्ट होतो. डॉ. य.दि.फडके म्हणतात, "पं. जवाहरलाल नेहरूंनी मात्र काही नेत्यांच्या दडपणामुळे हैद्राबादच्या विघटनाला केवळ अनिच्छेनेच मान्यता दिली. याउलट हैद्राबादचा इतिहास आणि भूगोल पाहता निजाम स्वतंत्र राहणे शक्यच नाही असे स्पष्टीकरण त्यावेळी बाबासाहेब आंबेडकरांनी सरदार पटेलांना छातीठोकपणे दिले होते."

२१ मार्च १९४८ ला माऊंटबेटन भारत सोडून गेले. श्री. राजगोपालाचारी भारताचे गव्हर्नर जनरल झाले. नंतर इंग्रजलष्करप्रमुख श्री अचिनलेक गेले. त्यांच्या जागी जनरल करिअप्पा भारताचे सरसेनापती झाले. हैद्राबाद आर्थिक कोंडीत सापडले. निजामाचे नाणे बेकायदा (रद्द) ठरविण्यात आले. निजामाला आता बिनशर्त शरणागतीशिवाय पर्याय नव्हता. तेवढ्यात त्याच्याच हद्दीतील नानज २६ जुलै १९४८ ला भारत सरकारने ताब्यात घेतले. निजामाचा विरोध निरर्थक होता. नंतर कासिम रजवी व हैद्राबादसंस्थान सरसेनापती एल. इद्रस यांनी लढण्यात असमर्थता जाहीर केली. ११ सप्टें. ४८ ला बॅ. जीनांचा मृत्यू झाला त्यामुळे पोलीस कारवाई पुढे ढकलण्याचा पं.

अनुक्रमणिका

नेहरूंनी प्रयत्न केला. परंतु लष्कराला आदेश आधीच गेले होते. १२ सप्टें. ४८ ला मध्यरात्री १.३० वाजता भारतीय सैन्य सोलापूर, औरंगाबाद, रायचूर, मार्गे हैद्राबाद संस्थानात घुसले. ही कारवाई जनरल राजेन्द्रसिंहजी (साउथ कमांड) च्या नेतृत्वाखाली झाली. १७ सप्टें. ४८ ला निजाम लष्कर शरण गेले. १९ सप्टें. ४८ ला रझाकारी सेनाप्रमुख कासीम रजवींना अटक झाली. लायकअली पाकिस्तानात पळून गेला. मंत्रिमंडळातील मंत्र्यांना स्थानबद्ध केले गेले. पोलीस कारवाईच्या काळात अहमदनगरमधील महार रेजिमेंटच्या शूर सैनिकांनी मेजर ठाकूरसिंह संधू यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्यात मोलाची कामगिरी पार पाडली. त्यानंतर जनरल चौधरी राज्यपाल म्हणून हैद्राबादचे प्रमुख बनले. व भारतात हे काळे संस्थानी सरकार विलीन झाले. (डॉ. तरवडे, डॉ. आंबेडकर व हैद्राबाद पृ. ५] बाबांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सिंहाचा वाटा आहे. हे नाकारणे म्हणजे कृतघ्नतेचा कळस गाठणे होय.

हैद्राबाद संस्थान स्वातंत्र्य लढ्यास दलितांचे योगदान :

बाबासाहेब आंबेडकर आणि दलितांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला सतत मदतच केली. संस्थानाविरुद्ध लढणाऱ्या कोल्हापूर प्रजापरिषदेला बाबांनी समर्थनच दिले होते. १८९८ च्या बीडच्या उठावात मांग, कैकाडी, तरुणांसह धेड, मागीया मांग, आणि येशा धेड्यांनी भाग घेतल्याबद्दल निजामाने त्यांना शिक्षा ठोठावल्या होत्या. (स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश - पृ. ४३६-३७) उमरी बँक प्रकरणात महारमांगावर सरकारने खटले भरले होते. हैद्राबादी आंबेडकर बी.एस. व्यंकटराव ह्यांनी त्यांना मुक्त केले. (कुरुंदकर हैद्राबादचे विमोचन पृ. १८९-९०) हणमंता साधू गायकवाड, कोंडिबा टेकाळे (लातूर) भाऊसाहेब मोरे (औरंगाबाद) लक्ष्मणराव हाटकर नांदेड, माधवराव महावळे यांनी वंदेमातरम् चळवळीत भाग घेतला. कुरुंद येथील दलित सुदाम याच्या कार्याची स्तृती नरहर कुरुंदकरांनी केली. म्हणूनच तर रजाकारांनी महार-मांग लोकांना छळले. कल्लाळीच्या महारांनी रजाकाराविरुद्ध झुंज दिली तिला तोड नाही. प्रा. नरेन्द्र गायकवाड यांनी तर प्रत्यक्ष मुलाखती घेऊन जिल्हानिहाय दलित स्वातंत्र्यसैनिकांची विस्तृत यादी आपल्या 'मराठवाड्यातील दलित चळवळीत' दिली आहे. २० सप्टें. १९४४ ला डॉ. बाबासाहेब निजामाच्या हैद्राबादेत गरजत म्हणाले, "अस्पृश्य वर्ग हा एक समाजाचा स्वतंत्र घटक आहे. सत्य विविध स्तरातील दलितांनी आपल्या कृतीने सिद्ध केले."

दलितांना सरकार व समाजात वावरणे किती कठिण होते, हा प्रसंग पाहा

समाजवादी जनराज्याचे सरसेनापती अमृत गडकरी म्हणतात, एकदा कमलाकांत सोनुले हा दलित सैनिक सर्वांना जेवण वाढायला लागला तेव्हा नांदेडच्या होळीवरचे

ब्राह्मण सैनिक पंगतीतून उठून गेले. सरसेनापती रागाने गरजले, "तुम्ही जेवण घेत नसाल तर बंदुकीच्या गोळीने उडवून टाकीन." लगेच सैनिक जेवायला बसले. कमलाकांत सोनुले व हरिहर सोनुले हे अस्पृश्य श्यामराव बोधनकर यांच्याकडे वास्तव्य करीत. समाजवादी श्री नागनाथ परांजपे ह्यांनी प्रा. नरेन्द्र गायकवाड यांना सांगितले की देशमुख मराठ्यांकडे केळीच्या पानावर जेवल्यावर आपली पत्रावली स्वतःच मला फेकावी लागे. परांजपे ब्राह्मण होते तरीही खुद्द हरिहरराव सोनुले यांनी खासदार असताना नागपुरात मला सांगितले की, "मी स्वतः हातात बॉम्ब घेऊन उस्मानिया विद्यापीठावर चढलो आणि निजामाचा ध्वज फाडला." अशा अनेक दलित आदिवासी अस्पृश्य स्वातंत्र्यवीरांची नावेच लोकांपुढे येऊ दिली गेली नाहीत. अनंत भालेरावांनीसुद्धा हे पथ्य कटाक्षपूर्वक पाळले. आणि काही असहाय अस्पृश्यांच्या अपवाद उदाहरणांवरून सर्व दलितांचा 'हरिजन रझाकार' म्हणून बदनामी व खेदा केला. यावर श्री के. एम.मुन्शी यांचे मत फारच बोलके व डोळ्यात अंजन घालणारे आहे, 'दोन शतकांच्या गुलामगिरीनंतर संस्थानातील हिंदूमध्ये श्वान मानसिकता विकसित झाली होती. हीच उच्चविद्याविभूषित वर्गातही होती. ते शासकीय कृपाप्रसादासाठी सरड्याप्रमाणे रंग बदलत. निजामी सत्तेची प्रशंसा करीत. राजनिष्ठेचे प्रदर्शन करून नोकऱ्या मिळवीत. रझाकारांना साथ १०-२० महारांपेक्षा निजामी शासनाचे सेवक असलेल्या हजारो उच्चवर्णीय हिंदूंनीच दिली. पोलीस कारवाईपर्यंत त्यांच्याच सहकार्याने रझाकारांचे आश्रयदाते जे निजामी शासन ते सुरळीत चालले होते. (चिटणीस म.भि. नामांतराविरुद्ध अत्याचारी आंदोलन पृ. ५-६) सहावा निजाम मीर मेहबूब अलिखान याला हिंदू लोक श्री. माणिक प्रभूचा अवतार समजत.' (गोळेगावकर श्री. के. तेच आव्हान - तीच माती पृ. ३६)

यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पोलादी पुरुषार्थाचे आगळे वेगळे दर्शन घडते. त्यांचा राष्ट्रीय बाणा किती कणखर आणि प्रखर होता याची जाणीव त्यांच्यावर चिखलफेक करणाऱ्या दिवाभीतांच्या मनात जागृत झाली तर या प्रयासाचे सार्थक होईल.

- प्रा. डॉ. भाऊ लोखंडे
वैशाली वन, मॉडेल टाउन, नागपूर

अनुक्रमणिका

कविता...
कविता...
कविता...

प्रतिबिंब

आज मी माझ्या मनाच्या वाटेवर
स्वतःलाच शोधण्यासाठी चालू
लागलो
बराच काळ लोटला पण
नुसतीच पायपीट करत राहिलो
माझ्यातला 'मी'
मला कुठेच सापडत नव्हता
एवढा शोध घेऊनही
सारखी हुलकावणी देत होता
एकदा वाटले की
माझ्यातला 'मी' ला मी हरवून बसलो
शोध चालू ठेवावे की मागे परतावे
याच विचारात मी फसलो
तेवढ्यात चालता-चालता वाटेवर
माझे प्रतिबिंब मला दिसले
माझी अशी अवस्था बघून
दिलखुलास हसले.
'का रे बाबा हसतोस ?'
असा प्रश्न मी त्याला केला
त्यावर त्यानेच मला
उलट प्रश्न विचारला
मित्रा सांग बरं मला
फरक तुझ्यातला नी माझ्यातला
का म्हणून मला
वेगळा जन्म घ्यावा लागला ?
मला उत्तर जमेना
मी शेवटी हार मानली
तशी त्यानेच मग मला
माझी ओळख पटवून दिली
तुझ्यातला 'तू' कधी
दाखवत नाहीस कोणाला
वेगवेगळे मुखवटे घालून मात्र

अनुक्रमणिका

कविता... कविता... कविता...

फसवत असतोस प्रत्येकाला
म्हणूनच मला वेगळा
जन्म घ्यावा लागला
तुझ्यातल्या 'तू' साठी
जसा आहेस मुळातच
तसाच नेहमी रहा
तुझ्यातल्या 'तू' ला
एकदा तरी आजमावून पहा
तुझ्यातला 'तू' नंतर
कधी तुझ्यापासून लांब जाणार नाही
आणि तुझ्यातल्या 'तूं' साठी
मला देखील जन्म घ्यावा लागणार नाही
बघ एकदा हे करून
यात वेगळीच मजा असते
आपले प्रतिबिंब अस्तित्वात नसले तरी
तुझ्यातल्या 'तू' ची तुला नेहेमीच साथ
असते.

-मिलिंद मेहेंदळे, मुंबई

अनुक्रमणिका

कविता...
कविता...
कविता...

श्रावणाला पिसे

कडाडली वीज
मृग कोसळला
दिशांनी झेलला
मेघनाद
अलौकिक गंध
दरवळ दाटला
जीव वेडावला
धरित्रीचा
आषाढ गर्जना
भुई ओलीचिंब
आभाळाचे बिंब
काळेभोर
पाऊस पिसारा
स्वप्नं डोळाभर
हिरवं गाभार
ठाईठाई
मातीच्या कुशीत
उसवले दाणे
सृजनाचे गाणे
अंकुरले
नवल गोजिरे
पानोपानी हसे
श्रावणाला पिसे
पावसाचे

- मृणाल चिंचाळकर, नागपूर

अनुक्रमणिका

दुःखाचा फकीर

प्रा. विश्वास जाधव

'सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ।।' ही संत तुकारामांची दुःखविषयक जीवनानुभूती, तुकारामांनी दुःख स्वीकारले, अनुभवले आणि मनस्वी भोगले सुद्धा ! इथे प्रत्येकालाच सुख तेवढे हवे असते; पण दुःख मुळीच नको. केवळ एवढ्यापुरताच सामान्य जनांना त्यांच्या आयुष्यात तुकारामांच्या उपर्युक्त अभंगाचा प्रत्यय येत असावा. सामान्यतः दुःख शापच वाटते सर्वांना; मग व्यथांची कथा कोण स्वीकारणार ? दुःखावर माया कोण करणार ? संत तुकारामांना, प्रस्तुत अभंग, दुःख अनुभवून भोगल्यानंतर स्फुरला आणि आम्हाला तो आपलाच वाटू लागला. खरे तर तुकारामांचे जे दुःख ते आमचेही दुःख कसे ठरू शकणार ? तरीही त्यांचा अभंग आपला वाटू लागतो. मनुष्यस्वभाव हा असाच असतो का ? या सुखलोलुप दुनियेतले 'भाव' वेगळेच आहेत. जाणिवा आणि संवेदनाच बदलून गेल्या माणसाच्या. म्हणूनच तर आपले घाव इथे कसे खपतील ? दुःखाचा भारा इथे कोण बरे घेणार ? असा जीवाला व्याकुळ करून सोडणारा व अंतर्यामी व्यापून उरणारा आर्त प्रश्न ग्रेसांच्या कवितेमधून तळमळताना जाणवतो. सुखाला गोंजारून दुःखाला झिडकारले नाही किंवा

अनुक्रमणिका

दुःखाची कैफियतही ग्रेसांनी मांडली नाही. याउलट

'मी इथे व्यथालयात
दुःख सांगतो तुला' म्हणताना त्यांचे दुःख
'तुझ्या कृपेच्या दुःखामागे

येईन मी अनवाणी' असे शब्दबद्ध होऊन आश्वस्त होते. हा ग्रेसांच्या आत्मनिमग्नतेचा सहजाविष्कार आहे. कृपावंताच्या कृपाप्रसादातून दुःख फळाला आले; असे समजून त्या कृपायुक्त गूढ दुःखामागे 'येईन मी अनवाणी' असे कृपावंतालाच ग्रेस आश्वासन देऊन 'ती' दुःखकृपा भोगत असतात. 'बहारात दुःख अनवाणी' ही ग्रेसांची दुःखधारणा व विलक्षण भावानुभूती आणि त्यातूनच दुःखाचे प्रगाढ चिंतन घेऊन अवतरणारी ग्रेसांची कविता संतकवी तुकारामांच्या आकांताशी नाते जोडणारी वाटते. मरणगंधातला सुगंध ग्रेसांच्याही कवितेत दरवळतो. वाचकांना धुंद करतो. एकप्रकारे ग्रेसांची कविता ही कवीच्या आत्म्याच्या पाताळघरातील काळवंडलेल्या झुंबराला लगडलेली शब्दसंहिता वाटते. हे शब्द व्रतस्थ असल्याने ग्रेसांची खास शैलीदार कविता-

'दुःखाचे बन उधळीत सुटला
मातीवरचा धनवारा
घरात माझ्या ओघळल्या मग
अधरविणेच्या मधुधारा'

असे हृदयंगम दुखरेपण घेऊन अवतरते. ग्रेस दुःखबनातही मधुधारांचा आनंद लुटतात. दुःखाला मिठी मारल्यानंतर दुःखसुद्धा आपल्या मिठीत हसते अशी जगावेगळी अनुभूती त्यांना येते. ही आगळीवेगळी अनुभूती त्यांच्या कवितेला कमालीचे बळ देते. आणि या बळाचा आधार घेत घेत ग्रेसांची कविता अंकुरते, वाढते, बहरते आणि फुलारून फळते. ग्रेसांची व्यथा मग -

'ओंजळीत ही फुले नि
आसवांत पापणी !'

अशी व्यामिश्र वीण घेऊन आविष्कृत होत जाते. कवी दुःखावर डोळे पसरून, अगदी सावधपणे दाराशी बसला असला तरी मोठ्या हुशारीने दुःख कवीच्या घराला येतेच येते-

'मावळतीच्या सरणावरती
निजून आले
उरले सुरले दुःख मनाचे..'

कविमनाने जोजविलेले, निजविलेले खोल दुःख मावळतीला निजून उठते.

अनुक्रमणिका

संध्याकाळी झिरपू लागते. प्रकाशाला काळवंडणारी संध्याकाळी कविहृदयातील दुःख मात्र फुलविताना दिसते. मावळतीचे सरण कविमनातील दुःख जाळून खाक करीत नाही, उलट मावळतीच्या सरणावर निजून येणारे हे दुःख पेटून लखलखीत होते आणि जिवाची शिणलेली मोळी घेऊन कौलारांच्या तांबूस ओळींमधून अंधार-धुक्यात फिरायला निघते. यावेळी तमातील पैंजण हलके होतात. त्यांचा निनाद तंग जिवाला उसवून भावुकता प्रदान करतो. ग्रेसांचा आत्मा संध्याकाळी जागा होतो आणि आपल्यातीलच उगमाकडे पोहचण्यासाठी धडपडतो. हा आत्मा जागी करणारी वेदनाही संध्याकाळी जागी होते. सरणावर प्रेताने निश्चलपणे जळणे ठीक ! पण सजीवाला दुःख बोचणार नाही, सलणार नाही असे कसे ? मग संध्याकाळी ग्रेसांचा आत्मा गाऊ लागतो-

'उन्हे उतरली,
एक सावली
पुढे दिठीवर थेंब नवा
या वळणाशी
दुःख उराशी-'
किंवा -
'पुढे मिटला काळोख -
झाली देऊळ पापणी'

अशा प्रकारे संध्याकाळी आत्मरततेतून 'मऊ सशाचा उखाणा' टाकला जातो. मुळातच ग्रेसांचे कविमन गूढ दुःखाशी रत होऊन विलसत असते. अंतर्नाद उमटू लागतात. संध्याकाळची पार्श्वभूमी घेऊन ही कविता स्वयंप्रकाशाने चमचम करीत लखाखत पदन्यास करते. तीही अगदी अलवारपणे-

'पुढे का उभी तू तुझे दुःख झरते
जसे संचिताचे ऋतू कोवळे-'

गूढ दुःखाचे, अदृश्य शक्तीचे निनाद कविमनाला झंकारणारे आहेत. डोंगरापुढे उभे राहून चंद्र पाहणाऱ्याला चंद्र दिसूच नये, पण चंद्राने मात्र डोंगराआड असावेच असावे ! कविमनातील गूढ घाव असेच आहेत. संचिताचे कोवळे ऋतू बहरविणारे, मोहरविणारे ! सांजवेळी हा दुःखाचा बहर अधिक गहिरा होत जातो. परंतु या गडद दुःखबनात शिरणार कोण ? कारण-

'कोण घेई माझ्या
ओसाडाचा भोग
त्याच्या घरा आग

लागायची.'

असे खुद्द कवीच सांगत आहे. तसेच 'When you have finished with others, that is my time'. असे आत्मनिवेदनापूर्वीच ग्रेस 'चंद्रमाधवीच्या प्रदेशात' लिहून ठेवतात. सांध्यपर्वातील वैष्णवीतसुद्धा प्रार्थनापर्वापूर्वीच त्यांनी वाचकांना सावधानतेचा इशारा देऊन ठेवला आहे- 'Whosoever comes to me should become perfectly aware that it is dangerous to be near me....' एवढा स्पष्टपणे इशारा वाचल्यावर ग्रेसांच्या 'ओसाड भोगवट्याकडे' जाणीवपूर्वक वळण्याचा धोका कोण स्वीकारणार ? या सुखलोलुप दुनियेत दुःखाचे घाव झेलण्यासाठी, स्वीकारण्यासाठी कोणाचेही मन तयार होत नसले तरी अशा जगरहाटीपासून ग्रेसांनी स्वतःला वेगळे ठेवले आहे. वेगळे कविमन त्यांनी सांभाळले आहे. असे जपलेले व सांभाळलेले वेगळेपण त्यांच्या कवितेतील अर्थसंपृक्तता समृद्ध करीत असते.

'म्हणूनच माझी
दुःखावर माया
वेगळीच काया
हवी मला'

'ओसाड भोग' कवीला दुःखावर माया लावायला भाग पाडतात. इथे स्वाभाविकतेला जाणीवपूर्वकतेची जोड मिळून ग्रेसांची काव्यशैली व्यामिश्र होऊ लागते. ही व्यामिश्रता सुद्धा -

'कुणी पेरले रे माझ्या डोळी भाव
त्याचे झाले घाव काळजाला' अशी लयदार गुंफण घेऊन अवतरते. कातड्यातली, काळजातील मायाच कवीचे आतडे पिळवटून काढते. अज्ञानाच्या वाळूवर जळणाऱ्या अगतिक प्रहरी बाळीच्या विकल उरात काटा सलत असावा त्याप्रमाणे कविमनातील 'खुळे मनोगत' विकल उराला पिळवटून प्रसवू लागते. आईच्या मायेतून कवीला आलेली अनुभूती व अनुभूतीच्या अशा वेगळ्या प्रतीतीमधून ग्रेसांच्या कवितेत दुर्बोधता डोकावू लागते. परंतु यामुळे कवीच्या काव्यवेडाला जराही धक्का बसत नाही. एरव्ही-

'त्या श्रद्धेचे घाव मनावर- घालित यावे तुझे पिसेपण' अशी प्रांजळ व प्रामाणिक मनीषा कविहृदयाने कशी जपली असती सामान्य माणूस श्रद्धेवर जगेल, जगतोही ! पण त्याच श्रद्धेचे घाव मात्र तो स्वीकारेल काय ? की प्राक्तनाला बोल लावेल ? याउलट ग्रेस असे घाव झेलायला अगदी मनस्वी तयारच दिसतात. त्यांचा हा अनाकलनीय स्वभावच त्यांच्या कवितेला दुर्बोधतेचा शालू परिधान करून जात असावा असे वाटते.

'क्षितिज जसे दिसते,

तशी म्हणावी गाणी,
देहावरची त्वचा आंधळी
छिलून घ्यावी कोणी
गाय जशी हंबरते,
तसेच व्याकुळ व्हावे
बुडता बुडता सांजप्रवाही;
अलगद भरुनी यावे.'

अशाप्रकारे भास-आभासाची, सत्य-अतिसत्याची, वास्तव-अतिवास्तवाची व्यामिश्र भावानुभूती म्हणजे ग्रेसांची जन्माला येणारी क्षितिज-गुण समांतर काव्यनिर्मिती होय. गायीच्या हंबरण्यातील व्याकुळता आणि क्षितिजाला भारणारी सांजवेळची आर्तता अशा संमिश्रणातून अलगदपणे वाहणारा ग्रेसांचा काव्यप्रवाह नितांत सुंदर तर दिसतोच, पण अधिकाधिक भावसमृद्ध होऊन आशयघन बनतो. मराठी काव्यनभांगणात ग्रेसांची कविता 'काही कैवल्याच्या ओळी। थोडे भोगाचे चांदणे।' बनून तेजाळत आहे.

जीवननिष्ठा, काव्यनिष्ठा आणि मरणवृत्ती यांच्यातील सुसूत्र संयोजन सांभाळीत स्वप्न व वास्तवाच्या धूसर सीमारेषेवर तरलपणे पदन्यास करणारी ग्रेसांची मोहक कविता कविमनाच्या उत्कट तंद्रीचे दर्शन घडविते. अशा उत्कट तंद्रीच्या अनुसंधानातूनच ग्रेसांची कविता विलक्षण आवेगाने दुःखाच्या काठाने उधाणत जाते. या उत्कट तंद्रीचे निनाद सांजवेळी कलीच्या अंतरालयात निनादू लागतात व मग आत्ममग्न चिंतनातून हळूच उखाणा घातला जातो. कवी व कविमन, व्यक्तित्व आणि कवित्व यांच्यातील व्यवच्छेदक गुंफण वाचकांना निबिड अशा प्रतिमांकित अरण्यात सोडून देते. वाचक-रसिकांना भास-आभासचक्राच्या वर्तुळात चक्रावून टाकते. उत्कट तंद्रीच्या क्षणी विलक्षण मनस्विता अभेद्य ठेवणारी अनुभवप्रतीती हे ग्रेसांच्या दुःखभोगी कवितेचे मुख्य बलस्थान आहे, असे दिसते. तंद्री ढळली तर आयुष्याचा तालही चुकतो याची जाणीव कविमनाला आहे; म्हणूनच तर हा कवी दुःखाला शरण न जाता संगमरवरात स्वप्न लपवता लपवता स्वप्नशिल्प कोरत जातो. दुःखाच्या सर्व कळा, वेणा, वेदना कवी आपल्या आत्म्यात ओतून टाकतो. मग आत्मा व शरीर यांतील द्वैत विरून जाते. ही विलक्षण प्रक्रिया शरीरातले बळ सर्व एकवटून कवी भोगतो. त्यामुळेच ग्रेसांची कविता 'मराठीच्या मर्मबंधातली ठेव' ठरली आहे. या कवितेत व्यक्तिगंधाचे संगीत व शब्दबंधाची लय यांचे संमिलन आहे. तुकारामांच्या कारुण्याची, व्याकुळतेची व आर्ततेची झालर ग्रेसांच्याही कवितेला लाभली आहे. कारुण्याचे आक्रंदन इथे नाही. किंवा आक्रोशाचा आकांतही नाही. मात्र अलवार कारुण्यप्रतीतीची मोहक नजाकत ग्रेसांच्या काव्यशैलीची व

अनुक्रमणिका

काव्यधर्माची शिलेदारी अधोरेखित करते. विलक्षण अंतर्मुख अशा आत्मशोधातून व आत्मपरतेतून साकारणारी ग्रेसांची कविता आभासमय धूसरण व अत्यंत संवेदनशील तरल व्यक्तित्व प्राप्त करते. ग्रेसांच्या मते 'प्रत्येकाच्या आयुष्यात आपले अस्तित्व सिद्ध करून दाखविण्याचा आकांत जन्माला येत असतो. त्यावेळी आपल्यातील विश्वात्मकतेला जागविणारी एक शपथ घ्यावी लागते.' ही शपथच ग्रेसांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होते, तेव्हा ते म्हणतात,

'मी महाकवी दुःखाचा
प्राचीन नदीपरी खोल
दगडाचे माझ्या हाती
वेगाने होते फूल.'

- प्रा. विलास जाधव
कृष्णा नगर, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती.

⌘⌘⌘

कविता...
कविता...
कविता...

आभाळ

निळ्या किनाऱ्याचं
आभाळ,
खुललेलं
फुललेलं
आभाळ
पाखराचं अंगण
खुललेला वारा
नहालेलं कोवळं ऊन
आभाळ !,
ओल्या ढगांचं गाणं.
आभाळ !,
दळणाऱ्या म्हातारीचं
गाव.
बालपणीच्या
कहाणीचं
एक आभाळ !!

मेंदीचे हात

मेंदीचे हात
ओल्यानक्षीचं जाळं
पायाशी हिरवाईचं
तळं....
तळयाच्या पाण्यात
झाडाचं प्रतिबिंब
डोळयात तुझ्या
मेंदीचा रंग....
स्वप्नांच्या राज्यात
बांगड्याची किणकिण
पापणीवर तुझ्या
लाजेची रिमझिम.

अनुक्रमणिका

कविता...
कविता...
कविता...

सोनचाफा

सोनचाफ्याची फुले
खुडताना
तुझे हात
सुगंधित होतील
धुऊ नकोस हात
तुझ्या हातावर
ओठ टेकताना
परत
सोनचाफा
फुलेल.

- वैजयंती कुळकर्णी
कोल्हापूर

अनुक्रमणिका

प्रतिद्वंद्वी

दिनकर बेडेकर

(एका मोठ्या बागेतला एक शांत कोपरा. पलीकडे मुलांची खेळण्याची जागा आहे. तिथले आवाज अधूनमधून ऐकू येतात. वेळ-संध्याकाळ. गजबज पलीकडे असल्यामुळे इकडे एकप्रकारचा आळसटलेपणा. स्त्री १ बाकावर बसली आहे. वय पस्तीस. रुपानं उजवी. राहणी- आधुनिक. हातात रंगीत फॅशन मॅगझीन. अधूनमधून ती त्याची पानं उलटते, किंवा सरळ समोर कुठेतरी दृष्टी लावून बसते. एवढी एक गोष्ट वगळली तर अस्वस्थतेची खूण तिच्या वागण्यात नाही.

काही क्षण असेच जातात.

नंतर स्त्री २ येते. समवयस्क. आधुनिक राहणी आणि संसारी घरगुतीपणा ह्याचं मिश्रण तिच्यात आहे. वागण्यात बोलण्यात लगबग, एक्साइटमेंट. तिच्या हाती पर्स, शॉपिंग बॅग्ज् वगैरे.

प्रवेश करताच तिचं लक्ष स्त्री १ कडे जातं. क्षणभर ती थबकते. पण पुन्हा त्याच उत्साहाने स्त्री १ जवळ जाऊन उभी राहते. तिचं लक्ष जाईल ह्याची वाट पाहते. शेवटी न राहवून स्वतःच संभाषण सुरू करते.)

अनुक्रमणिका

स्त्री २ :- (नाटकीपणाने) मी इथे बसले तर चालेल न ?

(स्त्री १ चं तिच्याकडे लक्ष जाते. ती क्षणभर तिच्याकडे पाहते. मग बसल्या जागी किंचित सरकून, सावरून बसते. नजर हट्टानं मासिकात. स्त्री २ शेजारी बसते. बरोबर आणलेल्या बॅगूज् वगैरे नीट ठेवते. रुमालानं चेहरा टिपते.)

स्त्री :- (स्वतःशीच) दमला बाई जीव ! एवढ्या गर्दीत त्या मार्केटमध्ये हिंडणं म्हणजे-

(विराम. स्त्री २, स्त्री १ कडे वळून पहाते. तिची नजर हट्टानं मासिकातच.)

स्त्री :- ओळखसुद्धा द्यायची नाही असं ठरवलंय वाटतं ?

(स्त्री १ मासिकातून नजर काढते. शांतपणे मासिक बंद करते. स्त्री दोन कडे मोहरा वळवते. तिच्या नजरेला नजर भिडवते.)

स्त्री १ :- (भावनाहीन स्वरात) हलो !

(विराम. तिची रोखलेली नजर स्त्री २ ला असह्य होते. तिच्या रिस्पॉन्सचा आधार घेऊन ती संभाषण पुढे ढकलते.)

स्त्री २ :- तू, इथे, ह्यावेळी भेटशील असं वाटलं नव्हतं.

(स्त्री १ चं उत्तर नाही. नजर तशीच रोखलेली.)

स्त्री २ :- म्हणजे अशी - एकटी - मला नाही बाई पाहवत संध्याकाळचं कोणी असं एकटं, गुपचुप बसून राहिलेलं - मलाच उदास वाटतं.

(स्त्री १ फक्त नजर वळवते. मासिक उचलते.)

स्त्री २ :- एवढं काही एकदम रागवायला नको - खरंच, मला नाही सहन होत-

(स्त्री १ चं उत्तर नाही.)

स्त्री २ :- कुठलं आहे मासिक ? परदेशी दिसतंय. अजून तुझा तो नाद कायम आहे वाटतं ? फॅशन मॅगझीन्स वाचत राहायचा - पूर्वी पण किती वाचायचीस -

(स्त्री १ मासिकातली नजर वळवून सरळ समोर पाहू लागते.)

स्त्री २ :- एकटीच आली आहेस ?

(स्त्री १ तिच्याकडे वळून पहाते.)

स्त्री २ :- सॉरी.

(विराम. स्त्री १ पुन्हा मासिक वाचू लागते. स्त्री २ अस्वस्थपणे तिच्या शेजारी बसून राहते.)

स्त्री २ :- आमच्याकडेही जमा होत असतात गठ्ठे. अमर आणत असतो न सतत. आणि मग मला आग्रह. हे वाच. ते वाच. मला इतका कंटाळा येतो. एकतर इंग्रजी आणि तेही कठीण. पानभर वाचलं की झोप यायला लागते मला. मग चिडतो आणि तो तसा

चिडला की मला हसू यायला लागतं. मग निघून जातो खोलीतून. पूर्वी निदान फॅशन फोटोग्राफ्स तरी पहायची मी. काही ड्रेसेसही डिझाईन केले होते त्यात पाहून. पण आता ह्या दोघांमागे धावण्यातच इतका वेळ जातो. अभिला तर सारखी मी हवी दिमतीला. मी म्हटलं त्याला अरे, आता दहा वर्षांचा झालास तू. आता जरा इंडिपेन्डन्ट हो. पण नाही. बाप आणि मुलगा दोघंही माझ्यावर इतके डिपेन्डन्ट आहेत न अगदी. कधीकधी त्रास होतो. पण समाधानही वाटतं न. आपण कुणासाठी तरी काही करतोय, कुणाला तरी आपली गरज आहे. (विराम) तुला अगदी आवडत नसेल न माझं हे बोलणं.

(स्त्री १ तिच्याकडे पाहते. पुन्हा नजर वळवून समोर पाहू लागते.)

स्त्री २ :- किती वर्षांनी भेटलो नाही आपण ? (विराम) माझं एक जाऊ दे. पण अमरलाही भेटावंस वाटलं नाही कधी ? (स्त्री १ तिच्याकडे रोखून पाहू लागते.) अमरपण कधी नावसुद्धा काढत नाही तुझं. ओझरता उल्लेखसुद्धा नाही. सुरुवातीला मीच विचारत राहायची. शेवटी एकदिवस वर्मी घाव घातल्यासारखं तट्‌कन तोडूनच टाकलं त्यानं तेव्हापासून. (विराम) मग मलाच गिल्टी वाटत राह्यलं. मग त्यानंच सावरलं स्वतःला. पण ते काही दिवस. बाई ग ! आठवण झाली तरी शहारा येतो अंगावर. तासुनतास मख्खपणे बसून असायचो आम्ही. तो पुस्तकात डोकं खुपसून आणि मी त्याच्यासमोर रडायचीही चोरी. (आठवणीनं हसते) तेव्हा अगदी ठरवलंही होतं मी की तुला भेटायचं आणि तुम्हा दोघांना एकत्र आणून मी निघून जाणार होते तुमच्या आयुष्यातून. (हसते आणि नकळत डोळे टिपते) खरंच बघ न. तुमचं लग्न झालं असतं तर आज माझ्याजागी तू असतीस आणि मी. (स्त्री १ तिच्याकडे पाहते. क्षणभर मग नजर पुन्हा मासिकात. विराम) जे घडलं त्यात सगळा दोष माझा एकटीचाच होता असं अजूनही वाटतं तुला ? खरं तर तुझी आणि अमरची भेट मी घालून दिली. अगदी पहिल्या भेटीत तर त्यानं धड पाहिलंही नव्हतं तुझ्याकडे. तुम्हा दोघांमध्ये काहीच बोलणं होईना तेव्हा मलाच ऑकवर्ड वाटायला लागलं. नंतरही तुला वाईट वाटू नये म्हणून किती धडपड माझी ! तरीही तुझा विषय काढला की तो विषय बदलायचा. मला कळायचंच नाही त्याचं वागणं. अशातच एक दिवस अचानक तुझी एंगेजमेंट झाली आणि मग सगळंच बदललं. पुढे आम्ही लग्न केले. संसार सुरू झाला. त्या धावपळीत मधेच कधीतरी तुझी आठवण यायची पण विसरलीही जायची. तसं सुखातच चाललं होतं ग सगळं. -एकदिवस अचानक तू परतलीस-अमर बरोबर घरी आलीस तर आधी मला सुचेचना काही. तू मात्र अगदी शांतपणे वावरत होतीस. अगदी निघताना मात्र अभि समोर आला तेव्हा (विराम) आज सगळं उलगडतंय मला. त्याला जवळ घेतानाचा तुझा चेहरा तेव्हा काही विचारच केला नव्हता मी. नंतरही नाही. आता ह्या क्षणी अचानक अर्थ लागतोय मला सगळ्याचा.

(विराम. स्त्री २ किंचित तिच्याजवळ सरकते)

स्त्री २ :- एक सांगू तुला ? तू आपली एंगेजमेंट तोडायला नको होतीस ! थोडं समजुतीनं वागली असतीस तर आज तुझंही एक घर राहिलं असतं. संसार-मुलंबाळं- एकटेपणाचा विखार करपवून टाकतो ग आयुष्य ! दिवसभर भोवती लोक असतात तोवर बरं वाटतं पण रात्री घरी पोचले आणि दार उघडून दिवा लावला की ते रिकामं घर अंगावरच येतं एकदम ! मग उरलेली अख्खी रात्र स्वतःला समजावत काढायची त्यापेक्षा कल्पना कर नं - आपण घरी पोचतो तेव्हा आपली वाट पाहणारं कुणीतरी -मग कधी भांडण- तक्रारी -हट्ट.

(स्त्री १ मासिक मिटते. जाण्यासाठी उठू लागते. स्त्री २ तिला थांबवते.)

स्त्री २ :- सॉरी ! मला दुखवायचं नव्हतं तुला. आपण दुसरं काहीतरी बोलू या. प्लीज.

(स्त्री १ नाइलाजानं बसते. विराम.)

स्त्री २ :- (शेजारी ठेवलेल्या शॉपिंग बॅग्ज् जवळ ओढते.) किती छान छान कपडे असतात नाही हल्ली. हा बघ अभिसाठी टी-शर्ट घेतला. (स्त्री १ फक्त नजर वळवते) आणि बघ नं टेक्स्चर बघ. किती छान आहे नाही ? आणि हे शूज. काय हल्ली ते नवीन 'सायलेन्सर्स' म्हणे ! आणि ही (एका बॅगमधून रिव्हॉल्वर काढून स्त्री १ वर रोखते. स्त्री १ अवाक्)

स्त्री २ :- घाबरलीस नं तूही ? किती खऱ्यासारखं दिसतं नाही ? काय आजकालच्या मुलांना ही असली खेळणी आवडतात.

(स्त्री १ अजूनही तशीच. स्त्री २ तिची अवस्था पाहून हसू लागते.)

स्त्री २ :- एवढं काय झालं घाबरायला ? तुला काय वाटलं की मी आता तुला गोळी घालून ठार मारणार ? एकवेळ तुझ्या मनात येतही असेल तसं काही. क्षणभर वाटलंही असेल की माझ्या हातून हे रिव्हॉल्वर हिसकून घ्यावं आणि (स्त्री १ काहीतरी बोलणार असते. ती वाक्याची अस्फुट सुरुवातही करते. पण स्त्री २ तिचे बोलणं अर्धवट तोडत पुढे बोलू लागते.)

स्त्री २ :- मला समजतंय ग सगळं.

(स्त्री १ तिच्यावरून नजर काढून दुसरीकडे बघू लागते. चेहऱ्यावर संताप, विषाद, अगतिकता)

स्त्री २ :- आणि हे स्लीपर्स - खास अमरसाठी. एका बॅगमधून नक्षीदार चढाव काढते. खरं म्हणजे मला अगदी आवडत नाही हा प्रकार पण त्याला असलेच हवे असतात. पुरुषांच्या चढावावर इतकं जरीचं नक्षीकाम विचित्रच दिसतं नाही ? (ते चढाव

अनुक्रमणिका

जबरदस्तीने तिच्यापुढे करत.) किती छोटसं पाऊल आहे नं अमरचं आणि चालही तशीच नाजुक, हलकेच पावलं टाकत. मी दाणदाण पावलं आपटत चालते म्हणून वैतागतो तो माझ्यावर आणि चिडला की इतका गोड दिसतो नं. अशा माणसाला कोण घाबरणार ? पण मग नाटक करावं लागतं. बरं, चिडण्याची कारणंही इतकी नमुनेदार असतात. क्वचित कधी वरच्या टाकीतलं पाणी संपलं, वीज गेली, फोन डेड झाला की गेलं ह्याचं डोकं. मग चडफडत जाऊन पंप चालू करणार किंवा वीज गेली की फॉल्ट सेंटरला दहादा फोन. एवढं करून कामं व्हायची तेव्हाच होतात. पण तोवर इकडे थयथयाट चालू असतो नुसता आणि आता एक नवीच डोकेदुखी सुरू झालीय. अभि त्याच्या वस्तू घेतो. त्याची पेनं, कागद, डायरीज्. मग आरडाओरडा बापलेकात अबोला. मग मलाच 'पीस कीपिंस फोर्स' चं काम करायला लागतं. (स्त्री १, पहिल्यांदा न राहवून हसते.)

स्त्री २ :- खरं म्हणजे त्याच्या पाठी त्याची अशी टिंगल करणं बरोबर नाही हं.

(स्त्री १ चं हसू मावळतं. स्त्री २ च्या चेहऱ्यावर सूक्ष्म समाधान)

स्त्री २ :- काहीकाही हट्ट मात्र मजेदार असतात त्याचे. एक काय तर आम्ही दोघांनी हॉर्लिक्सच प्यायले पाहिजे. तेही दिवसातून तीनदा ग्लासभर. अभी लहान होता तेव्हा प्यायचा पण मग कंटाळा करायला लागला. शेवटी रडून ओरडून त्याने सुटकाही करून घेतली स्वतःची. मी मात्र अडकले ! भरीला त्याची शिस्त. घरात धुळीचा कण असता कामा नये. सोफ्यात बसतानासुद्धा टीपॉयच्या काचेवर बोट फिरवून पाहणार. बोटाला धूळ लागली की खैर नाही. कपड्यांच्या बाबतीतही तेच. घरीच असला तरी कुणी भेटायला आल्यावर हा व्यवस्थित प्रेझेंटेबल होऊनच ड्रॉईंग रूममध्ये जाणार. तुला सांगते, मला इतका ताप व्हायचा सुरुवातीला. हळूहळू अंगवळणी पडलं सगळं. त्याबाबतीत अभी बापाच्या वळणावर गेलाय. आजकाल अगदी अतीच झालं तर काही बाबतीत दोघं मिळून ही एक वेडी बाई आहे. म्हणून माझ्याकडे दुर्लक्ष करतात.

(स्त्री १ पुन्हा हसते. किंचित खिजवल्यासारखं.)

स्त्री २ :- म्हणून मघाशी म्हटलं नं मी, की तुम्हा दोघांचीच जोडी छान जमली असती. तुला चांगल जमलं असतं ते टिपटॉप, जेवढंतेवढं वागणं. मलाही आता साधतं, पण मनातून आवडत नाही मला. तुला आवडलं असतं.

(स्त्री १ तिच्या बोलण्यातला दंश जाणवून पुन्हा गंभीर होते. विराम. एवढ्यात एक बॉल रंगमंचावर घरंगळत येतो. स्त्री १ तो पकडते. क्षणभर त्याच्याशी खेळते. मग पुन्हा आला त्या दिशेला परत फेकते. विराम.)

स्त्री २ :- खरं म्हणजे हा प्रश्न तुला कधीही विचारायचा नाही असं ठरवलं होतं मी, पण आता विचारते, तुझी एंगेजमेंट झाल्यावर काही महिने तुम्ही दोघं बाहेर एकमेकांना

अनुक्रमणिका

भेटत होता असं माझ्या कानावर आलंय. खरं आहे हे ?

स्त्री १ :- (स्त्री २ कडे वळून तिच्या नजरेला नजर भिडवून, शांतपणे) हो.

स्त्री २ :- माझ्या नकळत ?

स्त्री १ :- हो.

स्त्री २ :- का ?

स्त्री १ :- (खुनशी हसत) मुद्दाम.

स्त्री २ :- कोण पुढाकार घ्यायचं ? अमर ?

स्त्री १ :- तुला काय वाटतं ?

स्त्री २ :- अमर शक्यच नाही. खात्री आहे मला. पूर्वी तू सतत माझ्याबरोबर असायचीस तेव्हा तुझ्याकडे बघायचासुद्धा नाही तो.

स्त्री १ :- एवढी खात्री आहे तर मग हे प्रश्न कशाला विचारतेयस ?

स्त्री २ :- तुला काय वाटलं तुझी उत्तरं ऐकायला आतुर झालेय मी ? मला फक्त तुला थोडं हलवायचं होतं. धक्का देऊन, तुझा हा आविर्भाव मोडायचा होता. मी धडपडतेय आणि तू माझी धडपड शांतपणे एन्जॉय करतेयस हे चित्र पुसून टाकायचे होतं. पूर्वीसुद्धा असंच वागायचीस तू. तुझ्यापुढे उगीचंच हरल्यासारखं नामोहराम झाल्यासारखं वाटायचं.

तेव्हा बेसावध असायची मी आणि तू जिंकायचीस. आताही तुझं हे गप्प, घुम्यासारखं बसून राहणं, सगळं कळतंय मला. एवढा वेळ आपण एकत्र आहोत एक शब्दही बोललेली नाहीयेस तू. मीच एकटी मघापासून बोलतेय आणि तू बिचारी बोलतेय मनात साचलेले तर बोलू दे तिला म्हणून शिष्टासारखी बसून राहिली आहेस. तुला काय वाटतं ? तुला बोलतं करता येणार नाही मला ? सांग ना तुझी एंगेजमेंट का तुटली ? त्या दिवशी अमरबरोबर आमच्या घरी, नेमकी कशाला आली होतीस तू ? आज चल नं आमच्या घरी इथूनंच.

(स्त्री १ क्षणभर तिच्याकडे रोखून पाहते. काहीतरी बोलण्यासाठी वाक्याची अस्फुट सुरुवातही करते पण स्त्री २ तिच्या उत्तराची वाट ही न पाहता पुढे बोलू लागते.)

स्त्री २ :- नाही ! बोलूच नकोस ! तुझा डाव लक्षात आलाय माझ्या ! माझ्या बोलण्यातून कुठे एखादी अस्वस्थतेची खूण जाणवतेय का हे बघायला टपून बसली आहेस तू ! शी !

(स्त्री १ थंडपणे कुत्सित हसते.)

स्त्री २ :- (उसळून) हसू नकोस !

(स्त्री १ शांतपणे तिच्या नजरेला नजर भिडवून पहात राहते.)

स्त्री २ :- खरं सांगू ? मला कीव येते तुझी ! बिच्चारी ! तुझा राग नाही येत. एक

घायाळ, दुःखी, एकाकी स्त्री ! जिनं आधी मस्तीत साऱ्या जगाकडे पाठ फिरवली आणि आता तिला आधार हवा आहे तर सगळे दरवाजे तिच्यासाठी बंद आहेत !

स्त्री १ :- (शांत स्वरात) जिंकली आहेस नाही का तू पण तुझ्या लक्षात आलंय ? तुझा पहारा चुकवून मी कधीच तुझ्या आयुष्यात जागा पटकावलीय.

स्त्री २ :- हो लक्षात आलंय माझ्या. दिवसातून तीन वेळा हॉर्लिक्स. ही तुझी सवय. अमर जे हट्टानं घालतो आणि जे मला अगदी आवडत नाहीत ते चढाव अगदी पहिल्यांदा तू त्याला घेऊन दिलेस माझ्याशी भांडून, माझं न ऐकता अमरनं माझ्या मुलाचं जे नाव ठेवलंय नं ते तूच त्याला सुचवलं होतंस.

स्त्री १ :- नीट डोळे उघडून बघशील तर असं खूप काही दिसेल तुला तुझ्या संसारात जे माझं आहे. तुझ्या घरातली क्रॉकरी, तुझ्या घरातलं फर्निचर, तुझ्या साड्यांचे रंग, आता हे सगळं अमरच निवडतो असं भोळसटासारखं म्हणू नकोस तू.

(बोलता-बोलता अंदाज घेण्यासाठी थांबते. नजर स्त्री २ वर तशीच रोखलेली. स्त्री २ घायाळ, पण तडफड लपवण्याचा आटोकाट प्रयत्न करतेय. क्षणभर विराम. मग स्त्री २ स्वतःच्या पसरलेल्या वस्तू गोळा करते. नीट बॅगजूमध्ये ठेवते. स्त्री १ ची नजर तिच्यावरच. सर्व सामान व्यवस्थित झाल्यावर स्त्री २ ची आणि तिची नजरानजर होते.

स्त्री २ :- मघाशी तुला इथं, अशी एकटी गप्प बसून राहिलेली पाहिली, तेव्हा खरंच वाईट वाटलं होतं मला. पण तुझ्या बाबतीत त्याला इलाज नाही. कारण स्वतःचा जीव रमवायचा तर स्वतःला विसरावं लागतं. हे तुला शक्य नाही. त्याहून अधिक केविलवाणं काय आहे सांगू - तुला तुझं सावज ओळखता येतं. जाळंही टाकता येतं. फक्त सावजावर झडप घालून त्याची शिकार करण्याचा जो क्षण असतो तो तुला गाठता येत नाही. (विराम) तू आता जे सांगतेयस ते नेमक्या ह्या शब्दांत नाही, पण मला जाणवलं होतंच. तुला जे जे आवडत होतं ते सारं मला स्वीकारावं लागलं. ह्यात तुझी काहीच हुषारी नाही. उलट मीच ते हट्टानं आपलंस करून घेतलं. अमरबरोबर राहताना मी माझ्या मनासारखं वागायचा एवढासा प्रयत्न जरी केला तरी आम्हा दोघांमध्ये जी थंड, निःस्तब्धता निर्माण व्हायची तिच्यात तुझा श्वाससुद्धा ऐकू यायचा मला. अगतिक संतापानं रडू फुटायचं. पण मग मगळ्यात आधी मी अश्रू लपवायला शिकले आणि मग मला कशाचाच त्रास होईनासा झाला. तेव्हा आली होतीस तशी आजही घरी चल. वाटल्यास आमच्या घरीच येऊन रहा. इथे जशी तासन्तास बसून राहतेस तशी घरी बसून रहा. काही अडचण होणार नाही तुझी.

(स्त्री १ तिच्याकडे पाहतेय.)

स्त्री २ :- खरंच, थट्टा नाही, नवऱ्यानं सांगितलंय म्हणून मी हॉर्लिक्स पिते म्हणून

हसलीस तू मला, पण त्यात काय बिघडलं ? अगदी ते खूळ तू त्याच्या डोक्यात भरवलेलं असलं तरीही ? बरं असतं की ते तब्येतीला आणि तुझी कपड्यांची निवड खरंच खूप चांगली आहे. ह्या गोष्टींमुळे अमरला बरं वाटत असेल तर मग त्या मुळात तुझ्या असल्या तरी बिघडलं कुठे ? अमर तर माझाच आहे ! उलट आता त्याला तुझी आठवण येण्याची गरज उरली नाही. आय ॲम सॉरी ! तुझा डाव उधळून लावला मी. तुला ह्या जाचाला कंटाळून मी निघून जाईन असं वाटलं होतं. तुला पण खरं म्हणजे तुझ्यातलं हवं होतं ते सगळं ओरबाडून घेऊन मीच हुसकावून लावलं तुला ! आता जे घडलं त्याबद्दल खंत करत बसून राहण्या पलिकडे तुझ्या हाती काही उरलंच नाही ! तुझं कुठे चुकलं सांगू ? तू फक्त स्वतःच्या अस्तित्वाचा एक-एक तुकडा माझ्या आयुष्यात आणून मांडत गेलीस. जाळं पसरवून ठेवावं तसं तुझं अस्तित्व माझ्या वाटेत पसरवून माझा पाय अडकवण्याची वाट पहात बसलीस तू. पण हे करताना तू माझ्याकडून काहीच घेतलं नाहीस. नाहीतर एवढं छान व्यक्तिमत्त्व, कपड्यांची, रंगाची एवढी उत्तम समज असूनही, एकाही पुरुषाचं मन का नाही जिंकता आलं तुला ? (हसते) पण तुझ्या लेखकानं तुला जे शिकवलं नाही ते मला शिकवलं ते तसंच असतं गं. मुलाची छान-छान नावं पुष्कळांना माहिती असतात. फक्त ती ठेवता येतील असं मूल नसतं. (विराम) खरं म्हणजे आता खंत करूनही काही उपयोग नाही बघ ! आजही बाकी सगळं आहेच तुझ्याकडे. रूप, पैसा, बुद्धी फक्त त्यातली जादू संपलीय ! आता गप्प बसण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाही ! पूर्वी तू गप्प असायचीस तेव्हा वाटायचं की ज्यांच्याजवळ आत्मविश्वास असतो अशी माणसं अबोल असतात. पण कधीकधी त्यांच्याजवळ बोलण्यासारखं काही नसतंच म्हणून ती गप्प असतात हे आज तुला भेटून कळलं.

(स्त्री १ उत्तरादाखल तुच्छतादर्शक हसते. स्त्री २ तिची प्रतिक्रिया पाहून आपलं बोलणं आवरतं घेते.)

स्त्री २ :- बरंय, निघालं पाहिजे मला आता. अंधार व्हायला लागला.

(बॅगज् वगैरे आवरून उभी राहते. स्त्री १ जवळ जाते. तिच्या खांद्यावर हात ठेवते.)

स्त्री २ :- (पॅट्रनायझिंग स्वरात) आयुष्य एवढं कठीण नाही करून ठेवू ग! खाचखळगे, वळणं ओलांडताना मोडून पडायला होतं मग. अेनी वे. थँक्स फॉर एव्हरीथिंग !

(स्त्री १ तिच्याकडे पाहून क्रूर खुनशी हसते.)

स्त्री १ :- बस ! फक्त एवढंसंच सुचवायचं होतं तुला ? आणि त्यासाठी तुला इतकं बोलावं लागलं ?

(स्त्री २ तिच्या ह्या आविर्भावानं आणि प्रश्नानं हतबुद्ध नाईलाजानं तिच्यापासून दूर होते. हळूच वळते. निघून जाते. स्त्री एक तिला नजरेनं फॉलो करते. मग क्षणभर तशीच बसून राहते. मग मासिक उघडते. वाचू लागते. पण त्यात तिचं मन लागत नाही. समोर मासिक उघडं ठेऊन ती दूर कुठे तरी पाहते. क्षण दोन क्षणांना तिच्या नकळत तिचे डोळे पाझरू लागतात. स्तब्धता.)

- दिनकर बेडेकर

⌘⌘⌘

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
कार्यवृत्त
सांस्कृतिक समिती

जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोंबर २००१

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे जुलै ते आक्टोंबर २००१ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यांचा गोषवारा

■ **दि. ८ जुलै २००१**

विदर्भ साहित्य संघ आणि 'वलय' या युवा साहित्यीकांच्या संस्थेच्या संयुक्त सहकार्याने काव्यवाचनाचा एक कार्यक्रम वाचनालयाच्या सभागृहात पार पडला. कविवर्य बा.भ.बोरकर यांच्या काही निवडक कवितांचे वाचन यावेळी सादर करण्यात आले. अपर्णा शेंबेकर, प्रसन्न शेंबेकर, तुषार जोशी, महेश जोशी या विद्यार्थ्यांनी बोरकरांच्या कवितांचे वाचन केले. कार्यक्रमाचे संचालन शिब्बा नंदनपवार यांनी केले होते. गौरी शास्त्री यांना या कार्यक्रमासाठी बरेच परिश्रम घेतले. प्रकाश एदलाबादकर यांनी सर्वांचा परिचय करून दिला. वि.सा.संघाचे व्यासपीठ अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी नेहमीच मुक्त राहील असे त्यांनी सांगितले. सरचिटणीस शोभा उबगडे यांनी सर्वांचे स्वागत केले.

अनुक्रमणिका

■ **दि. १६ जुलै २००१**

सुप्रसिद्ध कवयित्री कै. इंदिरा संत यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांनी लिहिलेल्या काव्यरचनांचे वाचन व त्यातून इंदिराबाईंचे व्यक्तित्व उलगडून दाखविण्याचा उपक्रम सादर करण्यात आला. 'मृण्मयी' या शीर्षकाखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ. मालती निमदेव, माधुरी वरुडकर, व अनुया आपटे यांचा सहभाग होता. डॉ. प्रज्ञा आपटे यांनी या कार्यक्रमाच्या संहितेचे लेखन केले होते. प्रकाश देवा व शुभा साठे यांचे या कार्यक्रमाला मोलाचे मार्गदर्शन मिळाले. वि.सा.संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी सर्व कलावंताचे स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक प्रकाश एदलाबादकर यांनी केले. या अभिनव कार्यक्रमास रसिकवर्गानेही बरीच उपस्थिती लावली होती. हा कार्यक्रम संकुलातील ग्रंथालयाच्या सभागृहात झाला.

■ **दि. ७ व ८ ऑगस्ट २००१**

विदर्भ साहित्य संघाच्या गणेश व्याख्यान मालेचे आयोजन यंदा ७ व ८ ऑगस्ट या तारखांना विनोबा विचार केंद्राच्या (सर्वोदय आश्रम) सभागृहात झाले. दोन दिवस झालेल्या या व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफताना न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी 'मला उमगलेले पु.ल.' या विषयावर विचार व्यक्त केले तर दुसऱ्या दिवशी प्रा. राम शेवाळकर यांनी 'वक्ता पु.ल.' या विषयावर विचार मांडले. दोन्ही व्याख्यानांच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते.

■ **१५ ऑगस्ट २००१**

भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सांस्कृतिक संकुलात ध्वजारोहण झाले. सरचिटणीस शोभा उबगडे यांनी ध्वजारोहण केले. कार्यकारी मंडळाचे स्थानिक सभासद यावेळी उपस्थित होते.

■ **२ सप्टेंबर २००१**

प्रसिद्ध साहित्यिक व 'अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष कै. व्यंकटेश माडगूळकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सांस्कृतिक संकुलात एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. वि.सा. संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी सभेच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसिद्ध लेखक व कै. माडगूळकरांचे स्नेही मारुती चितमपल्ली तसेच डॉ. रवींद्र शोभणे यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. याच सभेत नटवर्य कै. शरद तळवलकर, कै. शं.ना.अंधृटकर, कै. व.दि.कुळकर्णी व कै. श्रीपाद गंगाधर

अनुक्रमणिका

कावळे यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सभेचे संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

■ **दि. ७ सप्टेंबर २००१**

विदर्भ साहित्य संघाने सांस्कृतिक संकुलात निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित केले होते. यात निमंत्रित कविंनी मुख्यतः पावसाच्या कविता सादर केल्या. या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. डॉ. सुलभा हेर्लेकर, मृणाल चिंचाळकर, सुचित्रा कातरकर, गौरी शास्त्री, सुमती वानखेडे, वसंत वाहोकार, प्रसन्न शेंबेकर, तुषार जोशी आदि कविंचा यात सहभाग होता. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन गौरी शास्त्री यांनी केले. याच प्रसंगी आशा पांडे यांच्या 'कबीर दोहावली' चे प्रकाशन झाले. सरचिटणीस शोभा उबगडे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभारप्रदर्शन मेघना वाहोकार यांनी केले.

■ **दि. १७,१८,१९ सप्टेंबर २००१**

विदर्भ साहित्य संघाच्या कै. ए.श्री. पटवर्धन व्याख्यानमालेचे आयोजन केशवनगर सांस्कृतिक सभेच्या सहकार्याने करण्यात आले. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. वि.रा.करंदीकर यांची 'समर्थ रामदासस्वामी जीवन कार्य' या विषयावर व्याख्याने झाली. डॉ. हेडगेवार स्मृति भवन (रेशीमबाग, नागपूर) येथे ही व्याख्यानमाला झाली. वि.सा.संघाचे कार्याध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस शोभा उबगडे, केशवनगर सांस्कृतिक सभेचे कार्यवाह य.वा.खारपाटे प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. करंदीकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. व्याख्यानमालेचे सूत्र संचालन व आभारप्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

■ **दि. २४ सप्टेंबर २००१**

विदर्भ साहित्य संघ आणि प्रतिमा प्रकाशन (पुणे) यांनी संयुक्तपणे सुचित्रा कातरकर यांच्या 'लतादीदी आणि मी' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ सायंटिफिक सभागृहात आयोजित केला होता. पं. हृदयनाथ मंगेशकर यांचे हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. राम शेवाळकर होते. डॉ. सुलभा हेर्लेकर यांनी याप्रसंगी काव्यसंग्रहावर विचार व्यक्त केले. डॉ. दत्ता हरकरे, सुचित्रा कातरकर व स्मिता जोशी यांनी या संग्रहातील काही रचना सादर केल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. प्रतिमा प्रकाशनाचे अरुण पारगावकर यांनी आभारप्रदर्शन केले.

अनुक्रमणिका

■ दि. १२ ऑक्टोंबर २००१

डॉ. रवींद्र शोभणे लिखित 'उत्तरायण' या कादंबरीवर एका चर्चेचे आयोजन विदर्भ साहित्य संघ आणि देशमुख आणि कंपनी यांनी संयुक्तपणे केले होते. सर्वोदय आश्रमाच्या सभागृहात झालेल्या या ग्रंथ चर्चेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य राम शेवाळकर होते. डॉ. भा.ल. भोळे, डॉ. किशोर सानप, डॉ. आशा सावदेकर व डॉ. शोभणे यांनी याप्रसंगी कादंबरीवर विचार व्यक्त केले. कार्यक्रमांचे संचालन डॉ. सुहास राजनकर यांनी केले.

■ दि. १४ आक्टोबर २००१

विदर्भ साहित्य संघ आणि युवासंघर्ष वाहिनी यांनी संयुक्तपणे, जयप्रकाश नारायण जन्मशताब्दी समारोहाचे आयोजन सांस्कृतिक संकुलातील सभागृहात केले होते. न्या. मू. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी या निमित्ताने आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश द्वादशीवार होते. ज्ञानेंद्रकुमार हे विशेष अतिथी होते. यावेळी 'स्थानिक विकास संपूर्ण क्रांतीच्या संदर्भात माझ्या मते' या विषयावर विद्यार्थ्यांचा परिसंवाद झाला. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी समारोपीय भाषण केले.

■ दि. १८ ऑक्टोबर २००१

विदर्भ साहित्य संघाचे माजी कार्यकारी सभासद कै. चंद्रकांत उर्फ नाना कुळकर्णी व प्रकाशक कै. मामासाहेब गंधे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाच्या पुढाकाराने सर्वोदय आश्रमात एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले. सभेच्या अध्यक्षपदी प्राचार्य राम शेवाळकर होते. नागपूर श्रमिक पत्रकार संघ, यशवंतराव चव्हाण स्मृतिप्रतिष्ठान, सर्वोदय आश्रम व टिळक नगर नागरिक मंडळ या संस्थांचाही यात प्रामुख्याने सहभाग होता. या प्रसंगी प्रा. म.वि.बोबडे, प्रकाश देशपांडे, सुधीर पाठक, विनोद देशमुख, प्रा. अरविंद खांडेकर, डॉ. अक्षयकुमार काळे, प्रा. सुरेश द्वादशीवार या निमंत्रित वक्त्यांशिवाय, कुमुद मंडलेकर, शामकांत कुळकर्णी, प्रमोद संत, रवींद्र गंधे, प्रभूतींची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

⌘⌘⌘

अनुक्रमणिका

संमेलन समिती :

नव्या कार्यक्रमासाठी नियुक्त विदर्भ साहित्य संघाच्या संमेलन समितीची पहिली सभा १९ सप्टेंबर रोजी ९.०० वाजता विदर्भ साहित्य संघात झाली. अध्यक्षांच्या अनुपस्थितीमुळे कार्याध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. सभेला समितीचे संचालक, उपाध्यक्ष डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी, श्याम माधव धोंडे, डॉ. ज्योती लांजेवार, सुभाष पाटील, प्रकाश एदलावादकर (निमंत्रित) नरेश सबजीवाले (कार्यालय चिटणीस) डॉ. रवींद्र शोभणे, श्री. वसंत वाहोकार व सरचिटणीस शोभा उबगडे उपस्थित होते.

संमेलन समितीचे संचालक, संस्थेचे उपाध्यक्ष,डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांनी विदर्भ साहित्य संघाची संमेलन समिती, संमेलने व त्यांचे विदर्भाच्या सामाजिक-सांस्कृतिक सौहार्द निर्मिती व संवर्धन ह्यातील स्थान ह्या पार्श्वभूमीवर विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाचे महत्व जाणवून दिले. विदर्भ साहित्य संघाच्या उद्दिष्ट पूर्तीच्या साधनांमध्ये संमेलनाचे असलेले अग्रस्थानाचे महत्व देखील त्यांनी समितीच्या लक्षात आणून दिले. सभेला पुढील माहितीही देण्यात आली.

चौथे बालसाहित्य संमेलन अमरावती येथे

पाचवे वैदर्भीय लेखिका संमेलन यवतमाळ येथे

५३ वे विदर्भ साहित्य संमेलन शिवाजी शिक्षण संस्थेच्या धनवटे नैशनल कॉलेजतर्फे नागपूर येथे

आमंत्रित केले गेले आहे.

विदर्भसाहित्य संघातर्फे कोणत्याही विशिष्ट जात, धर्म व संप्रदाय वाचक संमेलनाचे आयोजन केले जाण्याचे धोरण नसल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले.

विदर्भ साहित्य संघाच्या विविध संमेलनासोबतच नव्या कार्यकाळात युवा साहित्य संमेलन आणि विचार साहित्य संमेलन अशी दोन नव्या संकल्पनांची संमेलने आयोजित करण्याचा संकल्प करावा असे संचालक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी सुचविले. अशी संमेलने आयोजिण्याचा निर्णयही घेण्यात आला.

अन्य भाषा साहित्य विभाग :

विदर्भ साहित्य संघाच्या नव्या कार्यकाळासाठी नियुक्त अन्य भाषा साहित्य विभागाची या कार्यकाळातील पहिली सभा १९ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. सभेला अध्यक्षस्थानी अध्यक्षांच्या अनुपस्थितीत कार्याध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर तसेच

उपाध्यक्ष व अन्य भाषा साहित्य विभागाचे संचालक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, विभागाचे सदस्य श्री. मोहन कडू, श्री. सुकुमार चौधरी, श्री. गोपी अनयाडू, श्री. दिनकर बेडेकर, श्री. राजेंद्र पटोरिया, सरचिटणीस शोभा उबगडे व व कार्यालय चिटणीस श्री. नरेश सबजीवाले हे उपस्थित होते.

या विभागात हिंदी, बंगाली, मलयाळम्, रशियन अशा विविध भाषांना प्रतिनिधीत्व सदस्यांच्या रुपाने लाभलेले आहे.

प्रथम संचालक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी या विभागाची संकल्पना, कार्यपद्धती व त्याचे औचित्य आणि महत्व विशद केले.

दर महिन्याला विभागातर्फे भिन्न भारतीय व परकीय भाषा-साहित्यावर आधारित कार्यक्रम आयोजित करण्याचे तसेच स्थानिक, प्रादेशिक, राज्य व अखिल भारतीय स्तरावर क्रमाक्रमाने बहुभाषिक साहित्य मेळावे संमेलने यांचे आयोजन करण्याचे उद्दिष्ट ही ठरविण्यात आले. या व्यतिरिक्त भिन्न भाषांमधील साहित्य व तद्संबंधाने असलेल्या मजकुराचे हिंदी अथवा इंग्रजी भाषेतून सर्वदूर प्रसारार्थ एक पानी अनियतकालिक प्रकाशनाची कल्पना मांडण्यात आली. तसेच रशियन, उर्दु व बंगाली भाषा शिक्षणाचे वर्ग संयुक्त विद्यमाने चालविण्यावरही चर्चा करून निर्णय घेण्यात आले. विविध भाषेतील अनियतकालिकांचे प्रदर्शन आयोजित करण्याचाही निर्णय घेण्यात आला. विविध प्रकारची उपलब्ध अनुयाने या कार्यार्थ लाभावी याचा प्रयत्न केला जाईल असेही सांगण्यात आले.

⌘⌘⌘

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

■ येत्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी परीक्षा समितीचे सन्माननीय सदस्य श्री. शरश्चंद्र बुचे, सौ.हिरुरकर, डॉ. सौ. विद्या कावडकर, सौ. वंदना मोहरील व सौ. सुनेत्रा मंडलेकर या मान्यवरांचे मार्गदर्शन परीक्षा समितीस लाभेल.

■ एकूण संपूर्ण विदर्भातून १३५ केंद्रातील परीक्षार्थी विविध परीक्षात सम्मिलित होत आहेत.

■ विशेष बाब म्हणजे वर्धा येथील विदर्भ साहित्य संघाच्या शाखेतील मान्यवर सदस्य श्री. जयंत मादुस्कर व श्रीमती सुनीता कावळे यांच्या पुढाकाराने दहा नवीन केंद्र सुरू करण्यात आली आहेत.

विदर्भ साहित्य संघ :
ग्रंथालय समिती

ग्रंथालय समितीची सभा १६ जुलै. २००१ रोजी घेण्यात आली. सभेत डॉ. ईश्वर नंदपुरे यांनी अभ्यासकांसाठी स्टडीसर्कलची कल्पना मांडली. तसेच वर्षभरात स्नातक व स्नातकोत्तर विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयाच्या अनुषंगाने विविध चर्चासत्रे व व्याख्यानांचे आयोजन करण्याचेही निश्चित करण्यात आले.

श्री. हरिहर पिंपळगावकर, डॉ. विलास चिंतामन देशपांडे, रमेश जनबंधू, डॉ. सौ आशा सावदेकर, डॉ. सौ. सुहास राजनकर, हे ग्रंथालय समितीचे मान्यवर सदस्य असून डॉ. ई. तु. नंदपुरे हे संचालक व सौ. आसावरी केळकर ह्या आमंत्रक आहेत.

अनुक्रमणिका

शाखा अहवाल

जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर २००१

अकोला शाखा -

जुलै २००१ च्या पहिल्या आठवड्यात ना.घ. यांच्या काव्यावर आधारीत 'म्हणत म्हणत मधुगीत' आणि 'नाट्यगुंफण' प्रमिलाताई ओक सभागृहात संपन्न झाले. ना.घं.च्या काव्याची आगळी वेगळी नाट्यमय समीक्षा रसिकांसमोर सादर करण्यात आली. रवींद्र फसबेकर आणि पल्लवी देशमुख या कलाकारांनी काव्यगायन केले व सीमा रोढे, सुचीत देशपांडे, शिल्पा देशपांडे यांनी या काव्याचे नाट्यरुप सादर केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी अनुप कुमार होते.

(२) ५ सप्टेंबर २००१ - उ.स. गिरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काव्यगायनाचा कार्यक्रम आयोजित केला.

उमरेड शाखा -

वार्षिक आमसभा रविवार दि. १४-१०-०१ रोजी झाली. त्याच सभेत नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

(२) श्री. जालंदर सोनुने यांचा 'याद करो कुर्बानी' हा स्लाईड शो आणि व्याख्यानाचा कार्यक्रम १४ ऑक्टोबर २००१ रोजी, न.प. बुधवारी प्राथमिक शाळा, उमरेड येथे आयोजित केले.

⌘⌘⌘

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ	महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी **स्मृती सार्वजनिक वाचनालय** विद्वतरत्न के.ल. 'भाऊजी' दप्तरी **स्मृती संदर्भ ग्रंथालय**

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सन्माननीय सभासदांचे साहित्यप्रेम व वाङ्मयभिरुची याबद्दल आम्हाला आदर आहे. विदर्भ साहित्य संघाचे एक स्वतंत्र संदर्भ ग्रंथालय आहे याची आपणास कल्पना आहेच. कादंबरी, कथा, काव्य, नाटक, ललित गद्य, बाल वाङ्मय, प्रवासवर्णन, आत्मकथन चरित्र, समीक्षा, वाङ्मय इतिहास, कोश सूची, इ. विषयांवरील ग्रंथांशिवाय समाजकारण, राजकारण, धर्मकारण, इतिहास, विज्ञान, ललितकला, आरोग्य, क्रीडा, पाककला, सामान्यज्ञान, सौंदर्यसाधना या विषयांवरीलही ग्रंथ येथे उपलब्ध आहेत. विशेषतः विद्यापीठीय स्नातकोत्तर मराठीचा शिक्षणक्रम, राज्यशासनाच्या मराठी विषयाच्या नेट-सेट परिक्षा, पी.एच.डी.साठी प्रबंध लेखन ल संशोधन या दृष्टीने हे एक समृद्ध ग्रंथालय आहे. विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात हे ग्रंथालय आहे.

आमच्या संदर्भ ग्रंथालयासोबतच संस्थेने अमृत महोत्सवी वर्षी आता सार्वजनिक वाचनालय देखील सुरु केलेले आहे. संदर्भ विभाग हा त्याचा अर्थातच स्वतंत्र विभाग असेल. आपले ग्रंथप्रेम, वाचनप्रियता व अभ्यासू वृत्ती आमच्या लक्षात असल्याने, आपण आमच्या नवनिर्मित सार्वजनिंक वाचनालयाचे सभासद व्हावे असे आवाहन या पत्राद्वारे आम्ही आपणास करीत आहोत. वाचनालयाचे सभासद होतांना विदर्भ साहित्यसंघाच्या आजीव सभासदांना यात सवलत असेल. वाचनालयाचे नियम व अटी व अन्य तपशील कार्यालयीन वेळात प्राप्त होऊ शकेल. आपण या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१. संशोधन लेखसंग्रह, भाग २ : कै. हरिभाऊ नेने........................ रु. ६/-
२. प्रयोगक्षम मराठी नाटके डॉ. मु.श्री.कानड...........................रु. ३०/-
३. मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द.ह. अग्निहोत्री......................रु. ३२/-
४. अध्यक्षीय भाषणे सा.भू.तु. ना. काटकर............................रु. ७५/-
(विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)
५. आणखी भाषणे : डॉ. मधुकर आष्टीकर..............................रु. १०/-
६. तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ :
डॉ. र. श. केळकर...रु. ४/-
७. "प्रातिभ" लघुकथा संग्रह (१९८०)...............................रु. २०/-
८. समग्र बजाबा..रु. २०/-
९. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे...............रु. ४/-
१०. ज. के. उपाध्ये यांची १८८३-१९१३ कविता :
संपादन .आशा सावदेकर..रु. ३०/-
११. दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.............रु. ५/-
१२. मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर................................रु. ३/-
१३. संपूर्ण गडकरी भाग - १ व २ (म. रा. सं. मं.).......................रु. ७५/-
१४. युगवाणी साहित्य सूची : (संपादन : केशव जोशी)....................रु. ७०/-
१५. कविता विदर्भाची : डॉ. सौ. आशा सावदेकर.........................रु. ५०/-
१६. छंदशास्त्र : एक अध्ययन : कुंदन दिवाण.............................रु. १०/-
१७. वसंत वैभव : डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुळकर्णी.............रु. ८०/-
१८. धन्यतेची थाप : डॉ. वि.भि.कोलत................................रु. १००/-
१९. वक्ता दशसहस्त्रेषु (प्रा. राम शेवाळकर)
संपादक : डॉ. वि. स. जोग.......................................रु. १२५/-
२०. अध्यक्षीय भाषणे, खंड २ :
संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.............................. रु. २५०/-
(विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

२१. अध्यक्षीय भाषणे, :
संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी..............................रु. २००/-
(विदर्भ साहित्य संघाच्या विविध प्रवाही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचे संकलन)

२२. युगवाणी साहित्य सूची, खंड २ (संपादन : केशव जोशी)............रु. ५०/-

२३. वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८)
संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी..................................रु. १००/-

२४. विदर्भ साहित्य संघ -
अमृत महोत्सवी स्मरणिका- १९९९...............................रु.२००/-

२५. सांजदिव्याचे हंबर -शिवा राऊत (निवडक कविता)................रु. ६०/-
संकलन /संपादन डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग

। संमेलन स्थळी ।

एकूण १००/– रु किंमतीच्या पुस्तकावर १० % सूट.

....

शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये / विक्रेत्यांकरिता २०% सूट.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

विदर्भ साहित्य संघ,

सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सितABर्डी,
नागपूर : ४४००१२, दूरभाष : ५२३९२९